# माणूस



मार्च १९६५

२५ पैसे

# एक कूपर सीआर इंजिन (सीआर ४०)

## ४४ एकर जमिनीला पाणी देऊ शकते

चालविण्यास सोपे असलेले कूपर सीआर इंजिन
हे शेतकऱ्याला कांही एक त्रास न देता बरेच वर्षे
उपयोगी पडते






*इतर प्रमुख गुण :*

- ★ मजबूत, कमी खर्चिक, लाईट डिझेल तेलावर चालते
- ★ चालविण्यास अत्यंत सोपे
- ★ मुबलक सुटे भाग
- ★ वितरकां मार्फत त्वरित उपलब्ध "कूपर-मान्य सेवा"
- ★ अनेक कामांसाठी उपयोग, पाणी देणे, पीठ दळणे, लाकूड कापणे, इत्यादि कामे होतातच
- ★ एक वर्षाची हमी

*कूपरची सीआर ८, सीआर १४, सीआर १९, सीआर २६ आणि सीआर ४० हीं इंजिने ८ ते ४० बीएचपी पर्यंत सहज मिळू शकतात.*

| | |
|---|---|
| तगाई साठी योग्य | **कूपर** डिझेल इंजिन |



WALCHAND COOPER GROUP

कूपर
इंजिनिअरिंग लि.
सातारा रोड,
द. रेल्वे, महाराष्ट्र

mad. CE 827 MAR




स. न.

'माणूस' चा नव्या स्वरूपातील अंक अधाशासारखा वाचून काढला. पाक्षिकाच्या स्वरूपात राजकीय–सामाजिक व साहित्यविषयक वाचकांपर्यंत पोचण्याची कल्पना उत्तमच. (मराठीत पाक्षिक आता नाव घेण्याजोगे नाही.)

मात्र आकार बदलला हे बरे झाले. स्वरूप–बाह्य– 'तपोवनपत्रिका' किंवा 'भवन्स जर्नल'सारखे झाले. आत राजकीय महत्त्व सध्या आढळते. त्यात सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह करण्यात यावा. पु. लं. वरचे दोन्ही लेख चांगले आहेत.

**सुरेश गजेंद्रगडकर, मुंबई.**

स. न.

आपला 'जनता विशेषांक' वाचला, अतिशय आवडला. मध्यमवर्गीय महाराष्ट्रीयांसाठी आपण सुरू केलेला उपक्रम अतिशय स्तुत्य आहे. तेव्हा अशीच योजना चालू ठेवावी अशी आग्रहाची विनंती आहे. जनता अंकातील सर्व लेख अतिशय चटकदार आहेत. पु. लं.ची ओळख आणि नाट्य, चित्रपटसमीक्षण आवडले.

अशाच प्रकारचे उपक्रम सतत चालू राहिल्यास विनोबांनी उच्चारलेले वाक्य प्रत्यक्षात येण्यास अडचण येणार नाही अशी आशा वाटते.

**मनोहर घैसास, मुंबई.**

स. न.

'माणूस' मासिकात 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ह्या रा. म. शास्त्री ह्यांच्या लेखमालेची 'जून १९६४' च्या अंकात सुरवात झाल्यापासून मी ह्या मासिकाचे दिवाळी अंकापर्यंत सर्व अंक विकत घेतले. परंतु त्यानंतर 'माणूस' चा अंक मी ज्या स्टॉलवर खरेदी करायचा त्या स्टॉलवर व इतरत्र कोठेही मला मिळाला नाही. मला असे सांगण्यात आले की 'माणूस' बहुतेक बंद पडले असणार. परंतु कालच मला 'माणूस' चा जनता विशेषांक मिळाला.

**म. द्वा. काळुसकर, मुंबई.**

['माणूस'चे दिवाळीनंतरचे अंक निघाले ते येणेप्रमाणे : १५ डिसेंबर, १ जानेवारी व २६ जानेवारी. १५ फेब्रुवारीचा अंक निघणार होता; पण कागदाची अचानक अडचण उद्भवली. यापुढे ती पुन्हा उद्भवणार नाही अशी आशा आहे. —संपादक.]




# या अंकात

वर्ष चौथे : अंक तेरावा - चौदावा
★
१ मार्च १९६५ : पंचवीस पैसे
★
संपादक : श्री. ग. माजगावकर
★
पत्ता : ४१९ नारायण, पुणे २
★
दूरध्वनी : ५७३५९

मुखपृष्ठकथा : ● समाविस्थ चर्चिल
□ □
व्यक्ती आणि वार्ता : ● भा. कृ. केळकर
● शि. द. फडणीस
□ □
कथा : ● दुपार
□ चंद्रशेखर मराठे
● बिली
□ अशोक महादेव जोशी
कविता : □ सुधीर देव
□ शारदात्मज
□ सुधाकर शंकर देशपांडे
शास्त्रीय लेख : ● पूर्णविराम
□ डॉ. शरद अभ्यंकर
पुस्तकपरिचय : ● नाझी भस्मासुराचा उदयास्त
□ रा. म. शास्त्री
शिवाय : ● दिल्ली दरबार, जगाच्या पाठीवर, रंगभूमी, चित्रपट, क्रीडा, विनोद ही नेहमीची सदरे

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' पाक्षिकाचे चालक सहमत असतातच असे नाही.



# राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

## तिसऱ्या सचित्र आवृत्तीचे प्रकाशन

*तारीख लवकरच जाहीर होत आहे*

पूर्वग्राहक व ठेवीदार यांना

ग्रंथप्रकाशनाची तारीख आगाऊ कळविली जाईल.

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.

# जगाच्या पाठीवर

मद्रासमध्ये स्टंट चित्रपटांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होत असते, असे आजवर ऐकले होते. पण राजकीय स्टंटबाजीचा आखाडाही येथे बराच घुमत असतो, हेही तेथे नुकत्याच झालेल्या हिंदी-विरोधी आंदोलनामुळे सर्वांच्या चांगलेच प्रत्ययास आले आहे.

वास्तविक १९३७ मध्ये मद्रासमध्ये काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ असताना मुख्यमंत्री राजगोपालाचारी यांनीच हिंदीचा वापर करण्यात पुढाकार घेतला होता. हेच हिंदीचे त्यावेळचे पुरस्कर्ते राजाजी आज एकदम हिंदीच्या समूळ उच्चाटनाचा पवित्रा घेऊन कसे पुढे सरसावले ?

कामराज यांचा हिंदीला विरोध होता तर आजवर ते गप्प कसे ? १९६५, २६ जानेवारीपासून हिंदी ही राजभाषा होणार हे पं. नेहरू असतानापासूनचे काँग्रेस सरकारचे धोरण होते. दुर्गापूर अधिवेशनापर्यंतही कामराज स्वस्थ कसे ?

तेव्हा हे प्रकरण दिसते तेवढे साधे नसावे. शास्त्रींना खाली ओढण्याचे एक कुटिल कारस्थान यामागे रचले गेले असावे असा राजकीय निरीक्षकांचा तर्क आहे. या दृष्टीने मद्रासी आंदोलनाची थोडी बारकाईने छाननी करून पाहू.

मद्रासमधील या दंगली व जाळपोळीमागे काही मूठभर भांडवलदार व डावे कम्युनिस्ट यांचा हात होता असे मद्रासचे मुख्यमंत्री श्री. भक्तवत्सलम् यांनी जाहीर केलेले आहे. हे दोन परस्परविरोधी गट कसे एकत्र येतात हे एक कोडेच आहे. पण गृहीत धरून चालू, की ते या कारणास्तव एकत्र आले.] या दंगल–जाळपोळीत गुंडांनी हात धुऊन घेतला, दोन पोलीस अधिकाऱ्यांना जिवंत जाळले, तेही गुंडांनी आपल्या खासगी वैमनस्याचा सूड म्हणून, हेही भक्तवत्सलम् यांनी जाहीर केले. मग दंगलींच्या मागे अशा समाजविद्रोही शक्तींचा हात आहे, हा काही लोकमताचा प्रामाणिक आविष्कार नाही, ही गोष्ट दंगली सुरू होताच या राजकारणपटू नेत्यांच्या ध्यानात कशी आली नाही ? का ध्यानात येऊनही याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले गेले असे समजायचे ? पण दुर्लक्ष तरी का म्हणायचे ? आतून पाठिंबाच असावा अशीच कामराज-भक्तवत्सलम् यांची प्रारंभीची निवेदने-वक्तव्ये होती. हिंदी-मधील केंद्रसरकारचे खलिते जाळून टाका हे म्हणणारे कामराजच होते, की वृत्त-पत्रांनी काही चुकीची वाक्ये त्यांच्या तोंडी घातली होती ? 'हा जनतेचा प्रक्षोभ आहे. विचार करा आणि वेळीच हिंदीबाबत उचललेले पाऊल मागे घ्या,' असाच भक्तवत्सलम् यांच्या भाषणाचा सुरवातीचा सूर होता. डावे कम्युनिस्ट, मूठभर

# ज्या राज्यात राष्ट्रपतींच्या घराची होळी होते आणि त्यांच्या ग्रंथालयाची राख होते त्या राज्यात काय सुरक्षित आहे ?

भांडवलवाले, गुंड ही सर्व मंडळी मागाहून केलेल्या स्पष्टीकरणात दाखल झाली. सुरवातीस हे जनतेचेच उग्र आंदोलन आहे असे भासवले गेले. तेव्हा असा तर्क बळावतो, की शास्त्रींना पेचात धरून केंद्रसरकारवरील आपली पकड घट करण्यासाठी मुद्दाम घडवून आणला गेलेला हा एक बनाव असावा. असे हिंसक व खोटे बनाव घडवून आणून आपल्याला हव्या त्या मागण्या पदरात पाडून घेण्याच्या तंत्राला Political blackmailing म्हणतात– जे तंत्र मुस्लीम लीगने नेहरू-गांधींच्यावर पूर्वी वापरून पाकिस्तान पदरात पाडून घेतले होते. सुदैवाने शास्त्रीजी आज या ' पाठीच्या खंजिरा 'च्या वारातून बचावलेले दिसतात. पण लक्षण काही ठीक नाही, असाच राजकीय निरीक्षकांचा एकूण अंदाज आहे.

### कंपनीत फूट

शास्त्री बचावले यातही शास्त्रींच्या ठामपणापेक्षा मद्रासी कंपनीतील अंतर्गत फाटाफूटच अधिक कारणीभूत ठरली असावी, असे दिसते.

कामराज, भक्तवत्सलम् ही मंडळी मद्रासमधील जाळपोळींकडे सहिष्णुतेने पाहत असतानाच इकडे दिल्लीत सुब्रह्मण्यम् यांनी शास्त्रींवर राजीनाम्याचा घाव घातला. इतका अचानक की, शास्त्रींच्या हाती राजीनामा सादर करण्याऐवजी वृत्तपत्र-प्रतिनिधींजवळ राजीनाम्याची घोषणा करून शास्त्रींविरुद्ध त्यांनी जणू बंडाचे निशाणच फडकवले. एवढा पराक्रम दिल्लीत गाजवल्यावर मद्रासमध्ये स्वागत नाही असे कसे होणार ! तेव्हा हे अन्नमंत्री मद्रासमध्ये तडक आले. प्रचंड स्वागत त्यांची वाट पाहातच होते. मिरवणुका, जयजयकार, हारतुरे वगैरे कार्यक्रम जोरात झाले. सुब्रह्मण्यम् यांनीही यावेळी ' हीरो 'चे काम छान केले. एक गहिवर प्रसंग अशा कार्यक्रमात असावा म्हणून दोन मृत पोलीस अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांचे त्यांनी घरी जाऊन सांत्वनही केले. आश्चर्य एकच वाटते, की चळवळीत ज्या चार लोकांनी आपणहून स्वतःला जिवंत जाळून घेतले, त्या हुतात्म्यांचा पत्ता कसा काय नाही ? स्वतःला एखाद्या कार्यासाठी जिवंत जाळून घेणे ही केवढी प्रक्षोभक घटना आहे ! लोकमानसावर या घटनेचा जबरदस्त नैतिक प्रभाव पडल्याशिवाय राहणे शक्य नाही. पण या सर्व घडामोडींमध्ये नेमकी हीच महत्त्वाची घटना कशी विसरली गेली ? ज्या दोन पोलीस-अधिकाऱ्यांना जमावाने जिवंत जाळले त्यांच्या कुटुंबियांना वीस हजार रुपये मदत पोहोचविण्याचा निर्णय सुब्रह्मण्यम् यांनी ताबडतोब घेतला. मग ज्यांनी या हिंदी-विरोधी आंदोलनात आपले देह आपणहून अग्निनारायणाला समर्पण

केले, त्या ' हुतात्म्यां ' ची आठवणही कोणाला शिल्लक उरू नये हे जरा चमत्कारिक गौडबंगाल वाटते. चौकशी व्हावी असाच हा विषय आहे असे जरूर जाताजाता सुचवावेसे वाटते

## राजाजींचे कार्य

ते असो. इकडे सुब्रह्मण्यम् यांचे ' हीरो 'चे काम ऐन रंगात आले असतानाच तिकडे खलपुरुष राजाजी यांची ' एंट्री ' घडून आली. त्यांनी झडप टाकून या सर्व चळवळीचे नेतृत्व आपल्याकडे घेण्याच्या दृष्टीने उघडउघड आंदोलनाला पाठिंबा दर्शविणारी भाषणे व निवेदने सुरू केली. आता कामराजकंपनीला राजाजी कंपनीचा हा हस्तक्षेप कसा मान्य होणार ! राजाजी म्हणजे मद्रासी ब्राह्मण. स्वातंत्र्यानंतर एकीकडे ' द्रविड मुन्नेत्र कळहम् 'ची मदत घेऊनच कामराज यांनी राजाजींचा काटा काढण्यास सुरवात केली असे म्हणतात, व लवकरच काँग्रेसमधून व एकूण मद्रासच्या राजकारणातून त्यांचे उच्चाटन घडवून आणले. राजाजीही बदला घेण्याची संधी कशाला सोडतील ? या चळवळीच्या निमित्ताने शास्त्री सरकारला धक्का देण्याची, उत्तर–दक्षिण असा भेद पाडून काँग्रेसच खिळखिळी करून कामकाज यांचे सर्व आसनच काढून घेण्याची संधी त्यांनीही राबवून घेतली व गोष्टी या थराला जातात हे पाहिल्यावर कामराजकंपनीही सारवासारवीला लागली. बंडाचे झेंडे भराभर गुंडाळले गेले, चळवळीची जबाबदारी गुंडांवर व डाव्या कम्युनिस्टांवर झटकण्यात आली आणि ' हीरो ' सुब्रह्मण्यम् दिल्लीच्या वाटेने नाक मुठीत धरून पुन्हा चालू लागले. ' Return of the prodigal son ' हे सुब्रह्मण्यम् यांच्या पुनरागमनावरचे दिल्लीतील एका वृत्तपत्राचे व्यंगचित्र या संदर्भात फार मार्मिक आहे. हे किंवा ' राजाजींनी १९३७ साली हिंदी मद्रास प्रांतावर लादण्याचा जो प्रयत्न केला त्या आठवणीमुळे तामीळनाडच्या जनतेत प्रक्षोभ माजला, ' हे कामराज यांचे शेवटचे निवेदन, या सर्वांचा एकत्रित विचार केला तर शास्त्री का बचावले याचा चांगला उलगडा होतो. मद्रासी कंपनी एकत्रित असती, आणि विशेष म्हणजे दुसरा कोणी देशाला मान्य होईल असा पंतप्रधान हाताशी असता तर शास्त्रींना आताच जड गेले असते, या शंकेला खूप जागा आहे.

## नवी झुंडशाही

यातला सत्तेसाठी नेहमी सर्वत्र व सर्व देशातून चालू असणारा खेळाचा भाग सोडा, पण खरा प्रश्न आहे, या सत्तास्पर्धेपायी जेव्हा हिंसाचाराचा आश्रय घेतला जातो हा. आपल्या राजकीय उद्दिष्टांसाठी जनतेला भडकावून देणे, जमावामार्फत जाळपोळी घडवून आणणे आणि काम संपताच गुंडांकडे बोटे दाखवून नामानिराळे राहणे हा हिंसाचार कैरों यांच्या खुनापेक्षा अधिक भयानक आहे. कारण कैरों गेले, त्यांचे खुनी सापडले तर फासावर चढतील, यापेक्षा दैनंदिन जीवनात सर्वसामान्य माणसाला त्याची झळ पोहोचणार नाही. पण राष्ट्रपतींचे घर आणि ग्रंथालय जाळून



अन्नमंत्री सुब्रह्मण्यम्                औट घटकेचा ' हीरो '

टाकण्यापर्यंत जी हिंसा आंधळी बनते आणि या हिंसाचाराला जबाबदार असणाऱ्या शक्ती किंवा व्यक्ती यांना कुठलेही शासन घडण्याचा धाक उरलेला नसतो, इतकेच काय, उजळ माथ्याने अशा हिंसक शक्ती समाजात वावरत राहतात, तेव्हा लोकशाहीला खरा धोका उत्पन्न होतो. ज्याच्या हाती एखादी कामगार संघटना, एखादा बजबाबदार राजकीय गट किंवा पैशाच्या थैल्या सोडून विकत घेता येणारे भाडोत्री गुंड, तो अशा तऱ्हेच्या दंगली सहज घडवून आणू शकतो, दहशत निर्माण करून आपला स्वार्थ साधून घेणे त्याला सहज शक्य होते. व्यक्ती एक की अनेक, पक्ष डावा की उजवा हा प्रश्न गौण आहे. प्रश्न आहे झुंडशाहीचा, जमावशाहीचा—ज्यात सामान्य नागरिकांचा काहीही अपराध नसताना उगाचच त्याचे दुकान जळते, त्याच्या घरावर दगडफेक होते, रस्त्यावर त्याला मारपीट होते. शहरे अशीच बेफाट वाढली की ही झुंडशाहीही वाढतच जाणार आणि अधिकाधिक संघटीतही होणार. हे आज मद्रासमध्ये घडले; कलकत्त्यात नेहमीच घडत असते; मुंबईपुण्यातही घडले नाही किंवा घडणार नाही असे नाही. तेव्हा निषेधच करावयाचा, किंवा उपाययोजना करावयाची तर ती या नव्या झुंडगिरीविरुद्ध, संघटित हिंसाचाराविरुद्ध प्रथम केली पाहिजे. कारण सामान्य माणसाला आज याचे भय आहे. उगाच अठरा वर्षांपूर्वी घडून आलेल्या एकाद्या दुर्घटनेवर तावातावाने लिहिणे, बोलणे, पत्रके काढणे, चौकशी समित्या नेमणे यात कसला पुरुषार्थ आहे किंवा सत्यशोधनाची तळमळ आहे, समजत नाही !

**श्री. ग. मा.**



# दिल्ली दरबार

'नवी दिल्ली' मधील दरबार (दरबार हॉल) राष्ट्रपतिभवनात आहे. भारताचे पहिले राष्ट्रपती कै. डॉ. राजेंद्रबाबू यांनी आपल्या सात्त्विकतेच्या व सौजन्याच्या प्रभावाने हा दरबार उजळून काढला होता. वर्तमान राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांनीसुद्धा या दरबाराचा लौकिक आपल्या राजस बुद्धियोगामुळे वृद्धिंगतच केलेला आहे. याचे अगदी ताजे उदाहरण म्हणजे त्यांनी त्यागपत्र सादर करून मद्रासकडे जावयास निघालेल्या श्री. सुब्रह्मण्यम् यांची केलेली कानउघाडणी. पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्रीजी यांचेकडे त्यागपत्र धाडून दिल्यानंतर हे केंद्रीय मंत्री राष्ट्रपतींना दोनदा भेटले. परंतु पंतप्रधानांना भेटण्याचे धैर्य काही त्यांना झाले नव्हते. अशा नाजूक प्रसंगी राष्ट्रपतींनी आपला अधिकार बजावल्याची विश्वसनीय माहिती आहे. राष्ट्रपतींनी सरकारला (मंत्रिमंडळाचे द्वारा) नुसता सल्लाच देऊन स्वस्थ बसावयाचे नसते; तर वेळप्रसंगी सावध करून इशारा (वा ताकीद) सुद्धा देण्याचा त्यांचा घटनात्मक अधिकार आहे. डॉ. राधाकृष्णन् यांच्या मध्यस्थीमुळेच श्री. सुब्रह्मण्यम् यांनी घटनादुरुस्तीचा (भाषाविषयक) अत्याग्रह सोडल्याचे समजते.

ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या जमान्यात राष्ट्रपतिभवन (व्हाइसरीगल लॉज) निर्माण झाल्याने दरबार हॉलची वास्तू तेथे आहे. स्वतंत्र भारतातही ही वास्तू तेथेच आहे, परंतु पहिले पंतप्रधान पं. नेहरू यांच्या

*दिल्लीच्या दरबाराचा दबदबा दूरवर पसरलेला आहे. त्यामुळे नवीन माणून दबकत दबकतच त्यात प्रवेश करतो. नऊ वेळा जुनी दिल्ली नष्ट होऊन नव्याने निर्माण झालेली 'नवी दिल्ली' नगरी सध्या पुरातन काळचा दरबार सामावून घेताना दिसत आहे. जुन्या दिल्लीतील लालकिल्ल्याच्या 'दिवाण-ई-खास' महालातील जहांगीर बादशहाचे शब्द विरलेले असले, तरी अद्यापही नव्या दिल्लीत भारतात 'फरदोस' (स्वर्ग) अवतरावा यासाठी स्वप्ने पाहाणारे वावरताना दिसून येतच असतात. ज्याला राज्य करावयाची धमक अंगी बाणवावयाची असेल त्याला या स्वप्नांचे वावडे असत नाही. [ जहांगीर बादशहाचे शब्द म्हणजे नुसते स्वप्न नव्हते तर त्या जमान्यातील त्याचा तो साक्षात्कार होता. 'गर फरदोस बारू अे जमीनस्त; हमीनस्त हमीनस्त' धरतीवर कोठे स्वर्ग असेल तर तो येथे आहे, येथे आहे, अशी ग्वाही त्याने देऊन ठेवलेली होती. ] अशा या दिल्ली दरबाराच्या आसमंतातील घटना यापुढे 'माणूस'च्या वाचकांसमोर सादर होणार आहेत.*

* * *

प्रभावामुळे प्रत्यक्ष 'दरबार' मात्र त्यांच्या निवासस्थानी, 'तीन मूर्ती'चे निकट, भरू लागला होता. भारतीय घटनेत त्यामुळे अशी परंपरा (वा संकेत) निर्माण झाल्यागत स्थिती आहे, की पंतप्रधान म्हणजेच सर्वेसर्वा. यामुळे स्वाभाविकपणेच श्री. शास्त्रीजी पंतप्रधान होताच हा 'दरबार' त्यांच्या जनपथावरील नव्या निवासस्थानी हिरवळीवर भरू लागलेला आहे. अर्थात संसदेची बैठक चालू असली की हा दरबार काही तास लोकसभागृहातच असलेल्या पंतप्रधानांच्या दप्तरात (कार्यालयात) चालू होतो. पं नेहरूंचा 'दरबार' सकाळी सातपासून रात्री दहापर्यंत, काही प्रसंगी मध्यरात्रीपर्यंत चालू असे. तोच पायंडा नवे पंतप्रधान श्री. शास्त्रीजी यांनी चालू ठेवलेला आहे. पं. नेहरूंच्या पंतप्रधानकीच्या प्रारंभीच्या काळात ते दरबारातच तडकाफडकी निर्णय घेत असत, असे सांगण्यात येते. परंतु गेल्या सुमारे सात वर्षांत मात्र अनेकांना असाच अनुभव येऊ लागला होता, की पं. नेहरू नुसत्या ऐकून घेण्यावरच

अधिक भर देऊ लागलेले होते. पंतप्रधान श्री. शास्त्रीजी तर प्रारंभापासूनच श्रवणभक्तीवर अधिक श्रद्धा ठेवून वावरत आहेत. त्यामुळे त्यांच्या निकटच्या सहकाऱ्यांनासुद्धा काही समयी सांगावे लागते, की 'शास्त्रीजींच्या मनाचा थांगच लागत नाही !' उत्तर भारतातील जाणकार मंडळींचे म्हणणे असे आहे, की हा कायस्थांचा गुणच आहे. श्री. शास्त्रीजी कायस्थ आहेत.

भारताचे भवितव्य भाषिक विवाद (राजभाषा हिंदीमुळे निर्माण झालेला) ठरविणार की काय, याची चिंता सध्या दिल्ली दरबारी अधिक दिसून येत आहे. कम्युनिस्ट चीनच्या सीमेवरील सज्ज फौजा व पाकिस्तानची सीमेवरील पापी दृष्टी ही संकटे सध्या जणू दृष्टिआड झाल्याजोगी अवस्था अनेक वेळा अनुभवाला येत असते. दक्षिण भारतात 'हिंदी'-च्या गायीला मारण्याचे षड्यंत्र रचले जाऊ लागले होते म्हणून उत्तर भारतात 'इंग्रजी'च्या वळूला (वासराला नव्हे) मारण्याचे मनसुबे रचले जात असल्याने शास्त्रीसरकार पेचात सापडल्यागत झालेले आहे. भाषेमुळे हे जे भीषण वातावरण निर्माण होऊ घातलेले आहे, त्यामुळे विदेशी पत्रकारांना बुचकळ्यात पडण्याजोगे वातावरण सध्या येथे आहे. त्यामुळे त्यांचेपैकी काहीजण आपापल्या देशांत कळवून मोकळे झाले आहेत, की हिंदी भाषेच्या संबंधित विवादामुळे भारताची भाषिक फाळणी लौकरच होणार असे दिसत आहे ! भारतातील कम्युनिस्ट पक्षालाही (मग ते राइटिस्ट्स असोत की लेफ्टिस्ट असोत) यामुळे आनंदाच्या उकळ्याच फुटत आहेत. कारण, त्यांची जी 'श्रद्धा' (मॉस्को-प्रणीत) आहे त्यानुसार भारत हे एक राष्ट्र कधी नव्हतेच; तेव्हा प्रादेशिक भाषांची स्वतंत्र राष्ट्रे बनून त्यांचे एक (संघराज्य) गणराज्य बनवावे अशी त्यांची महत्त्वाकांक्षा सर्वश्रुतच आहे ! लोकसभेत दि. १९ फेब्रुवारीला या नाजूक प्रश्नाची चर्चा करताना कट्टर गांधीवादी आचार्य कृपलानी यांनी जे विदारक व उपरोधिक विवेचन केले आहे ते मात्र सर्व सुबुद्ध नागरिकांनी मनन करून वाचण्याजोगे आहे. "अँथनी साहेब ! इंग्लंडमधून इंग्रजी नष्ट होऊ शकेल; पण भारतातून मात्र नाही. तेव्हा चिंता कशाला करता ?" असा टोला ह्याच देशबांधवांना हाणताना

आचार्यांनी जी मीमांसा केली आहे ती भारतातील सर्वच भाषिकांनी ध्यानी घेण्याजोगी आहे.

पुण्यामुंबईकडील मंडळींना दिल्लीपर्यंत धाव घ्यावयाची असेल तर यापुढे तिसऱ्या वर्गाच्या तिकिटासाठीसुद्धा निदान दोन रुपये अधिक खर्च करावे लागणार आहेत; याची जाणीव रेल्वेमंत्री श्री. सदोबा पाटील यांनी नुकतीच करून दिलेली आहे. ही जाणीव जनतेच्या मनात जागृत होत आहे तोच अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णमाचारी यांनी जनतेला 'कागदी' दिलासा दिला आहे की, काळजी करू नका. कारण, तृतीय पं. वा. योजनेच्या प्रारंभी प्रतिवर्षी फक्त २$\frac{१}{२०}$ टक्यानेच 'राष्ट्रीय आय' (नॅशनल अिन्कम) वाढली असली तरी १९६३–६४ सालात मात्र ही 'आय' ४$\frac{१}{२०}$ टक्याने वाढलेली आहे! तृतीय पं. वा. योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत (६४–६५ व ६५–६६) ही वाढ अधिकच होणार आहे, असे निक्षून सांगण्यास त्यांनी प्रारंभ केलेला आहे. ही घोषणा व त्याद्वारे दिला गेलेला दिलासा ऐकून सामान्य नागरिक अर्थतज्ज्ञ (व आकड्यांचा जादुगार) नसल्याने सोपी शंका प्रकट करीत आहे, की 'आय' (अिन्कम) आकड्यांत वाढ झाली हे खरे मानले तरी त्या तेवढ्या रकमेची किंमत आज घसरलेली आहे; तेवढ्याच पैशांत पाहिजे त्या जिनसा उपलब्ध होत नाहीत, हे कसे? हे कोडे कोण सोडविणार, असा त्यांचा साधा व सरळ प्रश्न आहे.

दिल्ली दरबाराचा हा कानोसा घेताना तेथे सध्या जी विविध खलबते चालू आहेत त्याविषयी आज (२१ फेब्रु.) मुद्दामच कळविलेले नाही. कारण पुढील आठवड्यात सर्व मुख्यमंत्री २–३ दिवस येथे राहून अनेक महत्त्वपूर्ण बाबींविषयी खल करणार आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळाची पुनर्रचना हा विषयही या खलबतात अनौपचारिकरीत्या चर्चिला जावा म्हणून दिल्ली दरबारातील काही प्यादी सध्या बऱ्याच उलाढाली करीत आहेत एवढे मात्र आज कळवून ठेवू शकत आहे.

—दरबारी

# समाधिस्थ चर्चिल



'I felt as if
I were
walking
with
Destiny.'



" I was conscious of a profound sense of relief. "

'१० मे १९४० : युद्धाची सर्व सूत्रे आता माझ्या हाती आली होती. प्रत्यक्ष नियतीच माझा हात धरून जणू चालत होती. माझे संबंध आयुष्य म्हणजे या दिव्य क्षणासाठी केलेली पूर्वतयारीच होती असे मला वाटले. एका गाढ व अननुभूत समाधानात मी मग्न झालो.'

चर्चिल यांचा हा आत्मानंदाचा क्षण होता. त्यांना त्यांचा 'स्वधर्म' सापडला होता व 'कुरुक्षेत्र' ही लाभले होते. 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा भोक्ष्यसे महीम्' हा क्षात्रधर्म हाच त्यांचा जन्मस्वभाव होता. म्हणूनच चेंबर्लेन यांच्या पडखाऊ शांतताकालात चर्चिल हे इंग्लंडच्या राजकारणातून बहिष्कृत झाले होते. पण महापुरुषांचे लक्षणच हे, की 'परधर्म' विलोभनीय वाटला, तरी स्वधर्माचे आचरण ते कधी सोडीत नाहीत. चेंबर्लेनच्या सुरात सूर मिसळून लोकप्रियता व मंत्रिपद टिकवून धरण्यापेक्षा बहिष्कृत अवस्थेत हिटलरच्या भीषण संकटाची घंटा एकाकीपणे निनादत ठेवणे या वीराला अधिक निकडीचे वाटले. अप्रियता, उपहास, टीका—

सतत ११ वर्षे चर्चिल यांच्या वाट्याला याशिवाय दुसरे काहीही आले नाही. पण उथळ लोकप्रियतेसाठी 'आतल्या आवाजाला' दडपून टाकणे चर्चिलसारख्या मनस्वी पुरुषाला मंजूर नसते. ऊर्ध्वबाहूने ते आपल्याला दिसलेले सत्य, पटलेला विचार लोकांना निर्भयपणे सांगत असतात—कोणी ऐको वा न ऐको, कोणी वानो वा निंदो.

अधिकारसूत्रे चर्चिल यांच्या हाती आली आणि पाचच दिवसांत हॉलंड, तेरा दिवसांत बेल्जम आणि सव्वा महिन्यात फ्रान्स हिटलरच्या तुफानी आक्रमणापुढे कोसळून पडले. पण चर्चिल शांत होते. इंग्लंडच्या भवितव्याविषयी त्यांची श्रद्धा अढळ होती. जणू त्यांना आपल्या 'कुरुक्षेत्रावर' समाधीच लागली होती..

या अखंड युद्धसमाधीत चर्चिल जे बोलत होते ते शब्द नव्हते, इंग्लिश राष्ट्राच्या आत्म्याचे ते दिव्य हुंकार होते.

'आणि मी आपल्याला आवाहन करतो...चला आपण आपली आगेकूच सुरू करू.'

'मी या सभागृहाला एकच सांगू शकतो—जे मी माझ्या सहकारी मंत्र्यांना पूर्वीच सांगितले आहे. माझ्याजवळ आपल्याला देण्यासारखें दुसरे काहीही नाही. आहे फक्त रक्त, घाम आणि अश्रू. आपल्यासमोर जे संकट आहे ते फार भीषण आहे. अनेक दिवस, अनेक महिने केवळ लढा आणि केवळ हालअपेष्टा याशिवाय दुसऱ्या कशाचीही आपण अपेक्षा करू शकत नाही. आपण विचाराल, आपले धोरण काय ? मी सांगतो—धोरणएकच. युद्ध लढवण. समुद्रावर, जमिनीवरून, आकाशातून, आपले सर्वस्व पणाला लावून हे युद्ध लढवणे हेच आपले धोरण. इतिहासात यापूर्वी अनेक रक्तपात झाले आहेत, अनेक जुलमी आणि राक्षसी राजवटी होऊन गेल्या आहेत. पण आज आपल्यासमोर उभ्या असणाऱ्या शत्रूची जात या सर्वांपेक्षा अधिक भीषण आहे, क्रूर आहे. अशा शत्रूशी युद्ध केल्याशिवाय गत्यंतरच नाही. आपले ध्येय काय असाही प्रश्न आपण विचाराल. ध्येयही एकच. एकाच शब्दात मी सांगतो, आपले ध्येय 'विजय'. कितीही किंमत द्यावी लागो, शत्रू केवढेही क्रूर स्वरूप धारण करो विजय प्राप्त करून घेणे हेच आपले एकमेव ध्येय'—

'युरोपचा बहुतेक भूभाग, युरोपचे ते इतिहासप्रसिद्ध प्राचीन देश, एका मागोमाग एक आज नाझींच्या निर्दय युद्धयंत्राखाली चिरडले जात आहेत; पण आम्ही धीर सोडणार नाही. आम्ही अखेरपर्यंत लढतच राहू. फ्रान्सच्या किनाऱ्यावर लढू, सागराच्या लाटांवर लढू, अधिकाधिक विश्वासाने आणि वाढत्या सामर्थ्याने आकाशातही या भूमीचे स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी प्रतिकार चालू ठेवू. समुद्रावर आणि आकाशातच काय ? एकेक रस्ता, एकेक टेकडी, एकेक किनाराही आम्ही प्रखर लढा दिल्याशिवाय सोडणार नाही आणि यदाकदाचित ही आपली मातृभूमी आपल्याला सोडून जाण्याची पाळी



Arm yourselves, and be ye men of valour

...... We shall fight on the beaches,
We shall fight on the landing grounds......

आलीच–असे घडणार नाही, पण दुर्देवाने घडून आलेच–तर आम्ही आमच्या वसाहतीतून हे स्वातंत्र्याचे समर अखेरपर्यंत लढवीतच राहू.'

चर्चिल असे बोलत होते. देशाचे नैतिक धैर्य, लोकांचा युद्धनिश्चय अभंग–अभेद्य राहात होता. पण अमेरिका आणि रशिया यांना युद्धात गोवून नाझी विरोधी मजबूत आघाडी उभी केल्याशिवाय यश अशक्य होते. म्हणून प्रवासाचे सर्व धोके पत्करून चर्चिल रुझवेल्टच्या भेटी घेत होते; मॉस्कोला वारी करीत होते. बॉंबहल्ल्यामुळे उद्ध्वस्त झालेल्या लंडनच्या नगरवासियांना धीराचे चार भावपूर्ण शब्द ऐकविणारेही चर्चिलच आणि दुसरीकडे ' We shall bury Hitler in Berlin ' —' हिटलरला बर्लिनपर्यन्त मारत नेऊन गाढल्याशिवाय आम्ही स्वस्थ राहणार नाही ' अशी वीरोचित गर्जना करणारेही चर्चिलच. ' जिकू किंवा मरू ' नाही. मारू आणि मारता मारता जिंकूच.

महायुद्धाची ही विशाल व्यूहरचना एकीकडे रचीत असतानाच अंतर्गत कारभारातील बारीकसारीक तपशिलाकडेही चर्चिल अवधान ठेवून होते हे विशेष. निरनिराळ्या खात्यांच्या प्रमुखांकडे ते वरचेवर चिठ्ठ्या पाठवीत. समित्या नेमण्याचे वृत्तीबद्दल वैमानिक खात्याच्या प्रमुखाला चर्चिल यांनी लिहिले होते, ' ज्यांच्या सभांसाठी मंत्र्यांना वारंवार हजर राहावे लागते पण ज्यातून काही निष्पन्न होत नाही अशा समित्या फारच वाढल्या आहेत. त्यांची संख्या कमी केली पाहिजे.' मिठाई व चॉकोलेटच्या रेशनिंगबद्दल अन्नखात्याला त्यांनी लिहिले, ' मिठाई आणि चॉकोलेट यांचेही रेशनिंग करण्याचा विचार आहे असे ऐकतो. रेशनिंगच्या नियमांबद्दल अनादर उत्पन्न होईल अशी कोणतीही योजना गैरच समजली पाहिजे. ज्यांची अंमलबजावणी करणे कठीण असते असे कृत्रिम नियम व कायदे केल्याने नियमांना किंवा कायद्याला चुकविण्याची घातकी सवय समाजात पसरते. ' करमणुकीवरील कराबाबत लॉर्ड चारवेल यांना त्यांनी लिहिले, ' करमणुकीवर जबर कर बसवायच्या मी अगदी विरुद्ध आहे. ' दुःखी व्हा ' हा आदेश मला पसंत नाही. '

असे हे युद्धनेते चर्चिल पाच वर्षे रात्रंदिन युद्धाचा प्रसंग करीत होते. एका विलक्षण समाधीत तल्लीन होते. पण २६ जुलै १९४५ ला चर्चिल यांची ही समाधी भंग पावली. ब्रिटनमध्ये युद्धोत्तर निवडणुका झाल्या आणि त्यात चर्चिल यांच्या पक्षाचा पराभव झाला. त्यांच्या युद्धकालीन कर्तृत्वाबद्दल इंग्लिश जनता कृतज्ञ होती. पण आता तिला उद्ध्वस्त संसाराची मांडामांड करण्याची ओढ लागली होती आणि यासाठी चर्चिलसारखा ' योद्धा ' कशाला हवा ! मध्यम कुवतीचा एखादा समजूतदार व्यवस्थापक अशा कामाला योग्य असा समंजस विवेक इंग्लिश जनतेने केला आणि अॅटलींना पंतप्रधानपद बहाल केले.

निवडणुकीचे निकाल लागले त्या दिवशी चर्चिल पॉट्सडॅम येथे ट्रूमन–स्टॅलिनसमवेत युद्धोत्तर युरोपच्या पुनर्घटनेच्या वाटाघाटीत गुंतलेले होते. अपेक्षाभंगाच्या दारुण दुःखात चर्चिल बुडून गेले. जिव्हारी जखम व्हावी अशा आर्ततेने त्यांनी लिहिले, ' Just before dawn I awoke suddenly with a sharp stab of almost physical pain. A hitherto subconscious feeling that we were bitten, broke forth & dominated my mind. '

' The decision of the British people has been recorded in the votes counted to–day. I have therefore laid down the charge which was placed upon me in darker times.

खरोखरच चर्चिल यांनी युद्धसमाप्तीनंतर ४५ साली संन्यास घेतला असता तर ? पण अर्जुनाला जसा श्रीकृष्ण भेटला तसा चर्चिल यांना कोणी कर्मयोग सांगणारा गुरू भेटला नाही. म्हणूनच ' मा फलेषु कदाचन ' हे त्यांना जमले नाही पुढची सात वर्षे पुन्हा ते पक्षीय राजकारणाच्या गढूळ वातावरणात रममाण झाले आणि जवळजवळ बळजबरीनेच त्यांना अखेरीस सेवानिवृत्त केले गेले.



In darker times

पण इंग्लिश जनता आणि सारे स्वतंत्र जग त्यांना विसरले नाही, विसरू शकले नाही. १९४० चे झुंजार चर्चिल इतिहासात अमर ठरले आणि हीच त्यांची महत्त्वाकांक्षा होती—असे काही लोकविलक्षण कर्तृत्व गाजवावे की काळावर आपली छाप उमटावी, इतिहासात आपले नाव अजरामर ठरावे. चर्चिल यांची आकांक्षा सफल झाली. त्यांचे जीवन सर्व दृष्टीने परिपूर्ण ठरले. □



on July
26 th, 1945

In 1931 I suggested that we ought to hang him because of his attitude to India. A few years later I called him ' the oldest old woman in Europe '– a comment on his dangerous view of England and the Empire. But in 1940 I found myself writing a lengthy eulogy because, but for him, we might well have been overrun by the Nazis. The fact is that history has been extraordinarily good to him. We were quite right that Winston's love of war was dangerous, that he was incapable of appreciating any but a picture of the world run by a few great powers, with the rest–the lesser brveeds–without the law. But it happened that there was once more an opportunity or a need for the single-minded nationalists. ' After the war the empire— builder would have destroyed us. It is a thousand pities that he did not retire in 1945. But every thing will be forgiven him because of 1940.

—*Kingslay Martin*

● ● ●

# व्यक्ती आणि वार्ता

## □ केंद्राधिकारी केळकर

भाषेच्या प्रश्नावर देशात एकीकडे जाळपोळ करण्यापर्यंत मजल जात असता भाषाभगिनी एकमेकींची प्रेमाने, आपुलकीने विचारपूस करीत आहेत, ही मोठी समाधानाची गोष्ट आहे. या क्षेत्रात आजवर नाव ऐकू येत होते, ते सानेगुरुजींच्या 'आंतरभारती' संस्थेचेच. भारतातील निरनिराळ्या भाषांतील साहित्याचा, साहित्यिकांचा एकमेकांशी परिचय घडवून आणण्याचे कार्य ही सानेगुरुजींची संस्था निष्ठेने गेली काही वर्षे करीत आहे. पण आता सरकारी पातळीवरही अशा सांस्कृतिक कार्याला मान्यता लाभली आहे व बऱ्याच राज्यांच्या शासनाकडून हे परस्पर परिचयाचे कार्य सुरू करण्याच्या हालचाली दिल्लीस चालू आहेत.

अभिनंदनाची गोष्ट अशी की, आपल्या महाराष्ट्र शासनाने याबाबत आघाडी गाठली आहे. दिल्लीतील 'महाराष्ट्र परिचय केंद्र' गेली पाचसात वर्षे हे सांस्कृतिक परिचयाचे कार्य मोठ्या पद्धतशीररीतीने वाढीस लावीत आहे. याचे मुख्य श्रेय अर्थातच या केंद्राचे प्रमुख अधिकारी श्री. भा. कृ. केळकर यांच्या तळमळीकडे व कल्पक नियोजनाकडे जाते.

सुरवातीपासूनच या केंद्राची जबाबदारी श्री. केळकर यांचेकडे आली. अशा तऱ्हेची केंद्रे कशी असतात, त्यांचे कार्य कोणत्या पद्धतीने चालते याचा कसलाही नमुना नजरेसमोर नसतानाही जवळजवळ शून्यातून त्यांनी या केंद्राला आजचे स्वरूप प्राप्त करून दिले आहे. परप्रांतियांमध्ये व सुशिक्षित महाराष्ट्रीयांमध्ये या केंद्राविषयी आज काही विशेष अपेक्षा निर्माण झाल्या आहेत हेच या कार्याचे स्वाभाविक मूल्यमापन. नुकतेच मुंबईला 'शिवराय मंडळातर्फे' 'बांधिली पूजा शिवरायांची' या नावाचे शिवाजीमहाराजांच्या किल्ले-कोटांचे नमुनेदार प्रदर्शन भरले होते. या प्रदर्शनावर कौतुकाचे स्फुट लिहिताना मुंबईच्या 'मार्मिक' पत्राने शेवटी अशी सूचना केली, की हे प्रदर्शन 'महाराष्ट्र परिचय केंद्राने' दिल्लीत भरवावे व परप्रांतियांना शिवाजीमहाराजांच्या कार्याचा परिचय घडवून आणण्याचे पुण्य पदरी बांधावे. जनतेकडून अशा अपेक्षा व्यक्त होणे हेच एखादे कार्य मूळ धरू लागत असल्याचे खरे लक्षण होय. पर-



[ चर्चा, व्याख्याने, पुस्तकप्रकाशने, प्रदर्शने या ‘ उच्च ’ चळवळींबरोबरच संपर्क साधण्यासाठी कधीकधी चहापानासारख्या हलक्याफुलक्या माध्यमाचाही उपयोग होऊ शकतो. किंबहुना प्रामाणिकपणेच सांगायचे तर व्याख्यानांपेक्षा चहाच बरा असेच बहुतेकांचे मत पडेल. या बहुमताचा मान राखण्यासाठी केळकर कधीकधी चहापानाचे समारंभही ‘केंद्रा’तर्फे घडवून आणीत असतात.

साहित्य ॲकेडेमीचे १९६४ चे पुरस्कार लाभलेले सर्व भाषातील लेखक राष्ट्रपति-भवनातील समारंभासाठी दिल्लीत नुकतेच एकत्र जमले होते. ही संधी साधून ‘ महाराष्ट्र परिचय केंद्रा ’तर्फे सर्वांसाठी चहापानाचा एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी (डावीकडून) सर्वश्री गोपाल रेड्डी, मोघे, भा. कृ. केळकर आणि रणजित देसाई. ]

*

प्रांतियांमध्येही या केंद्राबद्दल अपेक्षांचा असाच प्रवाह सुरू झालेला दिसतो. गेल्या वर्षी या केंद्रातर्फे ‘ हरी नारायण आपटे जन्मशताब्दी महोत्सव ’ दिल्लीत साजरा झाला. ‘ हरी नारायण आपटे ’ यांच्या वस्तूंचे एक प्रदर्शनही या निमित्ताने तेथे केळकरांनी भरवले होते. हेच प्रदर्शन पुढे आंध्र राज्य सरकारच्या निमंत्रणावरून हैद्राबादमध्ये पुन्हा भरविण्यात आले. या प्रदर्शनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री नाईक मुद्दाम हैद्राबादला गेले होते. अनंत काणेकरही या समारंभास मुद्दाम उपस्थित होते. या प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी भाषण करताना माजी नभोवाणीमंत्री गोपाल रेड्डी असे म्हणाले,

“ The function of Apte Centenary at Hydrabad sponsered by this Centre has started a new era in the movement of inter–state understanding. ”


अशा सांस्कृतिक एकात्मतेच्या प्रयत्नात ‘महाराष्ट्र परिचय केंद्र’ अग्रेसर राहावे, यासाठी अर्थातच केळकरांचे एकट्याचे श्रम अपुरे आहेत. महाराष्ट्र शासनाचे हे काम आहे, असे म्हणून इतरांनी उदासीन राहण्याचे कारण नाही. इतर सरकारी खाती जशी चालतात, तसे हे आणखी एक खाते, हे स्वरूप त्याला प्राप्त होऊ नये. नाहीतर त्यातील आजचा जिवंतपणा नाहीसा होण्यास वेळ लागणार नाही. यासाठी दिल्लीतील महाराष्ट्रीय समाजाने व त्याहीपेक्षा जास्त म्हणजे महाराष्ट्रीय खासदार मंडळींनी या कार्याला आपलेच कार्य समजून उचलून धरले पाहिजे. ‘हरी नारायण आपटे’ यांचे पोस्टाचे तिकीट भारत सरकारने त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त काढावे अशी या केंद्राने खटपट केली, पण यश आले नाही. येथे महाराष्ट्रीय खासदारांनी आपले वजन केंद्र सरकारच्या दरबारात खर्च करण्याचा प्रसंग होता, पण कोणी तसा प्रयत्न केला नाही. या गोष्टी मामुली वाटतात, पण इतर प्रांतांचे आमदार-खासदार अशा प्रसंगात स्वत: लक्ष घालून पाहिजे ते घडवून आणतात, असा अनुभव आहे. महाराष्ट्रातूनही या केंद्राच्या कार्याला साथ देता येईल. जी माहिती, जे विचार, ज्या कलाकृती परप्रांतियांपर्यंत पोहोचाव्यात, त्यांचे ओघ महाराष्ट्रातून या केंद्राकडे सतत वाहत राहिले पाहिजेत, तरच या केंद्राला केवळ माहिती पुरवणारी निर्जीव संस्था असे रूप न येता ती सांस्कृतिक संगमाचे खरे प्रतीक बनेल.

या केंद्रातर्फे एक ग्रंथालय दिल्लीत चालवले जाते. संदर्भासाठी केंद्र सरकार-कडून किंवा वृत्तपत्रे, इत्यादींकडून माहितीसाठी या केंद्राचा उपयोग केला जातो. महाराष्ट्रीय चित्रकृतींचे एक प्रदर्शन या केंद्रातर्फे गेल्या वर्षी दिल्लीत भरविण्यात आले होते. विशेष म्हणजे पंतप्रधान पंडित नेहरूंनी या प्रदर्शनाला भेट देऊन या उपक्रमाचे स्वागत केले. महाराष्ट्रातील भिन्नभिन्न क्षेत्रांतील कर्तबगार व्यक्तींची छोटी छोटी चरित्रे इंग्रजीतून केंद्रामार्फत प्रसिद्ध होत आहेत. मराठीतील निर-निराळ्या क्षेत्रांतील नामवंत व्यक्तींची व्याख्यानेही केंद्रातर्फे होत असतातच. जन्मशताब्दी साजरी करणे हा तर श्री. केळकरांचा आवडता छंदच झालेला दिसतो. पुढील वर्षी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांची जन्मशताब्दी येत आहे. केळकर तयारीला लागलेलेच आहेत. या भूतकालीन व्यक्तींच्या स्मृतिजागरणाप्रमाणेच वर्त-मानकालीन महाराष्ट्राच्या विकासाचे दर्शन परप्रांतियांना घडवावे अशी त्यांची धड-पड असते. याच महिन्यात दिल्लीतील मोठ्या वृत्तपत्रांच्या काही खास प्रतिनिधींना महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने दाखवण्याचा एक कार्यक्रम केंद्रातर्फे आयो-जित केला गेला आहे. हे वृत्तपत्रप्रतिनिधी कोल्हापूर, नगर भागांतील सहकारी साखर कारखान्यांची प्रगती डोळ्यांनी पाहतील, तेथील कार्यकारी मंडळींकडून माहिती जमा करतील, डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञांबरोबर विचार-विनिमय करतील, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना मुंबईला भेटतील, या दौऱ्याचे

आपले अनुभव-विचार वृत्तपत्रांतून प्रसिद्ध करतील. केंद्राच्या या व अशा नवनवीन उपक्रमांचे बीज महाराष्ट्रात आणि परप्रांतांतही झाल्याशिवाय कसे राहील ?

इतर राज्ये आपापली परिचयकेंद्रे दिल्लीत उघडण्याच्या विचारात आहेत. काहींनी सुरूही केली आहेत. महाराष्ट्र शासन, दिल्लीतील महाराष्ट्रीय खासदार, इतर वजनदार मराठी नेते व महाराष्ट्रातील सुशिक्षितवर्ग यांनी 'महाराष्ट्र परिचय केंद्र' सतत आघाडीवर ठेवण्याच्या केळकरांच्या प्रयत्नाला सर्वतोपरी सहाय्य करणे अगत्याचे आहे. गोपाळ रेड्डी यांनी म्हटल्याप्रमाणे खरोखरच हे केंद्र नव्या आंतरप्रांतीय सामंजस्याचे प्रतीक ठरण्यात सर्वांचेच हित आहे. □

## □ बहुरंगी विनोदी चित्रांचे प्रदर्शन



चतुर चित्रकार फडणीस

चित्रकार श्री. शि. द. फडणीस यांच्या मूळ चित्रांचे ( originals ) पहिलेच प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरी, मुंबई येथे दि. २६, २७ व २८ फेब्रुवारी १९६५ या तीन दिवस भरले होते.

गेल्या बारा वर्षांतील त्यांनी चितारलेल्या बहुरंगी चित्रांपैकी काही निवडक कलाकृती यामध्ये प्रामुख्याने होत्या. त्याचबरोबर पुस्तकांची मुखपृष्ठे, एकरंगी रेखाचित्रे व विनोदी शैलीतील जाहिराती इ. काही मोजके प्रकार, चित्र-शैलीतील विविधता दर्शवण्याकरता या प्रदर्शनात ठेवले होते.

ही चित्रे चित्रकलेच्या कोणत्या शैलीतील अगर पंथातील आहेत असे नव्हे. चित्रविषय आहेत मनुष्य स्वभावाच्या गंमती, विक्षिप्तपणा, विसंगती व क्वचित मूर्खपणाही. त्यामुळे चतुर प्रेक्षकांशी ती चटकन् संपर्क साधतात. विनोदबुद्धी आणि सौंदर्यदृष्टी असलेल्या कुणाही रसिकाशी ती दिलखुलास बातचीत करतात.

फडणीस यांनी हे प्रदर्शन लवकरच पुणे येथेही भरवावे.

●

# बिली

• अशोक जोशी



" म्याँऽऽव..."

" येऽऽ. बिली ये. पिस्, पिस्, पिस्. "

" म्याँऽऽव. "

" येऽऽऽ. "

" अरे आता ते मांजर कशाला पाहिजे अभ्यास करताना ?"

" म्याँऽऽऽव. "


" मी कुठं बोलावतोय् तिला ? तीच येते. "

" हे बघ, उगीच नादिष्टपणा करीत बसू नकोस. अभ्यास कर. आज तिसरा संग्रह सोडवून मगच शाळेत जायचं हं, नाहीतर जेवायला मिळणार नाही. "

एवढं बजावून आई खाली निघून गेली. ती गेल्यावर श्रीकांतचा अभ्यास सुरू झाला. एक गणित सोडवून झाले. दुसरे झाले. इतक्यात खुर्चीखालून आवाज झाला.

" म्याँऽऽव. "

श्रीकांतने आता मुळीच लक्ष द्यायचे नाही, असे ठरविले होते. त्याने मोठ्या निग्रहाने तिसऱ्या गणिताला हात घातला. बिलीचे म्याँव म्याँव सुरू होतेच.



आता बिली त्याच्या पायाला अंग घासू लागली, अंग घासता घासता मधेच आपल्या पाठीची कमान करून आळस देत होती. तिची आता झोपेची वेळ झाली होती. श्रीकांतच्या मांडीवर नाहीतर गॅलरीत ठेवलेल्या गाद्यांवर ती झोपणार होती.

थोडा वेळ अंग घासल्यावर बिलीने हळूच श्रीच्या मांडीवर उडी घेतली. श्रीची त्याच्या गणिताशी चांगलीच झटापट चालली होती. बिली मांडीवर आल्यावर त्याने तिला खाली ढकलून दिले व पुन्हा तो आकडेमोड करू लागला.

बिलीने शेजारच्या खुर्चीवर उडी मारली आणि श्रीच्या तोंडाकडे बघून ओरडायला सुरवात केली. बिली इतक्या आर्जवीपणे ओरडत होती की श्रीला तिची दखल घेतल्याशिवाय राहवेना. त्याने मान वळवून तिच्याकडे पाहिले.

" म्याँऽऽव. "

" काऽऽय ?"

" म्याँऽऽऽव. "

" काय पायजे ?"

श्री लाडात आलेला पाहून बिलीने एकदम टेबलावर उडी मारली आणि म्याँव म्याँव करीत ती श्रीच्या छातीला अंग घासू लागली. श्वास घेताना तिच्या पोटात होणारी गुरगुर स्पष्ट ऐकू येत होती.

आता मात्र श्रीला राहवले नाही. त्याने बिलीला चटकन मांडीवर घेतले आणि तो तिला कुरवाळू लागली. बिलीच्या पोटातली गुरगुर आता तालात सुरू झाली होती. तिने आपले चारही पाय खूप जवळ आणले होते. शेपटी पोटाला चिकटवली होती. श्रीला हसू आले.

" बसली का ठाण मांडून ?"

" म्याँऽऽव. "

" म्याँव काय ?"

" म्याँऽऽऽव. "

" जा तिकडे गाद्यांवर जाऊन बस. मला अभ्यास करायचाय्. "

" म्याँऽऽऽव. "

" म्याँव काय चल, ' असे म्हणून श्रीने तिला खाली ढकलून दिले. श्री पुन्हा अभ्यासाला लागला, पण थोड्या वेळाने बिली पुन्हा मांडीवर आल्याचे त्याला तिच्या श्वासांच्या आवाजावरून समजले.

" लोचट कुठली. गणितं झाली नाहीत तर जेवायला काय तू घालशील ?"

" म्याँऽऽव. "

" नाही ना ? मग जा. गादीवर जाऊन झोप. "

आता श्रीने तिला उचलले आणि गॅलरीतल्या गाद्यांवर नेऊन ठेवले. गाद्यांवर सकाळचे कोवळे कोवळे ऊन आले होते. बिलीलाही ती जागा पसंत पडली. श्री पुन्हा खोलीत जाऊ लागला. जाता जाता त्याने मागे पाहिले. बिली आपले अंग साफ करीत होती.

मागच्या दोन पायांमधून तोंड घालून ती शेपटी चाटत होती. श्रीला एकदम हसू आले. तो आवाज ऐकताच बिलीचे त्याच्याकडे लक्ष गेले व ती एकदम ओरडली, " म्याँऽऽव. "

" नको. तिथंच बसा आता, " असे म्हणत श्री आत निघून गेला.

श्रीचा अभ्यास पुन्हा सुरू झाला. त्याने घड्याळाकडे पाहिले, पावणेदहा झाले होते. अजून पाच गणिते राहिली होती. त्याने झटपट पान उलटून पुढचे गणित पाहिले. ' क 'ने चार तास काम केल्यावर तो निघून गेला, नंतर तेच काम ' ख ' व ' ग 'ने करायला सुरवात केली. उरलेल्या कामाच्या एक तृतीयांश काम झाल्यावर............

दहा वाजले तशी श्री उठला आणि दप्तर भरू लागला. ' मराठी, इतिहास,

शास्त्र, गणित.........आणि हो, आज पाचवी ए., बी. आणि सी. ला सिनेमा आहे. म्हणजे शेवटचे दोन तास ऑऽऽफ.' श्रीचे मनातल्यामनात चालले होते.

बिली ओरडत होती. श्री एकदम हातातली पुस्तके टेबलावर टाकून गॅलरीत पळाला. बिली गाद्यांवर केस ताठ करून उभी होती आणि ओरडत होती. तिची शेपटी इकडे तिकडे हलत होती. शेपटीवरील केसही ताठ झाल्याने शेवटी मोठा झुपका दिसत होता. गाद्यांच्या खाली एक काळाकुट्ट बोका, पुढचे दोन पाय गाद्यांवर उडी मारण्याचे तयारीत ठेवून, बिलीकडे पाहात उभा होता.

हे श्रीने पाहिले मात्र. तो हळूच आत गेला आणि कुंचा घेऊन बाहेर आला. कुंच्याचा बुडखा वर उगारून तो हळूहळू त्या बोक्याच्या दिशेने जाऊ लागला. इतक्यात त्या बोक्याला श्रीची चाहूल लागली. त्याने मागे पाहिले आणि कुंच्याचा मार चपळाईने चुकवून तो पळून गेला.

आईची हाक दणाणली, त्यासरशी भराभरा पुस्तके दप्तरात कोंबून श्री खाली पळाला.

" काय रे, त्या बिलीशी खेळत होतास ना ? "

" नाही ग. माझा संग्रह सोडवून झाला. हा बघ."

" मग काय चाललं होतं ? तिचे पायबिय बांधून ठेवले असशील."

" अग नाही, त्या शेजारच्या वाड्यातला तो काळा बोका आहे ना ? तो आला होता, "

आईने आमटी ढवळायला सुरवात केली. श्रीकांत पाटावर बसला. आई त्याला वाढू लागली.

" अग, तो बोका सारखा येतो लोचटासारखा ! परवा रात्रीसुद्धा बिली याच बोक्याशी भांडत होती. ते नाही का — आपल्या बाबांनी रात्री काठी घेऊन हाकललं, ते........."

" भातावर आमटी घालू की वरण घालू ? "

" मी कुंचा घेऊन गेलो होतो असा ! अगदी थोडक्यात हुकलं बघ. बोक्याची पाठ चांगलीच शेकणार होतो. "

" बरं, चल आता. पटपट जेव. शाळेला उशीर होईल. "

" पण तो कशाला आला होता गं ? "

" अरे, बिलीनंच त्याची खोडी काढली असेल. "

" हे ऽ बिली नाही त्याची खोडी काढायची, कसला कळाकुट्ट आहे तो ! "

" बरं, चल आटप, पावणेअकरा वाजले, मग बाहेर उभं करतात नं ? "

श्रीने भराभर जेवण संपविले आणि तो दप्तर घेऊन शाळेत निघाला—जाता जाता त्याने सहज गॅलरीत पाहिले. बिलीने मान पायात घालून शरीराचे मेंडोळे केले होते आणि ती स्वस्थ झोपली होती. श्रीला पुन्हा हसू आले.

श्रीला बिलीशिवाय अगदी करमायचे नाही. मधल्या सुटीत आणि शाळा सुटल्यावर श्री घरी आला की वाड्याच्याच्या दारातूनच ओरडायचा, " बिलीऽऽऽ, " आणि कुठून तरी आवाज यायचा " म्यॉंऽऽव. " थोड्याच वेळात बिली धावत येऊन श्रीच्या पायांना अंग घासू लागायची. मग श्री रुमाल किंवा दप्तराचा पट्टा तिच्या समोरून सरकवत सरकवत न्यायचा. एखाद्या उंदरावर झडप घालावी तशी बिली त्या पट्ट्यावर उडी मारत असे. शाळेतून घरी आल्यावर पाच–दहा मिनिटे हाच गोंधळ चालायचा. आईने एक दोन वेळा दटावल्यावर मग कुठे स्वारी घरात यायची.

बिली जेव्हा प्रथम घरात आली तेव्हा अगदी लहान होती. तिला बोक्याने खाऊ नये म्हणून तिच्या गळ्यात आईने बांगडी अडकवली होती. बिलीच्या रंगी–बेरंगी अंगावर ती तांबडी बांगडी फार मजेदार दिसे. बिलीचा रंग मोठा छान होता. किरमिजी आणि पांढऱ्या अशा दुरंगी घडुल्याची जणू छोटीशी उशीच !

बिलीला प्रथम बाबांनी करंडीत घालून आणले. नवी नवी माणसं पाहिल्यावर ती एकदम जी कपाटाखाली जाऊन बसली, ती बाहेरच येईना, तेव्हा आईने कपाटापुढे दूध घालून बशी ठेवली आणि सगळे निघून गेले. थोड्या वेळाने हळूच बाहेर येऊन तिने दूध पिऊन टाकले, श्रीच्या घरातले हे पहिले दूध पिणे !

हळूहळू––सकाळी दूधवाला आला की बिली त्याच्यामागे दारापासून लागे. एकदा तर तो म्हणाला की ' बाई, तुमचं मांजर माझ्या पायाखाली सापडून मरणार. ' पण तोही तिच्या वाटीत थोडे दूध घालून जायचा.

एक दिवस श्री शाळेतून घरी येत होता. येता येता त्याने एका माणसाला रस्त्यावर एक मेलेला उंदीर टाकताना पाहिले. श्री थोडा वेळ थांबला. तो माणूस आत गेल्यावर रस्ता ओलांडून श्री पलीकडे गेला. त्याने तो उंदीर शेपटीला धरून उचलला आणि तो झपझप घरी येऊ लागला. वाटेत मुले त्याला हसत होती, पण त्याचे तिकडे लक्षच नव्हते. वाड्याच्या दारात आल्यावर त्याने हाक मारली, " बिलीऽऽऽ. " पण उत्तर आले नाही, त्याबरोबर त्याचा चेहरा थोडा उतरला. तो घरात गेला आणि त्याने आईला विचारले,

" बिली कुठाय् ग ? "

" असेल कुठे तरी. "

आई घरातले दुभत्याचे कपाट साफ करत होती. तिने श्रीला ऑर्डर सोडली,

" अरे तो फळीवरचा पॉयशा दे रे जरा. "

" आधी बिली कुठाय् ते सांग. " श्री रडवेला झाला होता. आईलाही त्याच्या स्वरातला फरक जाणवला. काय झाले म्हणून बघायला ती बाहेर आली तो......

गळ्यातले दप्तर तसेच. डोळे भरून आलेले, डाव्या हातात दौत आणि उजव्या हातात उंदीर.

आई सर्दच झाली. त्याची रडवेली अवस्था पाहून तिने थंडपणे विचारले,

" ते काय आणलं आहेस ? "

" उंदीर. "

" कुठे मिळाला ? "

" रस्त्यात. "

" तो कशासाठी आणलास ? "

" बिलीसाठी. "

" शी ऽ ऽ ! घाणेरडा कुठला ! " असे म्हणून आईन हातातल्या कुंच्याने त्या उंदरावर फटका मारला, पण तो उंदीर कुंच्यातच अडकला, त्याबरोबर आईने घाबरून कुंचा खाली टाकला, तेव्हा तशा स्थितीतही श्रीला हसू आले.

" अग मेलेला आहे तो. "

" असू दे. पण तो घरात का आणलास ? जा. टाकून ये तो. आधी जा. जा म्हणते ना ? "

" मी तो बिलीला देणार आहे. "

" तुला ऐकू येतं की नाही ? "

आई आता खूपच चिडली होती, पण श्री घुम्यासारखा उभा होता. त्याला खात्री होती की आई काही उंदीर बाहेर नेऊन टाकत नाही. आईच्या रागाचा पारा चढतच होता. इतक्यात कुठून तरी आवाज आला,

" म्याँऽऽव. "

त्याबरोबर श्रीने उंदीर ताब्यात घेतला आणि " बिलीऽऽऽ, ये, " असं ओरडतच तो बाहेर पळाला.

एकदा असाच एक सुटीचा दिवस होता. बिली गॅलरीतल्या गाद्यांवर कोवळ्या कोवळ्या उन्हात पडली होती. श्री तिच्यापुढे 'यो यो' खेळत उभा होता. यो यो वर-खाली जाई तशी बिली मान वर-खाली करून त्याकडे बघत होती. श्रीने यो यो जवळ आणला तर मधूनच त्यावर पंजा उगारीत होती.

चिमण्यांचा चिवचिवाट चालला होता. त्या एकसारख्या इकडून तिकडे उडत होत्या. यो यो प्रमाणेच प्रत्येक चिमणीकडेही बिलीचे बारकाईने लक्ष होते. एखादी चिमणी बराच वेळ बसली की बिलीची चुळबुळ सुरू व्हायची. हलकेच बसल्या बसल्याच ती झेप घेता यावी म्हणून पुढचे पाय थोडे पुढे करून ती तयार राहायची. अगदी आता झेप घ्यायला हरकत नाही असे तिला वाटले की शेपटी अस्वस्थपणे हलवीत पोटाची अशी विलक्षण हालचाल करी की अगदी किरण साधणाऱ्या वाघाचीच आठवण व्हावी; पण बहुतेकवेळा तिने उडी मारायच्या आतच चिमणी उडून जात असे.

पण एकदा मात्र तिला संधी मिळाली. एक चिमणीचे पिलू गॅलरीच्या कठड्या-

वर येऊन बसले. पुन्हा दुसरीकडे जाताना ते उडू लागले, तोच धाडकन गॅलरीत पडले. बहुधा पहिल्यांदाच ते मोठ्या मोहिमेवर निघाले असावे. पिलू खाली पडलेले पाहताच बिलीने एकदम त्याच्यावर झेप घेतली आणि त्याला तोंडात धरून ती इकडे तिकडे बघू लागली. पिल्लू बिलीच्या तावडीत सापडलेले पाहाताच सर्व चिमण्या भोवताली कलकलाट करू लागल्या.

श्रीच्या मनातून खरे म्हणजे बिलीने ते पिल्लू धरू नये असे होते, पण काय होते आहे हे समजायच्या आतच सर्व घटना घडल्या. चिमण्यांचा कलकलाट ऐकल्यावर तो त्या पिलाला सोडविण्यासाठी बिलीच्या मागे लागला. तो आपल्या मागून येतो आहे, असे पाहून बिली पळाली आणि कपाटाखाली जाऊन बसली, पण श्री आता पुरता भडकला होता. त्याने धुणं वाळत घालायची काठी आणली आणि ती कपाटाखाली घालून बिलीला हुसकले. बिली तिथून पलंगाखाली गेली. श्रीने पलंगाखालीही काठी ढोसायला सुरवात केली. श्री जवळ आला की बिली त्या बोक्याशी भांडताना जशी ओरडत असे तशी ओरडत होती. त्यामुळे श्रीच्या रागाचा पारा जास्तच चढत होता.

बिली त्याला गुंगारा देऊन बाहेर पळाली आणि पत्र्यावर निघून गेली. श्रीही तितक्याच जोराने तिच्यामागून जाऊ लागला, पण तितक्यात दारातल्या आईने त्याला अडविले.

" अरे, काय चाललंय् काय ? "

श्री काहीच बोलला नाही. मिळालेल्या अपयशामुळे तो रडकुंडीला आला होता. तो खाली मान घालून आत गेला आणि पलंगावर उपडा निजून राहिला.

सबंध दिवस तो अवस्वस्थ होता. बिली चिमणी फस्त केल्यावर नेहमीप्रमाणे घरात आली, पण आता श्रीने तिच्याशी गट्टी फू केली होती. तिला तो दुपारी दूध घालीत असे, पण आज त्याने तेही घातले नाही. बिली त्याच्याकडे नेहमीप्रमाणे येत होती. त्याच्या पायांना अंग घासत होती; पण श्री तिच्याकडे लक्षच देत नव्हता. ती मांडीवर बसू लागली की तिला फटकारत होता. हे इतके झाले की ते बाबांच्याही लक्षात आले. एकदा बिली मांडीवर आल्यावर श्रीने तिला फाटकन फटका मारून बाजूला सारले. तेव्हा बाबा म्हणाले,

" काय रे, आज काही बिनसलं काय ? असं मारू नये मुक्या प्राण्याला. "

" मग तिनं चिमणीचं पिलू का खाल्लं ! " श्री रडवेला होऊन म्हणाला,

" मग ती उंदीर खाते तेव्हा तू काय करतोस ? "

" मग उंदीर आपल्याला त्रास देतात. "

" बरं बरं, चालू दे तुमचं भांडण. " बाबांना या आगळ्या भांडणाचे हसू आले.

रात्री झोपेपर्यंत हे असेच चालू होते. रात्री गॅलरीत गादी टाकून श्रीने गादीला पाठ लावली मात्र इतक्यात त्याच्या पायांखालून आवाज आला.

" म्यॉंऽऽव ".

श्रीने लक्षच दिले नाही.

" म्यॉंऽऽऽऽव ".

श्री डोळे मिटून पडून राहिला होता.

" म्यॉंऽऽऽऽऽऽऽऽव " बिली अंगाला अंग घाशीत त्याच्या हातापर्यंत आली. तिच्या पोटांतली गुरगुर ऐकू येत होती. बिली श्रीच्या पोटावर चढली. त्याचा दंड हुंगत हुंगत ती त्याच्या गालापर्यंत आली. मग मात्र श्रीचा बांध फुटला. तो पटकन उठून बसला. त्याने बिलीला पोटाशी धरले, तो तिला कुरवाळू लागला.

" नाही ना पुना अस कलणाल ? अं ? अशी पिल्लं खाऊ नयेत अं ?"

श्रीच्या डोळ्यांतून अश्रू ठिबकत होते आणि बिली पुनःपुन्हा आपले कपाळ त्याच्या गालाला घाशीत ओरडत होती, " म्यॉंऽऽव ".

बिलीचे पोट हळूहळू मोठ झाले होते. श्रीला प्रथम वाटले ती खाऊन खाऊनच लठ्ठ झाली आहे. म्हणून तो आईला सांगू लागला.

" आई, आता बिलीला दूध कमी घालत जा. "

" का रे बाबा ?"

" बघ किती माजली आहे ती. आता मागच्यासारखी खेळतही नाही ".

आई हसू लागली. त्याबरोबर श्रीने विचारले. " का ग हसतेस ?"

आई का हसते ते श्रीला बिलीची पिल्ले पाहिल्यावर कळले.

एक दिवस सकाळी त्याने बिलीला कोळशाच्या खोक्यात जाताना पाहिले. त्याबरोबर " एऽऽ त्या घाणीत कशाला जाते ? " असे म्हणून तो त्या खोक्याकडे धावला, खोक्यात पाहतो तो बिली आपल्या पिल्लांना पाजत होती. पिल्ले तिच्या पोटात तोंड लावून लुचत होती आणि बिली एका एका पिल्लाला चाटत होती.

पिल्ले पाहिल्यावर श्रीने एकदम उडी मारली आणि ओरडून म्हणाला, " आई, बघ आपल्या बिलीला पिल्लं झाली आहेत. " यावर आई काय बोलते हे ऐकायलाही तो थांबला नाही. त्याने ही बातमी वाड्यातल्या सगळ्या पोरांना सांगितली. नीतिन, आणि शैला, बंडू, सुलभा, सगळी पोरंपोरी त्या खोक्याभोवती जमा झाली.

" ए, ते पांढर पिल्लू किती छान आहे नाही ? "

" एऽऽ, ते बघ, कसं मानेलाच जाऊन लुचत आहे. "

" ए, कुठाय् बघू बघू. "

" तिथं गर्दी करू नकारे आणि पिलांना हात नाही लावायचा कुणी " श्रीने सवेच पोरांना दम दिला. त्याबरोबर सगळी पोरे थोडी मागे सरकली आणि पुन्हा पुढे गेली.

" ईऽऽ ग बाई ! बिली चाटतेय् बघ कशी त्या पिल्लांना. "

" त्यांत ' ईऽऽ ' करायला काय झालं ? ती आंघोळ घालतेय् त्यांना. "

" अय्या ! म्हणजे तुझी आई तुला आंघोळ घालते म्हणजे चाटते की काय ? "

" शैलिटले, सांगू का तुझ्या आईला असं म्हणते म्हणून ? "

" ए शैला, बरोबर आहे त्याचं. ती स्वच्छ ठेवतेय् आपल्या पिलांना. मांजरं काय पाण्यानं आंघोळ करतात काय ? " श्रीने वादाचा निर्णय दिला. त्याच्यापुढे अपील नव्हते. सगळी पोरं त्या मुलीकडे " काय मुलगी आहे ! एवढी साधी गोष्ट-सुद्धा माहिती नाही ? " अशा नजरेने बघू लागली.

काही वेळाने सर्व मुलं पांगली. श्री आंघोळीला गेला, पण त्याचे सर्व लक्ष बिली आणि तिची पिल्ले यांच्याकडेच होते. बिली खोक्यातून बाहेर आल्यावर त्याला एकदम जाणवले की हिचे फुगलेले पोट आता खपाटीला गेले आहे. त्याने आईला विचारले,

" अग, तिचं पोट बघ पुन्हा कमी झालं."

"अरे, त्यात पिल्लं होती तिची "

" हं, म्हणजे शरयूताईसारखं. " आई यावर काहीच बोलली नाही.

आई, आपल्या बिलीचा नवरा कुठे आहे ?

" तिनं मला थोडाच दाखवला आहे. आणि तू आता नको त्या चवकशा करत वेळ काढू नको...अभ्यास नाही का आज ? "

तो विषय तेवढ्यावरच संपला, पण श्रीच्या मनातून तो काही जाईना.

" बिलीचा नवरा कोण असावा ? शरयूताईचा नवरा कसा आहे ? तो सारखा मुंबईहून येतो, शरयूताईशी बोलत बसतो. बिलीकडे सारखा कोण येतो ? अंSSSSSS SSS .......................................................................... हं........तो काळा बोका. शीSSS, तो काळुंद्रा बिलीचा नवरा ? शक्यच नाही. "

बिलीचा नवरा कोण हे कोडे श्रीला शेवटपर्यंत उलगडले नाही. त्या काळ्या बोक्यापर्यंत तो आला होता, पण त्याला स्वीकारायला त्याचे मन तयार होईना.

बिलीच्या पिलांनी नुकतेच डोळे उघडले होते. आपल्या चिमुकल्या डोळ्यांनी ती पोरं टुकू टुकू बघत असत. श्रीला तर त्या पिलांचा छंदच लागला होता. वाड्यातली पोरेही त्या खोक्याच्या आजूबाजूलाच असायची.

बिलीची प्रकृती मात्र दिवसेंदिवस खालावतच होती. आईने तिच्यावर खूप उपचार करून पाहिले, शेवटी डॉ. खासगीवाल्यांनाही दाखविले, पण फारसा फरक पडला नाही. श्री अगदी चिंताग्रस्त होता. आता त्याला तिच्या पिलांची काळजी वाटू लागली.

आणि एक दिवस बिली जी गडप झाली, ती परत आलीच नाही. श्रीने सगळी-कडे शोधाशोध केली. कुणी सांगावे, 'अरे बिलीला इथं पाहिल्यासारखं वाटलं,' की लगेच श्री तिथं जायचा नि हात हलवीत परत यायचा. त्याची परिस्थिती फार केविलवाणी झाली होती.

पण आता त्या पिलांची स्थिती फारच करुणाजनक झाली होती. अजून त्यांना आईच्या दुधाची गरज होती. अजून त्यांना आईच्या मायेची ऊब हवी होती. त्या पिलांच्या केविलवाण्या हालचाली पाहून श्रीला भडभडून आले. त्याने त्या पोरांना उचलले आणि तो स्वयंपाकघरात आला. एका वाटीत त्याने दूध घेतले आणि बोंडल्याने एका पिलाला पाजू लागला, पण व्यर्थ ! त्यांना तसे पिताच येत नव्हते.

श्रीची फार निराशा झाली. त्याचे डोळे पाझरू लागले. ती पोरे त्याच्या पायावर फिरत होती. कुठेतरी लुचावायचा प्रयत्न करत होती आणि श्री रडत त्यांच्याकडे बघत होता. असहायपणे.

● ● ●


कॅल्शियमयुक्त

# बिटको

## ग्राइप

नेहमी दिल्याने
लहान मुले सशक्त, बांधेसूद
व गुटगुटीत होतात.

अत्यंत लोकप्रिय

# बिटको

## काळी
## टूथ पावडर

नेहमी वापरल्याने
दात मोत्यासारखे स्वच्छ
व चकचकीत होतात.

## बिटको केमिकल इंडस्ट्रीज,

नाशिक रोड.

# रातराणी



प्रा. स. ना. दीक्षित

ऋतुराज वसंताचं आगमन होतं. वासंतिक सौंदर्याच्या उल्हासानं सृष्टिसुंदरीचं अंग अंग विलसू लागतं. तिचा प्रियकर कोकिळेच्या कंठातून जणू तिला साद घालू लागतो. नंतर ग्रीष्म ऋतूची चाहूल न कळत येऊ लागते. दिवसा उन्हाची तिरीप लागते, पण संधिकाल प्रदीर्घ व सुखशीतल वाटू लागतात. या वेळी हजारो स्त्रीपुरुष दिवसाचा शीण घालविण्यासाठी गावाबाहेर मोकळ्या अंगानं हिंडायला जातात. ती गोधूलीची वेळ असते. माळावरून जनावरं गळ्यातील घंटांचा टिन् टिन् आवाज करीत आपल्या घराकडं परतू लागतात. वातावरणात क्वचित बासरीची एखादी मधुर लकेर उमटून जाते. पाखरांच्या मालिका धूसर आकाशातून घरट्याकडं परतू लागतात. फिरावयास गेलेला जनसमाज रमत गमत घराकडे परततो. पौर्णिमेची रात्र येते. निळ्या-काळ्या आकाशात पूर्ण चंद्र हळूहळू वर येऊ लागतो. निशाराणीच्या भालप्रदेशावरील जणू काही तिलकच भासतो तो! संधिकालाचं रूपांतर हळूहळू चांदण्या रात्रीत होतं. टिपूर चांदणं

> रातराणी आपणास निरनिराळ्या काळी
> निरनिराळ्या रूपाने दर्शन देत असते.

पडतं. गार वाऱ्याच्या झुळुकी अंगांगाला गार स्पर्श करीत खट्याळपणे सैरावैरा धावत सुटतात. दिवसाची धावपळ कमी होते. रात्र हळूहळू शांत होत जाते. अशा वेळी रातराणीचं लास्य नृत्य सुरू होतं. तिचा पदन्यास लयबद्ध असतो. प्रेक्षणीय असतो. ती बहरते, आपली मोहिनी-विद्येची जादुगिरी सुरू करते. आपल्या मधुर गंधाचं साम्राज्य ती भोवताली पसरू लागते. या मधुर गंधाच्या हलक्या स्पर्शानंही वेडा न बनणारा रसिक विरळा!

रातराणी आपणास निरनिराळ्या काळी निरनिराळ्या रूपानं दर्शन देत असते.

बागेत प्रथम लावल्यानंतर किंवा एरवी नवी पालवी फुटू लागल्यानंतर रातराणीची रूपकांती मोठी मोहक असते. मानवी मनातील भावनाप्रमाणं तिला अनेक लांबसडक धुमारे फुटलेले असतात. तिला लांबच लांब शाखा फुटलेल्या असतात, तशाच उपशाखाही! आणि त्यांच्यावर फुटलेली ती कोवळी लुसलुशीत पालवी! तिची पानंही सुंदर असतात. लांबट चिंचोळी. टोकदार. स्निग्ध व मुलायम! वायुलहरीवर तिचं नृत्य सारखं चालू असतं. अशा वेळी शेलाटी अंगलट असणाऱ्या झिम्मा खेळत असणाऱ्या एखाद्या खट्याळ चंचल कुमारिकेप्रमाणं ती मोठी विलोभनीय वाटत असते.

अमावास्येची काळी रात्र संपते. शुक्लपक्ष सुरू होतो. निळ्याकाळ्या नक्षत्रखचित आकाशात अर्धवर्तुळाकार चंद्रकला उठून दिसते. ती शुक्लपक्षात कलाकलांनी वाढत जाते. रोज रात्री चांदणंही वाढत जाते. या अवधीत रातराणीही कलाकलांनी वाढत असते. कौमार्य संपवून ती आता यौवनात पदार्पण करू लागते. यौवन तिचे अंगात जणू मुसमुसू लागतं. लक्षावधी सूक्ष्म कळ्यांतून ते बाहेर पडतं. वाढू लागतं. तेव्हा ती काहीशी अंतर्मुख बनते. मुग्ध बनते. अबोल बनते. यौवनसुलभ भविष्यकालीन अद्‌भुतरम्य जीवनस्वप्नं पाहू लागते. तिची मनातील उत्कट उत्कंठा गडद मौनात बुडून जाते. निरागस मुग्धमधुर प्रणयाकुलता तिचं सारं भावविश्व व्यापून टाकते. लक्षावधी मुग्धमनोहर कळ्यांनी युक्त अशी रातराणी या वेळी एखाद्या मुग्ध निरागस, अबोल पण उत्कंठित नववधूप्रमाणं सौभाग्यसंपन्न वाटू लागते.

पौर्णिमा जवळ येऊ लागते. निळसर आकाशात तारका चमकत असतात. प्रियकर चंद्र हळूहळू आकाशात विराजू लागतो. अवकाशात त्याचं साम्राज्य सुरू होतं. धरतीवर चांदणं दुथाळतं? सुखशीतल वायुलहरी वाहू लागतात. पक्षी घरट्यात विसावू लागतात. सर्वत्र शांतीचं वातावरण पसरलेलं असतं. या वेळी धरतीवरही रातराणीचं राज्य सुरू होतं. तिचं सर्वांग मोहरून जातं. पानांपेक्षा मोहोरच अधिक

दिसू लागतो. पुष्पभारांनी लवलेल्या तिच्या फांद्या मनोहर नर्तन करीत असतात. या वेळी ही विलासिनी लास्य करते. शृंगारिक हावभाव करते. प्रणयकटाक्ष फेकते. उन्मादक चेष्टा करते. हजारो प्रकारांनी आपली यौवनउत्कंठा प्रकट करीत असते. अशा यौवनानं मुसमुसणाऱ्या रूपराणीस प्रियकर चंद्र आपल्या चांदण्यांच्या हातांनी आलिंगन देतो. तेव्हा लक्षावधी फुलांच्या रूपानं ती रोमांचित होते. चंद्र तिजवर आपली अमृतवृष्टी करतो. तेव्हा ही यौवनगंधा हे अमृत आपल्या मधुरगंधाच्या रूपानं जगावर उधळून टाकते. तिचा हा उन्मादक गंध ओलसर रात्रीत मिसळून जातो. सर्व जग तिच्या मृदू सुगंधात भिजून जातो. नैसर्गिक अलंकारांचा नाजूक साज परिधान करणारी ही रातराणी या वेळी सौहागरातीचं प्रणयसुख लुटीत असते. तिच्या शृंगाराचा बहर पुढे पाचसहा दिवस चालू असतो. अशी रातराणी सौभाग्यालंकारांनी नटलेल्या, सुखसमृद्धीनं बहरलेल्या, मुलाबाळांनी भरलेल्या, वात्सल्यरसाने युक्त असणाऱ्या सात्त्विक, तृप्त प्रौढ गृहिणीप्रमाणं शोभत असते.

कृष्णपक्षात चंद्रराजाचं वैभव हळूहळू क्षीण होऊ लागतं. तो उशिरा उगवू लागतो. रातराणीचा बहरही ओसरू लागतो. एक एक फूल गळू लागतं, सारी फुलं झडून जातात. खाली जमिनीवर फुलांच्या निर्माल्याचा खच पडतो. मागं शिलक राहते केवळ यौवनाची स्मृती ! शृंगाराची स्मृती ! वैभवाची स्मृती ! हा स्मृतिगंध आता तिच्या हृदयात दाटून राहतो. भूतकाळची मधुरमधुर स्वप्नं तिच्या दृष्टीपुढं नाचू लागतात. आपला मोहर ओसरला हे ती ओळखते. विचारमग्न बनते. विमनस्क बनते. तपस्या करू लागते. मनाला शांती मिळविण्याच्या शोधात राहते. अशा वेळी आपल्या प्रपंचाचा भार मुलांवर सोपवून आपल्या नातवंडांना खेळवीत उरलेलं जीवन कंठणाऱ्या एखाद्या व्रताचरणी स्त्रीप्रमाणं ती वाटू लागते, किंवा क्षीणशक्ती ययाती राजासह वानप्रस्थाश्रमी होणाऱ्या शर्मिष्ठेप्रमाणं वाटू लागते.

पण तिची ही तपस्या फुकट जात नाही. व्रताचरण विफल होत नाही. तिचा जणू कायाकल्प होतो ! जणू पुनर्जन्म होतो. आणि जीवनाचं हे चक्र पुन्हा फिरू लागतं ! पुन्हा बालपण...पुन्हा यौवन...पुन्हा शृंगार...

या रातराणीचा गंध रात्रभर तर राहतोच, पण उषःकालीही तो रेंगाळत असतो. अशाच एका मंगल उषःकाली मला तिच्या सौंदर्याचा साक्षात्कार झाला होता. त्या दिवशी उषःकाली मी ताजातवाना होऊन रातराणीजवळ गेलो होतो. रात्री पावसाची रिमझिम झाली होती. वातावरण शांत होतं, प्रसन्न होतं. हवा ओलसर झाली होती. पावसामुळं भूमी तृप्त झाली होती. प्रसन्न झाली होती. रातराणी तृप्त झाली होती. प्रसन्न झाली होती. त्यावेळी पुष्पमंजिऱ्यांच्या भाराखाली लवलेली रातराणी पर्जन्याच्या तुषारकणांनी अधिकच झुकलेली दिसत होती. समृद्धीतही नम्र असणाऱ्या सज्जनांप्रमाणं ! प्रत्येक मंजरीला ते चमकणारे तुषारबिंदू झालरीप्रमाणं किनारलेले होते. ते तुषारबिंदू किती दिव्य होते ! पवित्र होते ! ताजे होते ! मला वाटलं,

रात्री प्रसन्न होऊन हिमांशूनं जणू तिजवर अमृतवृष्टी केली असावी ! आणि दिव्य रत्नहारच तिच्या गळ्यात अर्पण केले असावेत ! आणि शिवाय तिचा तो ओलसर मंद मधुर गंध ! वातावरणात अगदी दाटून राहिला होता. मी लवून अगदी जवळून तो गंध घेतला. एक वेळ, दोन वेळ, तीन वेळ ! पण तृप्ती होईना. त्या गंधानं मी तर वेडाच झालो. त्याचं वर्णन शब्दांनी करू ! करू शकेन ! प्रत्यक्ष अनुभूतीच्या दिव्य साक्षात्काराचं वर्णन करताना शब्द अपुरे पडत असतात ! नाही का ? ब्रह्मानंदाचं 'सत्यं शिवं सुंदरम् !' असं वर्णन का करतात ते मला तेव्हा कळलं ! अशा मंगल उषःकाली मला तिच्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्कार झाला. नव्हे, सौंदर्यलक्ष्मीनंच मला जणू रातराणीच्या रूपानं साक्षात दर्शन दिलं. सात्त्विक तृप्तीनं धन्य झालेलं रातराणीचं त्या उषःकालचं ते दिव्य दर्शन मी कधी विसरू शकेन ? माझ्या जीवनातील तो एक अमर क्षण होता. दिव्य रोमांचांनी बहरलेल्या रूपसी रातराणीचं ते स्वर्गीय सौंदर्य पाहून माझ्याही शरीरावर सात्त्विक रोमांच उठले होते !

बहरलेल्या रातराणीचं स्वरूप स्वर्गीय असतं. तिला पाहून वाटतं अस्मानातील कोणी स्वरूप सुंदर परीच भूतलावर अवतरली आहे ! रातराणीचा गंधही तसाच उन्मादक असतो. वाटतं, एखादी यौवनगंधा शापित यक्षकन्याच धरतीवर उतरली आहे ! तिच्या या सौंदर्याविष्कारात व मादक सहवासात आपण एखादं मधुर स्वप्नच पाहात आहोत असा भास होतो. पुंडरिकाच्या कानावर नंदनवनदेवतेने ठेवलेल्या स्वर्गीय पारिजातक मंजरीनं महाश्वेतेला कामविव्हल करून टाकलं होतं म्हणे ! तशीच किंबहुना त्याहूनही अधिक उन्मादकता या रातराणीच्या मंजिरीत नाही काय ! अरविंद, अशोक, आम्रमंजिरी नवमल्लिका, नीलोत्पल यांचे पाच शर योजून कामविव्हलं करणाऱ्या पंच बाणाला–मदनाला–रातराणीची ही मंजिरी दिसली नव्हती काय ?...का रातराणीच्या या मंजिरीचा अंतर्भाव आपल्या बाणात करण्याइतकी रसिकताच या पुष्पधन्वापाशी नव्हती ?...जसा हा रातराणीचा गंध उन्मादक असतो तसाच तो प्रीतिराणीचाही असतो. नव्हे रातराणीच्या गंधानं प्रीतिराणी अधिकच उन्मादक बनत असते. या दोघींच्या उन्मादक सहवासाचं सुख ज्या भाग्यवंताला समन्वयानं लाभतं, तो या जीवनात खरोखरच धन्य होय ! स्वर्गसुख त्याला अन्यत्र शोधण्याचं कारण नाही.

अशा या रातराणीचं वागणं अगदी जगावेगळं असतं. हजारो वृक्षवेलींची फुलं सूर्योदयाबरोबर विकसित होतात आणि सूर्यास्ताबरोबर कोमेजून जातात, पण रातराणीची तऱ्हाच निराळी ? रातराणीच ती ! कलावंतांचं भावनाप्रधान कोमल हृदय एकांतात जसं उमलावं तशी ही लज्जाशील नाजूक रातराणी रात्री सुखशीतल एकांतात उमलत राहते. दिवसाचा प्रखर प्रकाश तिला सहन होत नाही. दिवसा ती संकोचते. कोमजते. आपल्या पुष्पपाकळ्या ती मिटून घेते. ती दिवसाची उन्हाची

तिरीप मुकाट्यानं सहन करते. पण रात्री मधुर गंधाची उधळण करते! सुखशीतल चांदण्यात दिवसाचा ताप विसरते, जीवन कसं जगावं याचं रहस्यच जणू ती माझ्या कानात या वेळी कुजबुजत असते. ती सांगते, "जीवनात सुखंदु:खं असायचीच. माणसानं वेळप्रसंगी दु:खाचे कढ सोसावेत, पण सद्भाग्याची अनुकूल हवा वाहू लागताच त्यानं कुढत बसू नये. सारं दु:ख विसरावं व बहरून निघावं!" अशा प्रसंगी जीवनात दु:खाचे कढ गिळून शांत अनुकूल समय येताच आपल्या मातृवात्सल्याचा सर्वांवर असीम वर्षाव करणाऱ्या भारतीय गृहिणीचं ती प्रतिनिधित्व करीत आहे असं वाटू लागतं.

समाजाला सुखी, समृद्ध करणारे संतसाधू, समाजसेवक, राष्ट्रभक्त यांचं जीवनही रातराणीप्रमाणेच असतं. आपल्या जीवनकालात ते रातराणीप्रमाणं प्रखर तपस्या करतात. ताप सहन करतात. दु:खाचे कढ गिळतात आणि समाजाला सुखी बनवतात. त्यांच्या जीवनदिनानंतरच्या कालरात्रीत त्यांच्या कर्तृत्वाचा मधुर गंधही असाच दरवळत राहतो. रातराणीचं जीवन म्हणजे अशा समाजसेवकांच्या जीवनाचं प्रतीकच होय!

'आपला बहर अल्पजीवी आहे. उद्या तो निर्माल्य होणार आहे,' हे ती जाणते. अटळ प्रकृतिधर्म तिला माहीत असतो. पण म्हणून ती उदास होत नाही. ईश्वरानं दिलेलं आपलं जीवन कितीही नाजूक असो, कितीही क्षणजीवी असो, ते जास्तीत जास्त बहारदार करावं, आणि आपल्या मधुगंधाची जगात लयलूट करावी, जीवनात बहर आहे तोपर्यंत हसावं, खेळावं, बागडावं, मागचा पुढचा विचार न करता आजचा जीवनानंद आजच लुटावा व जगालाही सुखी करावं, हा संदेश जणू मला ती देत असते.

आमच्या घराच्या अंगणात प्रवेशद्वाराच्या दोन्ही अंगास जेव्हा मी बहरलेली रातराणी पाहतो, तेव्हा मला माझ्या आईची आठवण येते. बालपणी तिनंच मला प्रथम रातराणीचा परिचय करून दिला होता. आमच्या खेडेगावी एके दिवशी रात्री आमच्या घराच्या प्रशस्त अंगणात आम्ही घरातील सर्व मंडळी गप्पा मारीत बसलो होतो. सुंदर चांदणं पडलं होतं. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर मधुर गंध येत होता. मी त्या गंधासंबंधी आईजवळ विचारणा केली होती. तिनं सांगितलं होतं, "अंगणातील कोपऱ्यात बहरलेली ती रातराणी आहेना, तिचाच हा मधुर गंध आहे!" असं म्हणून जवळ नेऊन तिनं मला ती रातराणी दाखविली होती. तिचं स्वर्गीय सौंदर्य मी प्रथम पाहिलं होतं. तिच्या उन्मादक गंधानं मी प्रथम वेडा झालो होतो. मला आजही आठवतं ते घर! ती रात्र! ते चांदणं! माझी आई! ती रातराणी, आणि तिचा तो मधुर गंध! सारं...सारं आठवतं!

खेडेगावातील आमचं ते घर आता परक्याचं झालं आहे! रातराणीचा जीवनात प्रथम परिचय करून देणारी माझी आई आता कायमची अदृश्य झाली आहे.

शैशवातील ते रम्य दिवस आता भूतकालच्या धूसर धुक्यात विलीन झाले आहेत ! ताजी आहे ती फक्त त्या प्रसंगाची मधुर स्मृती ! अमर स्मृती ! स्मृतिपुष्पांचा गंध कधीच उडून जात नाही ! नाही का ?...

स्वत:च्या अंगणात अशी फुललेली रातराणी पाहण्याचं वेडं स्वप्न मी कितीतरी वर्षं मनात जोजवीत होतो. घाटातील नागमोडी रस्त्याप्रमाणं जीवनातील अनक वळणं पार केल्यानंतर आज माझं ते स्वप्न साकार होत आहे. आमच्या घरातील अंगणात प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंस आज रातराणी बहरू लागली आहे ! मला गंधवेडा बनवू लागली आहे ! माझ्या आईची स्मृती ताजी करू लागली आहे.

चांदण्या रात्री मार्गावरून फिरावयास जाणाऱ्या काही यौवनगंधा या रजनी-गंधेकडं आकर्षित होतात. तिजकडे अंगुलीनिर्देश करतात. कधी चोरपावलांनी जवळ येऊन चार दोन मंजिऱ्या खुडतात. आपल्या केशकलापात खोवतात. मधुगंधानं तृप्त होतात ! प्रेमी युगुल सुखावतात ! कधी माझ्या हे लक्षात येतं, पण मी त्यांच्या या सुखात व्यत्यय आणीत नाही. त्यांच्या सुखानं माझं मन सुखावतं. मला वाटतं, माझं जीवन सौंदर्यमय होत आहे ! गंधमय होत आहे ! ब्रह्ममय होत आहे !

पौर्णिमा येते. सर्वत्र टिपूर चांदणं पडतं. रातराणी बहरते–तिचा मधुर गंध वातावरणात दरवळून राहतो. तेव्हा अंगणात मी आरामखुर्चीवर पडून विश्रांती घेऊ लागतो. वर्तमानकालातील प्रश्नांचा विचार करतो. भूतकालातील मधुर स्मृती आठवतो. भविष्यकालातील बिलोरी स्वप्न रंगवितो. माझ्या मनाचं रंजन करतो. अशा वेळी माझ्याभोवती शिरीष, अनिल आदी बालगोपाल जमा होतात. सारं घर गोळा होतं ! मग सर्वांच्या गप्पा-गोष्टी सुरू होतात. गाणी रंगात येतात. रवींद्र छातीशी बिलगून बोबड्या गोष्टी करू लागतो. मी त्याच्याशी बोलतो. सर्वांशी बोलत राहतो. हुंकार देऊ लागतो. सौंदर्य, सुगंध व तृप्ती यांनी भरलेल्या माझ्या या जीवनात निद्रादेवीचं चोरपावलानं कधी आगमन होतं ते माझं मलाच कळत नाही !

स्वर्गीय सुख याहून काही निराळं असू शकेल काय ?

जीवनाच्या अखेरीस चिरनिद्रादेवीचं असंच काव्यमय आगमन होईल काय ?

● ● ●

# • चंद्रशेखर मराठे •

चोरगे अगदी गोंधळून गेला. बाई मुकाट बसली होती. विचार करताना चोरगेला वाटू लागले होते, आपल्या हातून काही होणार नाही, तिने सांगितले आणि आपण ऐकले, एवढेच . . .



चोरगे एकटाच सायकलवरून चालला होता. सरळ नाकासमोर जाणाऱ्या त्या रस्त्यावर माणूसकाणूस कुणी नव्हतं. ऐन दुपारचं ऊन चांगलंच सणकत होतं. खालचा फुफाटा झळा मारीत होता. नजर पोहोचेल तोवर चारी बाजूला अगदी वैराण होतं. सगळं वातावरण अगदी निपचित पडलं होतं. चार मैल सायकल मारल्याने चोरगे घामाघूम झाला होता. दातओठ खाऊन पायडल मारताना त्याच्या मनात आलं, ' च्यायला, काही अर्थ नाही आपल्या जगण्यात ! '

अजून पाच मैल सायकल दामटायची होती, अन् तिथं जाऊन काही प्रांतसाहेबागत पंख्याखाली बसायचं होतं थोडचं ! कामाच्या ऐन रगाडचात थोरात साहेबानं त्याचं दप्तर काढलं होतं. रखडत रखडत चोरगे मुक्कामाच्या गावी पोहोचताच थोरात साहेबानं त्याला बोर्डावर घेतला असता. प्रथम भागातल्या कामाबाबत सरबत्ती आणि मग साहेब शिरणार दप्तरात, ते चार तासांची निश्चिती. साहेब दप्तरी कामाला फार कणकणीत होता. नेमका ढिमाळ जागी हात घाली आणि मग खास तंबाखूच्या आवाजात साहेबाची गाडी सुरू होई. चोरगेला हे सगळं डोळ्यांसमोर दिसत होतं. साहेबाचं ते खाजकुटालीसारखं बोलणं त्याला ते चांगलंच माहीत होतं.

## ○ ○ ○ दुपार ○ ○ ○

दप्तरी कामाचं अजून चोरगेला काही जुळलं नव्हतं. खरं म्हणजे काहीच तसं अजून त्याला जमलं नव्हतं. दिवसभर लोकांच्या मागं लागायचं आणि रात्री कोल्ह्या-कुत्र्यागत कोणाच्या तरी घरचा तुकडा घेऊन चावडीत पडायचं. छे: ! चोरगे पुरा वैतागला होता. बायकापोरं एकीकडं–म्हातारा-म्हातारी एकीकडं आणि आपण दरवेशाप्रमाणं गावोगाव भटकायचं. चोरगे नोकरीत शिरल्यापासून योजनांचा तर सरकारनं अगदी दणका लावला होता. विहीरतगाई, फळझाड योजना, कोंबडी-पालन, शेतकरी मंडळ, जपानी पद्धत, समाजशिक्षण, टोकणपद्धत–एक ना दोन. या सगळ्या योजनांचे काम करायचे एकट्या ग्रामसेवकाने. लोकांच्या मागे तर इतके लागायला लागायचे; एवढे करून तालुक्याच्या मीटिंगला साहेबांचे तोंड आंबटच असायचे. थोरातसाहेब मोठा वेरकी होता. ग्रामसेवक त्याला टरकून असत.

साहेबाचे एक सोडा, पण भागातल्या पोरासोरानेही ग्रामसेवकाला टिकलावे हे चोरगेला अजीबात आवडत नसे, पण बोलायची सोय नव्हती. साहेब म्हणे, जनतेचं ऐकायला पाहिजे. अशी नोकरी मोठी चमत्कारिक होती. नोकरीत आपली पुढे अशी दैना होईल असे चोरगेला वाटले नव्हते, पण अशा या भटक्या नोकरीने चोरगे पार घाईला आला होता, एवढे मात्र खरे.

आपल्या गावात, कमावलेल्या शरीराला हेलकावे देत, टगेगिरी करणारा चोरगे आता अगदी मऊ आला होता. उमेदवारीतले त्याचे शरीर पारच हडकले होते. नोकरीत विड्यांचे व्यसन लागल्याने छातीचेही खोके झाले होते आणि सगळ्याच हालचालीत एक प्रकारचा चोरटेपणा आला होता. एका ऐसपैस खड्ड्यात सायकल इतक्या जोरात उडाली की चोरगेच्या वैतागात भर पडली. निघाल्यापासून आठव्यांदा त्यानें एक शिवी हासडली आणि म्हटले, 'काही–काही अर्थ नाही या जगण्यात !'

सायकल मारून मारून चोरगे आता अगदी दमगीर झाला होता. कोठेतरी सावलीला थांबावे–, विडीचा धूर काढावा, दम खाऊन निघावे असे त्याला वाटू लागले. निथळणाऱ्या घामात रुमालाची घडी भिजवावी आणि डोळ्यांवर ठेवावी– थंड वाटते असा त्याला सापडलेला तोडगा होता.

रस्त्यावर अजून कोणीच नव्हते. थोड्या अंतरावर एक हाडकुळे झाड होते. सतरा ठिकाणी भोके पडलेल्या सतरंजीगत त्याची सावली पडली होती. झाडाला सायकल लावताना चोरगेला वाटले, झाड तरी काय नामी आहे. सावली आपली नावालाच. पण जवळपास काहीच नव्हते. बुंध्याशी दप्तर टाकून चोरगेने पाय पसरले. जवळच खडीचा रूळ पडला होता. चोरगेला वाटले, काय हे बोर्डाचे काम. आज कितीतरी महिनें तो रूळ तिथे पडला होता. अजून खडीचा पत्ता नव्हता की कामाचा. पावसाळ्यात हा रस्ता जवळजवळ बंदच असे. त्याला वाटले या सीझन-मध्ये शेजारच्या चिचरणी गावातल्या लोकांकडून येथे काही श्रमदान करून घेतले पाहिजे. तेवढेच डायरीला काहीतरी नोंदायला होईल.

झाडाला रेलून थोडे पडल्यावर चोरगे थोडा शांत झाला. त्यानें इकडे तिकडे पाहिले. चोहोबाजूला एकामागून एक अशी डोंगरांची पुसट होत गेलेली चळत होती. भोवतालची रानें पिवळट दिसत होती. दुपारच्या स्तब्धतेचा आवाज सगळीकडे भरून राहिला होता. मध्येच निवळशंख आकाशात एखादा पांढरा ठिपका वळसे घेऊन जात होता. वातावरणाचा भगभगीतपणा वाढवीत होता.

असे आसपासचे कढत रिकामपण न्याहाळीत चोरगेनें विडी काढली. उलटीकडून एक दम मारला. रिकाम्यापोटी पोटात गेलेल्या धुराने त्याचे डोके चांगलेच चढले. आणखी एक चरचरीत झुरका घेऊन चोरगे निवांत पडून राहिला. त्याला उठावेसे वाटेना. फाटक्या सावलीचे सुख त्याच्या हातीपायी उतरले. डोके आणखी भरकटत चालले. त्याला वाटले, उठायचे कारण खरे म्हणजे नाही. या वणवणीचा त्याला अगदी वीट आला होता. बरोबरची पोरे कोणी मुंबईला, कोणी सोलापूरला अशी चाकरमानी झाली होती. सुटीला गावी येऊन पांढरीफेक कापडं घालून मिरवत होती. चोरगेच्या विटकरी कोटाकडे मेलेल्या उंदराप्रमाणे पाहात होती. तो मात्र यात अडवला होता. बरे, शेतकऱ्याप्रमाणे त्याला वावरता येत नव्हते. या दरिद्री

वातावरणातच, पण सरकारी नोकर म्हणून त्याला विचकत विचकत चालावे लागे. घूर काढता काढता त्याला वाटले. सोडावी ही नोकरी–जावे मुंबईला. मिळेल कोठेही काम. निदान तालुक्याला जावे. माईशेठच्या दुकानी हिशेब वगैरे लिहावे. दुकान बंद झाल्यावर तरी टचात हिंडता येईल. कोणी पाहते का–, रावसाहेब काय म्हणेल हा वनवास नको.

समोरच्या मख्ख डोंगराकडे पाहत चोरगे काहीबाही विचार करीत होता. दुसऱ्या नोकरीचे नाही जमले तर नाही. गावातच काहीतरी दोन धंदे करावे. राजकारण खेळावे, पंचायत लढवावी. निदानीला दोन वेळा घरी जेवायला तरी मिळेल आणि गावोगावी आल्लख करण्याचे तरी टळेल. चोरगेला असे फार फार वाटू लागले, पण ते होणार नाही हेही त्याला माहीत होते. घरी साताठ माणसांचा गोतावळा– म्हातारम्हातारीचे एक आणि गायकापोरांचे एक अशी दोन बिऱ्हाडे होती. धाकटचा जगूचे शिक्षण चालू होते. कुसुमचे लग्न आणि दुसऱ्या कोठल्याच धंद्यात इतके रोख पैसे आणि इतक्या ठेपशीर मिळण्यासारखे नव्हते. तेव्हा हे असेच चालू राहणार होते. या फाटक्या सावलीचा आधार घ्यावा लागणार होता.

असे उलटसुलट प्रकारचे विचार चालू असताना चोरगेला वाटले, उठावे आता. जास्त थांबण्याने पाय सोकावतील. आताच त्याच्या पिंडऱ्या अगदी जेरबंद झाल्या होत्या, असे त्याला वाटले तरी त्याच्या शरीराने काही हालचाल केली नाही. कोणी सोबत दिसते का म्हणून त्याने इकडे तिकडे पाहिले. सायकलवाले कोणीच नव्हते, पण दुरून कोणीतरी चालत येत होते. चोरगे आळशीपणे नुसता बघत राहिला.

ती एक बाई होती. खेडयाच्या मानाने थोडीशी आवदार आणि ठाकठिकीच्या नेसण्यातली. तिच्या डोईवर मोठी पाटी होती. निथळणारा घाम मान हलवून उडवीत उडवीत ती लयदार चालत होती. हळहळू ती जवळ आली. घामाने तिचे कुंकू पार फिसकटले होते. कष्टाने बाई कडकली होती, तरी अजून थोडीफार नीटस दिसत होती. चोरगे बसला होता तेथवर बाई आली आणि तिची चाल मंदावली. चोरगेला ती आता काय करणार ते कळेना.

पण डोईवरची पाटी झटक्यात उतरून बाई त्याच्यापासून थोडया अंतरावर पण सावलीत बसली. पदराने वारा घेऊ लागली. चोरगेला वाटले, उठावे आता. तो थोडा सावरून बसला आणि दप्तर उचलू लागला. तेवढ्यात बाईने विचारले,

"सर्कल का वं ?"

"नाही. ग्रामसेवक." चोरगे म्हणाला.

"म्हंजे फुडारीपैकीच जनू."

"पुढारी असं नव्हे, पण आम्ही लोकांना मदत करतो. त्यांची कामं करतो."

"कसली कामं करता ?"

"हेच आपलं, नवीन पद्धती सांगणं, माहिती देणं, कर्जाचे अर्ज घेणं, गावात

विहिरी, शाळा वगैरे बांधण्यासाठी खटपट करणं, वगैरे." बाईला फारसे कळलेले, दिसले नाही. पण हा सरकारी अंमलदार वरीच कामे करतो एवढे तिला समजले.

"मग बायामानसांची काही कामं असली तर करताव का?"

"अहो, बायकांचं आमच्याकडे काय काम? त्यांच्यासाठी ग्रामसेविका असतात."

"पर तुमीपर करत असालच की"

"तसं करत नाही असं नाही. काहो? तुमचं काही काम आहे काय?"

"व्हय. माजं एक लई मोठं काम हाय्."

चोरगेला वाटले, काही उतारा वगैरे मिळण्याबाबत असेल किंवा शिवणाचें मशीन वगैरे घेण्यासाठी कर्ज हवे असेल. तो म्हणाला, "मग सांगा की. आमच्या नियमात असेल ते करू आम्ही."

'नियमाचं तुम्ही बगा," बाई म्हणाली. "माझं काम असं हाये की माझ्या मानसांचा आणि माझा पाच वरसं म्येळ नाही. तो घालून द्यायचाय्."

चोरगे गोंधळलाच. या बाईचे काम असे काही असेल आणि ते ती आपल्याला येथे रस्त्यावर असे सांगेल असे त्याला वाटलेच नाही. तो म्हणाला "अहो, हे काम सरकारचं नाही. सरकारकडून म्हणजे त्या त्या अधिकाऱ्यांकडून फार तर काडी-मोड मिळेल."

"मग त्याला सरकारच कशाला वो?" बाई म्हणाली "काडी तर परस्परच मोडल्यालीच हाय. त्येची परत जुळणी करायचं काम हाये. काही बघा काही कारान नव्हतं. पर आमच्या मानसांनी उगाच डोईमधी राख घालून घेतलिया. पाच सालं झाली मी घरी समदा कुणबावा करतीया एकली. पण मानसं काही ऐकनात बघा."

चोरगेला वाटले, बाई हिमतीची दिसते. एकटी सगळा बारदाना पाहते आणि अशा स्थितीत! तो म्हणाला, "हे माळवं घरचंच का?"

"तर वो. या दिसात रोज बाजारला जात्ये चालत. खरं म्हंजे यवडी उसाभर करायची कशाकारनी? पर करावी लागती? दोन लेकरं हायेत पदरात."

चोरगेला आता बाईची हकीकत ऐकाविशी वाटू लागली. तो म्हणाला, "पर एकदम तुमची मानसं बिगडाया झालं तरी काय?"

तेवढ्या प्रश्नासरशी बाईनं सपाटा सुरू केला. खरे म्हणजे हकीकत नेहमीचीच होती. बाप्या शहरची हवा खाऊन आला होता. त्याचे मन गावी रमत नव्हते. सारखा शहराला पळत असे. बाईला वाटे एवढा चालता कुणबावा आहे. शहराशी आपल्याला काय करायचंय्, असे होता होता बाप्या शहरातच जाऊन राहिला होता. त्यापूर्वी मोठेच कडाक्याचें भांडण झाले होते. त्याने सारे पार तोडून टाकले आणि शहरात जाऊन बसला. बाईची शहरात जायला ना नव्हती. पण आता त्याला दुसरेच वारे लागले होते. तिढा जरा नाजूक होता. कायदा आणि कोर्टकचेरीच्या घुसमुसळेपणाचा उपयोग नव्हता.

बाई मन मारून दिवस काढीत होती. शेतीची उस्तवार एकटी करीत होती. काही मार्ग दिसेना, सरकारी अंमलदार-तोही पुढारीपद्धतीचा दिसल्यामुळे तिने त्याच्याकडे गाऱ्हाणे घातले होते.

चोरगे ऐकत होता. बाईचे म्हणणे खरे दिसत होते, म्हणजे नवराबायकूत बिनसते तसे. पण तेवढ्यावरून इतके कडेला जायचे म्हणजे काही खरे नव्हते. बरे याचे दुसरीकडे घोंगडे अडकले असले तरी त्याने अशा न्याहार बाईची आवदा करणे बरोबर नव्हते. चोरगेला वाटले, बाईने गाऱ्हाणे घातले आहे. काहीतरी केले पाहिजे.

भराभरा सारे सांगून बाई थांबली. जमिनीकडे पाहात राहिली. इतके बोलल्यासरशी काही होईल असे वाटत असल्याचे तिच्या चर्येवरून दिसत नव्हते. तिथे नुसते झाड असते तरी ती इतक्याच तिडिकीने बोलली असती, असे तिच्या चेहऱ्यावरून वाटत होते.

चोरगेलाही ते समजले. बाईचे घर पुन्हा उभे राहावे हे योग्य होते. तिला मदत करणेही योग्य होते. पण ते कसे हे त्याला कळत नव्हते. नोकरीच्या एवढ्या वर्षांत असले काम त्याच्याकडे आले नव्हते. नवराबायकूच्या तंट्यात परक्याने कसे पडावे ? गावी आल्यावर बाप्याला काही सांगितले आणि तरकाटून त्याने टिकारले तर ? त्याचे काही एवढे नव्हते, पण काम झालेच नसते. गावचे चार लोक बोलवून खल करावा का ? का सरकारात अर्ज घालावा. चोरगे अगदी गोंधळून गेला. बाई मुकाट बसली होती. विचार करताना चोरगेला वाटू लागलें, आपल्या हातून काही होणार नाही. तिने सांगितले आणि आपण ऐकले एवढेच, पण असे तरी कसे म्हणावे ? तिने एवढ्या विश्वासाने काम सांगितले; आपण काहीतरी केले पाहिजे. जमेल किंवा न जमेल.

बराच वेळ झाल्याने बाई उठली. पाटी उचलून डोक्यावर घेणार तोच दुरून मोटारीचा आवाज आल्याने ती जरा थांबली. चोरगेचे विचार करून भुसकट पडले होते. त्याने दुसरी विडी लावली आणि आवाजाच्या दिशेने नजर लावली. मोटार जरा जवळ येताच चोरगे चांगलाच येडबडला. थोरात साहेबांचीच मोटार !

त्या क्षणी तरी चोरगेच्या डोक्यातून त्या बाईच्या कामाचा विचार साफ उडाला. नेहमी डांबरी रस्त्याने येणारी जीप आज या रस्त्याने कशी ? बरोबर कोणकोण आहेत ? अजून येथेच आपणाला पाहून साहेब काय म्हणेल ?

चोरगे गडबडीने उठला. त्याने दप्तर सायकलीला लावले आणि त्याचे लक्ष पाटी घेऊन उभ्या असलेल्या बाईकडे गेले. छे: ! त्याच्या समजुतीपेक्षा ही सावली महागात पडणार होती. या निवांत वेळी, आजूबाजूला कोणी नसताना या बाईबरोबर गप्पा मारताना पाहून साहेब आपणाला काय म्हणेल. काम करता की हेच करता असे म्हणून तो आपणाला कच्चा खाईल हे लक्षात येऊन चोरगे फारच गोंधळला. पुन्हा नेहमीचा चोरटेपणा त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागला. ही बाई

आता जाईल तर बरे असे त्याला वाटू लागले.

तेवढ्यात जीप येऊन थडकलीच. थोरातसाहेब त्याला पाहून गाडी थांबवून उतरला आणि ठेवणीतले हसून म्हणाला, "काय चोरगे, अजून तुम्ही इथेच ?"

"नाही साहेब, निघालोच होतो."

साहेबाने एकदा बाईकडे आणि चोरगेकडे पाहिले. त्याचे हसणे अधिकच वाढले आणि तो एकदम चोरगेला म्हणाला, "सायकल टाका मागे आणि चला जीपमधूनच. म्हणजे आम्हाला तुमची वाट बघत बसायला नको."

"नको साहेब, गाडीत उगाच गर्दी होईल. मी येतो सायकलवरून." चोरगे कसनुसे हसत म्हणाला. "अहो, खूप जागा आहे गाडीत."

चोरगेला काय बोलावे कळेना झाले. तेवढ्यात पाटी घेऊन उभ्या असलेल्या बाईकडे त्याचे लक्ष गेले आणि तो साहेबाला म्हणाला, "मग साहेब ! माझ्या या वयनीला तेवढं गाडीतून न्या. मी येतो सायकलवरून – वयन्ये – तू जा गाडीतून आणि दादाची काही काळजी करू नकोस. मी सांगतो त्याला समजावून."

बाई गाडीत बसेना. लाजू लागली शेवटी चोरगेने तिची पाटी धपकन् गाडीत टाकली आणि सांगितलं, "रावसाबला उशीर होतोय् जा लवकर." अखेर बाई जीपमध्ये बसली. जीप सुरू झाली आणि खंडीभर धुरळा उडवीत निघून गेली.

चोरगेने सायकलवर टांग टाकली. एकेक पायडल मारताना त्याला वाटले, सायकलनं फारतर अर्धा घंट्याची मजल – पायी जायला किती वेळ लागत असंल ? चोरगे सायकल मारीत राहिला. दुपारचं ऊन सणकत होतं. लांबवर रस्त्यावर कोणी नव्हतं.

● ● ●

## खुलासा

'२६ जानेवारी १९६५' या अंकात पृष्ठ ८ वर 'दि बँक ऑफ इंडिया लि.,' या जाहिरातीत व्याजाचा दर ३ टक्क्यांऐवजी ३। टक्के असा चुकीचा दिला गेला आहे.

वास्तविक वरून ७ व्या ओळीचा मजकूर

'□ बचत खात्यावर दरसाल ३ टक्के व्याज चक्रवाढ पद्धतीने जमा होते, असा हवा होता.

या मुद्रणदोषाबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

*जा. व्य. 'माणूस'*



## अंतरींचा मग निंब बहरता

कधी उसळते विषसरितेवर
मधु संजीवक अमृतलहरी,
अंधाराचा घन औदुंबर
कधी बहरतो प्रकाशबहरी
कधी प्रकटते कृष्णशिळेतुन
चैतन्याची भावसुगमता
काळाच्याही कठिणपणांतुन
कधी पाझरते वेडी ममता
कधीमधीच्या या वरदाने
अंतरीचा मग निंब बहरतो
उरात रिचवुन सारी कटुता
शीतल परिमळ परिसरि भरतो

*— शारदात्मज*

## मुळे उन्मळावी


मुळे उन्मळावीं दुपारी मनाची
अशी एकटी आग वैराणते
तुझा कापुरी श्वास ती वाफ वेची
असे झाड हिरवे उभे पेटते
मला ज्ञात की संत सांगून गेले
जगीं चक्रवर्ती सदा यातना
मुक्या मी मला विस्तवी झोकलेले
त्वचेची जळे दुःखसंवेदना
इथे संचिताचा अमर्याद तोरा
इथें या निशा नित्य चंद्राविना
तरी भोंवती व्यर्थ साचे पसारा
कळेना कुठे असा वाहतोना

*—सुधाकर शंकर देशपांडे*

## विराणी

मखमली सौख्यात माझी
वेदना झाकून आले,
हासणे फुलवून ओठी
आसवे प्राशून आले !
मैफली तुझिया सुखाच्या
—गायि रेशीम गाणी;
आसवे पुसता म्हणाला,
'तीच गा, पुन्हा विराणी !'

*—सुधीर देव*



THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRAR

यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

लेखांक बारावा




# भस्मासुराचा उदयास्त

## रा. म. शास्त्री

१ सप्टेंबरला युद्धच पेटले. पण शांततेचे शेवटचे सात दिवस लंडन-पॅरिस-रोम-बर्लिन-वॉर्सा आणि मॉस्को या ठिकाणी काय घडत होते ?

२१ ऑगस्ट १९३९ ला रात्री बर्लिन रेडिओवरून प्रथम रूसो-जर्मन अनाक्रमणाचा करार ठरला असल्याचे वृत्त जगाला कळले. ब्रिटनने या घोषणेची ताबडतोब नोंद घेतली. चेंबर्लेन यांनी ब्रिटिश मंत्रिमंडळाची सभा २२ तारखेला दुपारी ३ वाजता घेतली. ही बैठक आटोपताच चेंबर्लेन यांनी पत्रक काढले व स्पष्टपणे जाहीर केले–

" Soviet-Nazi non-agression pact in no way affects their obli–gation to Paland, which they have repeatedly Stated in Public & which they are determined to fulfill ".

[ सोविएट–नाझी अनाक्रमणाचा करार झाला, याचा परिणाम म्हणून, ब्रिटनने आजपर्यंत पोलंडबाबत आपल्या ज्या उत्तरदायित्वाचा जाहीररीत्या अनेकवेळा

उच्चार केला आहे, ते पार पाडण्यात कसूर होणार नाही. ते पार पाडण्याचा आमचा ठाम निश्चय आहे. ]

सरकारी पत्रकातील हे निवेदन, इतके सुस्पष्ट असूनही चेंबर्लेन यांनी हिटलरचा पुरता भ्रमनिरास व्हावा याच उद्देशाने, त्याच रात्री एक खासगी पत्र तयार केले. त्यात ते म्हणतात–

" असे दिसते की रूसो-जर्मन कराराच्या घोषणेमुळे पोलंडच्या वतीने इंग्लंड आता काही हालचाल करणार नाही, असा गैरसमज बर्लिनमध्ये काही गोटांत पसरला आहे. असे समजणे यापेक्षा अधिक मोठी चूक असणार नाही. रूसो-जर्मन कराराचे प्रत्यक्ष स्वरूप काहीही असो. त्यामुळे पोलंडबाबतच्या ब्रिटनचे कर्तव्यात बदल होणार नाही. "

" जर वेळच आली तर क्षणाचाही विलंब न लावता आणि आमच्या सर्व उपलब्ध सामर्थ्यानिशी आम्ही पोलंडच्या मदतीला जाऊ आणि अशारीतीने एकदा लढाईला तोंड लागले, तर ते युद्ध केव्हा संपेल, हे सांगता येणार नाही–"

एवढे स्पष्टपणे लिहिल्यानंतर पत्राच्या अखेरीस चेंबर्लेन यांनी हिटलरला पुन्हा विनंती केली आहे, की पोलंडबाबतचे प्रश्न शांततेने मिटवण्याचा प्रयत्न करा. ब्रिटन याबाबत तुम्हाला सहकार्य देईल.

## मी आजच युद्ध पत्करीन

चेंबर्लेनचे हे पत्र ब्रिटिश वकील हेंडरसन यांनी २३ ऑगस्टला दुपारी ३ वाजता जातीने बर्चेसगाडन येथे हिटलरला नेऊन दिले. चेंबर्लेनचे पत्र वाचताच हिटलरने एकच त्रागा केला, असे हेंडरसन यांनी लिहून ठेवले आहे. हिटलरने तावातावात सांगितले की पोलंडमध्ये जर्मन जनतेवर अत्याचार होत आहेत. यापुढे आम्हाला ते सहन करणे शक्य होणार नाही. अखेर शेवटी चेंबर्लेन यांना दोन तासांत लेखी उत्तर देण्यास हिटलर तयार झाला.

हेंडरसन दरवाजातून बाहेर पडताच, हिटलर आपल्या सहकाऱ्यांना म्हणाला–

" Chambarlain won't Survive that Conversation, his Cabinet will fall this evening "

[ आताचे माझे बोलणे चेंबर्लेनपर्यंत पोचण्याचाच अवकाश आहे ! त्यांचे मंत्रिमंडळ आज सायंकाळीच गडगडेल. ]

दोन तासांनी हेंडरसनला पुन्हा बोलावण्यात आले व हिटलरने आपले लेखी उत्तर त्याचे हाती देऊन म्हटले–

" I am fifty years old. I prefer war now to when I will be fiftyfive or sixty. "

[ मी आज पन्नास वर्षांचा आहे. मी पंचावन्न किंवा साठ वर्षांचा असताना युद्ध होण्यापेक्षा मी आजच युद्ध पत्करीन. ]

हिटलरने आपल्या लेखी उत्तरात पूर्वीचेच सर्व मुद्दे पुन्हा मांडले–

" जर्मनीची ब्रिटनशी युद्ध करण्याची इच्छा नाही. जर्मनीची डँझिग व कॉरीडोर याबाबत पोलंडशी वाटाघाटी करण्याची केव्हाही तयारी होती, परंतु तुम्ही पोलंडला जो लढाईबाबत कोरा चेक दिलात, त्यामुळे पोलंड शेफारले व त्याने पोलंडमधील पंधरा लाख जनतेविरुद्ध अत्याचार सुरू केले. जर्मनी हे सहन करू शकत नाही. तुम्ही पोलंडबाबत आपले कर्तव्य करणार आहा... याची मी नोंद घेतो. परंतु यामुळे राईश सरकार आपल्या हिताच्या मार्गाने जाण्याचे सोडणार नाही. जर इंग्लंडने जर्मनीवर हल्ला केला, तर जर्मनी सुसज्ज व निर्धाराने उभा ठाकलेला आढळेल–"

मॉस्कोहून जे रूसो-जर्मन कराराचे आनंददायक वृत्त अपेक्षित होते, त्याच्या उन्मादात हिटलरने वरील निर्णायक पवित्रा घेतला होता, यात शंका नाही. असे करताना त्याने ब्रिटिश माणसाच्या आग्रही–हट्टीपणाचा विचार केला नाही. व्हीलर बेनेट ( Wheeler Bennett ) यांनी आपल्या ' म्युनिक ' या पाचशे पृष्ठांच्या ग्रंथात हिटलरची ही चूक अचूक दाखवली आहे–

" What Hitler had ignored in his calculations was the indomitable obstinacy and courage of the British people when in a ' tight spot ' & it was a miscalculation he was to make again & again— "

[ हिटलरने आपल्या हिशेबात एका महत्त्वाच्या गोष्टीकडे यावेळी दुर्लक्ष केले. ही गोष्ट म्हणजे ब्रिटिश माणूस कोंडीत सापडल्यावर त्याच्या ठिकाणी आढळून येणारा दुर्धर आत्मविश्वास व धैर्य ! या बाबतीत हिटलरने हीच चूक पुनःपुन्हा केली. ]

आपले लेखी उत्तर रवाना होताच दुसऱ्या दिवशी म्हणजे २४ ऑगस्टला हिटलर दिवसभर मोठ्या उत्सुकतेने– तासातासाला चेंबर्लेन व दलाँदियाँ यांची मंत्रिमंडळे गडगडल्याची बातमी येईल म्हणून वाट पाहात होता. अशी बातमी तर आली नाहीच, उलट त्याच रात्री ' अँटी कोमिर्टन पॅक्ट'चा समासद जे जपान राष्ट्र त्याचे रूसो–जर्मन करार केल्याबद्दल जर्मनीचा निषेध करणारे पत्रच हिटलरला मिळाले. अर्थात याचे विशेष दुःख त्याला झाले नाही. कारण ज्यावेळी ब्रिटन–फ्रान्सचा पराभव करून रशियावर स्वारी करू, तेव्हा आपोआप आपल्या या करारातील मेख जपानला उमजेल, अशी अपेक्षा ठेवून तो होता. त्याच दिवशी रात्री रिबेन्ट्रॉपचे विमान मॉस्कोहून आले व त्याच्या स्वागतासाठी हिटलर गेला.

## मुसोलिनीची समजावणी

२५ ऑगस्ट उजाडताच हिटलरने मुसोलिनीला पत्र लिहिले. या पत्रात आपण रूसो–जर्मन करार करण्यापूर्वी मुसोलिनीला विश्वासात का घेऊ शकलो नाही,

याचे कारण त्याने असे दिले, की घटना इतक्या झपाट्याने घडत गेल्या की पत्र लिहिण्यासही अवधी मिळाला नाही. ते कसेही असले तरी ॲक्सिस् राष्ट्रांचा या कराराने मोठा फायदाच होणार आहे, असे आश्वासन त्याने मुसोलिनीला दिले.

या पत्राचा मुख्य उद्देश मात्र निराळा होता. पोलंडवर जर्मनीचा हल्ला होण्याची वेळ अतिशय नजीक आलेली आहे, हे आपल्या परम मित्राच्या कानावर घालण्यासाठी मुख्यत: हे पत्र होते. या पत्रातही हल्ल्याची ठरलेली तारीख व वेळ हिटलरने मुसोलिनीला कळवली नाही. त्याने मोघम एवढेच कळवले--" मी तावडतोब कृती करणार आहे. सद्य:परिस्थितीत पुढच्या तासात काय घडेल याचीही शाश्वती कुणी देऊ शकणार नाही--"

हिटलरने या पत्रात इटालीने मदतीस यावे, अशी याचना केली नाही. इटाली–जर्मन करारानुसार (पोलादी करारानुसार) या युद्धात इटाली आपोआपच यावयास हवा, असे बंधन इटालीवर होते. हे पत्र रिबेन्ट्रॉपने फोनवरून रोमला कळवले व ते दुपारी ३–२० ला मुसोलिनीला मिळाले.

हे पत्र फोनवरून सांगितले जाण्याची व्यवस्था करून दुपारी १–३० वाजता हिटलरने ब्रिटिश वकील हेंडरसन याला, चॅन्सेलरीत बोलावून घेतले. या भेटीचा वृत्तांत हेंडरसनच्या शब्दांतच दिलेला बरा —

" पोलंडचा नाश करण्याचा फ्यूररचा निश्चय कमी झालेला नव्हता; परंतु या लढाईतून ब्रिटनला दूर ठेवण्याची अनिवार इच्छा त्याचे ठिकाणी दिसली. मला फ्यूरर हा अतिशय शांतपणे व मनापासून बोलत आहे असे आढळले. "

[ " He was absolutely calm and normal and spoke with great earnestness & apparent sincirity ". ]

हिटलरने सांगितले त्याप्रमाणे जर्मनीने रशियाशी कायम स्वरूपाचा समझोता केला, तसाच ब्रिटनशी करावा अशी त्याची इच्छा आहे. ब्रिटनने ही विनंती मान्य केली तर ब्रिटिश साम्राज्याला धक्का लागू नये, यासाठी जर्मनी सर्व सहाय्य देईल. मात्र ही त्याची अखेरची विनंती जर ब्रिटनने धुडकावली तर युद्ध झाल्याशिवाय आता राहणार नाही.

हिटलरची ही सर्व धडपड या दिशेने चालली होती की बाल्टिक राष्ट्राचा व अर्ध्या पोलंडचा तोबरा देऊन जसे रशियाचे तोंड बंद केले, त्याप्रमाणे ब्रिटनला त्याच्या साम्राज्याच्या रक्षणाचे अभिवचन देऊन, त्यालाही पोलंडच्या लढाईपासून वेगळे ठेवावे. परंतु चेंबर्लेनचे डोळे आता उघडलेले होते. युरोप खंडात हिटलर प्रबळ झाला व ब्रिटनचे वजन संपले, तरच साम्राज्याला अधिक धोका आहे, ही गोष्ट चेंबर्लेन यांना उमजली होती.

५–३० वाजता फ्रेंच वकील कॉलोन्ड्रे (Cowlondre) याने हिटलरची भेट घेतली. या भेटीत फ्रेंच वकिलाने बजावले–" जर पोलंडवर हल्ला झाला तर फ्रान्स

आपल्या शक्तीनिशी पोलंडच्या मदतीला जाईलच, याबद्दल संशय मनात आणू नका."

यावर हिटलरने उत्तर दिले —

"तुमच्या देशाशी लढावे लागणे, हे मला दुःखदायक आहे, परंतु ते ठरवणे माझ्या हाती नाही. दलाँदियाँ यांना माझा असा निरोप द्या."

## २५ ऑगस्टचे बर्लिन

सायंकाळचे सहा वाजले, तेव्हा २५ ऑगस्टला बर्लिनमध्ये सर्वत्र काळजीचे वातावरण पसरलेले होते. दुपारपासून इतर देशांशी रेडिओ, तारा व टेलिफोनचे दळणवळण तोडण्यात आले होते. २४ ऑगस्टला रात्रीच बहुसंख्य ब्रिटिश व फ्रेंच पत्रकार आणि रहिवासी नजीकच्या जर्मन सरहद्दीकडे निघाले होते. जर्मन परराष्ट्र-खात्याने पोलंड, ब्रिटन व फ्रान्समधील जर्मन नागरिकांना ताबडतोब स्वदेशी येण्याचा आदेश दिला होता. शहरात सर्व मोक्याच्या ठिकाणी विमानविरोधी तोफा (Anti aircraft guns) उभ्या करण्यात येत होत्या आणि डोक्यावरून बॉम्बर्सचे जथेच्या जथे पोलंडच्या सरहद्दीकडे जाताना दिसत होते.

शिररने त्या दिवशी आपल्या दैनंदिनीत लिहिले —

"It looks like war. War is imminent".

[युद्ध आलेले दिसते. लवकरच युद्धाला तोंड लागणार.]

लोक रस्त्यांत कुजबुजत होते की २६ ला पहाटे जर्मन सैन्य पोलंडची सरहद्द ओलांडणार.

रोममध्ये हिटलरचे पत्र मुसोलिनीला दुपारी ३–२० ला मिळाले. मुसोलिनीच्या हे लक्षात आले की पोलंडच्या हल्ल्याला आता फक्त काही तासांचा अवधी उरलेला आहे. परंतु मुसोलिनीला या वेळी ब्रिटिश–फ्रेंचांशी युद्ध नको होते. पोलंडवर हल्ला होताच ब्रिटन–फ्रान्स युद्ध पुकारणारच, अशी मात्र त्याची बालंबाल खात्री होती. फ्रेंच सैन्यापुढे इटालियन सैन्याचा व ब्रिटिश आरमारापुढे इटालियन आरमाराचा निभाव लागणे शक्य नाही, ही गोष्ट मुसोलिनी जाणून होता. त्यामुळे पूर्ण विचारांती मुसोलिनीने या सुरू होणाऱ्या युद्धात तूर्त न पडण्याचा निर्णय घेतला. त्याने हिटलरला पत्र लिहिले. यात तो लिहितो —

"जर्मनीने पोलंडवर हल्ला केला व जर युद्ध पोलंडपुरतेच मर्यादित राहिले, तर जर्मनीला इटाली सर्वप्रकारची राजनैतिक व आर्थिक मदत करील. जर युद्ध पसरले व पोलंडच्या मित्रांनीही जर्मनीवर हल्ला केला, तर मी हे आपल्या वेळीच नजरेस आणू इच्छितो, की इटालीची सध्याची लष्करी तयारी लक्षात घेता, आम्ही या युद्धात प्रत्यक्ष न उतरणेच चांगले. आमची तयारी नाही ही गोष्ट आम्ही वारंवार आपल्याला व परराष्ट्रमंत्री रिबेन्ट्रॉप यांना सांगितलेली आहे."

" आपल्या भेटीत युद्ध १९४२ साली अपेक्षिलेले होते व त्या वेळेपर्यंत माझी जमिनीवर, आकाशात व समुद्रावर सर्व सिद्धता झाली असती. "

" परंतु जर जर्मनी आम्हाला ताबडतोब लष्करी मदत व त्यासाठी लागणारा कच्चा माल पुरवू शकत असेल तर त्यामुळे ब्रिटिश व फ्रेंचांचा यशस्वी प्रतिकार करता येईल व आम्ही लगेच युद्धात उतरू शकू...... "

" परंतु मला असे वाटते की आम्ही युरोपात व आफ्रिकेत जी लष्करी जमवा-जमव चालवलेली आहे, त्यामुळे पुष्कळच फ्रेंच व ब्रिटिश शक्ती रोखून धरली जाणार आहे. "

" तुमचा एक विश्वासू मित्र म्हणून आमच्या परिस्थितीचे खरेखुरे चित्र आपल्या-पुढे ठेवणे हे मी माझे कर्तव्य मानतो. असे मी न करीन तर त्याचे वाईट परिणाम आपल्या सर्वांनाच भोगावे लागले असते. माझे याबाबत हे विचार आहेत. मला सरकारी चक्रे बरीच फिरवावयाची असल्यामुळे तुमचा विचार लगेच कळवा. "

— मुसोलिनी —

हे पत्र सियानोने टेलिफोनवरून बर्लिन येथे इटालियन वकील अहोलिको याला कळवले व ते त्याने सायंकाळी ६ वाजता हिटलरला स्वत: नेऊन दिले.

म्हणजे काय झाले पाहा ! आतापर्यंतचा कट्टा वैरी जो रशिया, तो पोलंडबाबत एकप्रकारे हिटलरच्या मदतीस आला व जो जिवाभावाचा मित्र मुसोलिनी, त्याने हातपाय गाळले.

असे कागदपत्रांवरून दिसते की २६ तारखेला पहाटे ४–३० वाजता पोलंडवर हल्ला करावा, असा हिटलरच्या विचार होता व तशा आज्ञाही सुटल्या होत्या. परंतु मुसोलिनीचे हे पत्र आले व पाठोपाठ इंग्लंड व पोलंड यांनी परस्पर सहकार्याचा तहच केल्याची बातमी लंडन–वॉर्सा येथून आली. म्हणजे आतापर्यंत पोलंडवर हल्ला झाला तर आम्ही मदतीला येऊ असे जे आश्वासन फक्त होते व जे ब्रिटन कदाचित पाळणार नाही, अशी वेडी आशा हिटलरला वाटत होती, ती आता मावळली. इंग्लंडचा व पोलंडचा परस्पर सहकार्याचा तहच झाल्यामुळे आता ब्रिटन युद्धात पडणार, ही गोष्ट हिटलर समजून चुकला.

२५ ला सायंकाळी काय घडले ते न्यूरेनबर्ग येथील खटल्यात जनरल कायटेलने सांगितले. जनरल कायटेल साक्षीत म्हणाला–

" I was suddenly called to Hitler at the Chancellery and he said to me— 'Stop everything at once. Get Brauchitsch immediately. I need time for negotiations. "

[ " मला एकाएकी चॅन्सेलरीत हिटलरचे बोलावणे आले. मला हिटलरने आज्ञा दिली–सर्व ब्राऊश्ला लगेच बोलावून घ्या. मला वाटाघाटीसाठी वेळ हवा आहे "]

अशीच साक्ष हर्मन गोअरिंगने दिली. यावरून मुसोलिनीच्या पत्रामुळे

२६ तारखेला पोलंडवर स्वारी करण्याचा विचार हिटलरने पुढे ढकलला.

जगात सर्वत्र खळबळ उडालेली होतीच.

२४ ऑगस्टला प्रेसिडेंट रुझवेल्ट यांनी हिटलर व पोलंडचा अध्यक्ष मोझिकी (Moscicki) यांना वाटाघाटीने प्रश्न सोडवण्याची विनंती केली. अध्यक्ष मोझिकी यांनी या संदेशाला लगेच उत्तर दिले की "आम्ही मागण्या करत नसून जर्मनी मागण्या करीत आहे. तरीही समजुतीने जर्मनीशी थेट वाटाघाटी करायला आमची तयारी आहे." प्रे. रुझवेल्ट यांनी मोझिकीचे हे म्हणणे २५ ऑगस्टला हिटलरला कळवले. परंतु हिटलरने रुझवेल्ट यांच्या दोन्ही संदेशांना उत्तरच दिले नाही. "दोन्ही संदेश मी परराष्ट्रमंत्र्यांकडे दिले आहेत," असा निरोप त्याने रुझवेल्ट यांना धाडला.

२५ ऑगस्टलाच बर्लिनमधील सर्व फ्रेंच व ब्रिटिश प्रजाजन जर्मन सरहद्दीबाहेर निसटले होते. २७ ऑगस्टला तानेबर्ग येथे भरणारा नाझी पक्ष सदस्यांचा मेळावा, ज्यापुढे हिटलर बोलणार होता तो रद्द करण्यात आल्याचे जाहीर झाले. २७ ऑगस्टला सरकारने अन्न-धान्य, साबू, पादत्राणे, कापड आणि कोळसा या वस्तूंचे रेशनिंग अमलात आणले. या महत्त्वाच्या गोष्टींवर नियंत्रण जाहीर होताच जर्मन जनतेची प्रथम झोप उडाली व युद्ध आता दाराशी आल्याचे वर्तमान जर्मन घराघरांत जाऊन पोचले. २८ ऑगस्टला बर्लिन रहिवासी पाहात होते की गाड्या भरभरून सैन्यांचे ताफे पोलिश सरहद्दीकडे निघाले होते.

## गोबेल्सची प्रचारयंत्रणा

या दिवशी शिरर बर्लिनमध्ये होता. १० ऑगस्टलाच तो न्यूयॉर्क, वॉशिंग्टन व पॅरिस येथे सुटीसाठी जाऊन परतला होता. स्वित्झर्लंडमधून आपल्या घरून निघताना, दोन दिवसांपूर्वी त्याने अनेक वृत्तपत्रे खरेदी केली होती. जगातील सर्व वृत्तपत्रे हे सांगत होती की जर्मनी लवकरच जागतिक शांततेचा भंग करणार आहे. याउलट प्रत्यक्ष बर्लिनमध्ये मात्र गोबेल्सची वृत्तपत्राची यंत्रणा सर्व जनतेची अशी समजूत करून देत होती, की पोलंडच जर्मनीवर हल्ला करण्याच्या बेतात असून जागतिक शांतता भंग करण्याचे पाप पोलंड करीत आहे !

तिथल्या वृत्तपत्रांचे २६ ऑगस्टचे काही ठळक मथळेच पाहा—

"Warsaw threatens bombardment of Danzing"

—Der Fuehrer

"Complete chaos in Poland–"

B. Z.

"Three German passage planes shot by Poles. Many German houses in flame in Corridor."

Uho Blatt.

" Whole of Poland in war fever ! 15,00,000 men mobilized. Chaos in upper Silesia "

—Voelkischev Beobachter

[ डँझिगवर बॉम्बफेकीची वॉर्साची धमकी. पोलंडमध्ये सावळागोंधळ–जर्मन कुटुंबे पळू लागली.

जर्मनीची तीन वाहतूक विमाने पोलंडने पाडली. कॉरीडॉरमधील जर्मन शेतकऱ्यांच्या घरांची जाळपोळ.

पोलंडमध्ये युद्धज्वराचा जोर. १५,००,००० लोकांची धटका भरली. उत्तर सायलेशियात गोंधळ. ]

या तऱ्हेने सतत वृत्तपत्रांनी प्रचार करीत आणल्यामुळे बर्लिनमधील व एकंदर जर्मन जनतेला असेच वाटत होते, की पोलंड हा शांतताभंगासाठी उत्सुक झाला आहे.

## मुसोलिनीची फरपट

मुसोलिनीचें पत्र मिळताच हिटलरने इटालीच्या वकिलामार्फत विचारणा केली, की इटालीला कोणते रणसाहित्य व कच्चा माल दिल्यास इटाली युद्धात पडू शकेल ? अँट्रोलिकोने रोमहून यादी मागवली व ती लगेच पाठवली गेली. या यादीत मागणी होती–

(१) सत्तर लाख टन पेट्रोलियम्
(२) साठ लाख टन कोळसा
(३) वीस लाख टन पोलाद
(४) दहा लाख टन लाकूड
(५) सहाशे टन मोलिबडेनम्
(६) चारशे टन टायटॅनम्
(७) वीस टन झिरकोनिअम्
(८) १५० विमानविरोधी तोफा

हे एवढे साहित्य इटाली युद्धात पडण्यासाठी इटालीला जर्मनीकडून हवे होते ! हिटलरने २६ ऑगस्टलाच अखेर मुसोलिनीला कळवले–

" Duce, I understand your Position and would only ask you to try to achieve the pinning down of Anglo–French forces by active propoganda & suitable military demonstrations, such as you have already proposed to me. "

[ ड्यूस, मला तुझी परिस्थिती समजू शकते, म्हणूनच माझी एवढीच अपेक्षा आहे, की तीव्र प्रचार व योग्य तसे लष्करी बळाचे प्रदर्शन करून तू अँग्लो–फ्रेंच फौजांना आफ्रिका व इटालींची उत्तर सरहद्द येथून हलू देऊ नकोस. ]



हिटलर–मुसोलिनी : पहिल्या भेटींचा उत्साह आता ओसरला होता

याच पत्रात हिटलरने सुरवातीला आत्मविश्वासपूर्वक हेही कळवले, की ब्रिटन व फ्रान्सची पश्चिमेकडे एकही महत्त्वाची लढाई मारण्याची ताकद नाही. पोलंडचा मी हा हा म्हणता पराभव करतो. पूर्वेकडचे हे काम उरकताना मला पाठीवरील अँग्लो-फ्रेंचांची यत्किंचितही भीती वाटत नाही.

हिटलरचा योद्धा या नात्याने आपल्या कर्तृत्वावर केवढा विश्वास होता पाहा ! आणि तो अनाठायी नव्हता, हे पुढल्याच आठवड्यात जगाच्या दृष्टोत्पत्तीस आले.

हिटलरचे पत्र मुसोलिनीला बरेच लागले. त्यात हिटलरने त्याचा उपहास केलेला नव्हता, परंतु करार करूनही आज प्रत्यक्ष प्रसंग आला, तेव्हा आपण जर्मनीची साथ करू शकत नाही, याची रुखरुख मुसोलिनीला लागली. त्याला वाटले, अखेरचा प्रयत्न करून पुन्हा एकदा 'म्युनिच' घडवावे. वाटाघाटीचा अखेरचा प्रयत्न मी करतो, असे पत्रोत्तर त्याने पुन्हा हिटलरला धाडले. लढाईची ताकद नव्हती, म्हणून केवळ मुसोलिनीला समझोता हवा होता !

परंतु हिटलरचे आता केवळ डँझिग व कॉरीडॉर घेऊन समाधान होणार

नव्हते पोलंडचा फडशा पाडण्याचा निश्चय त्याने केला होता व या नव्या बळीचा अर्धा प्रसाद स्टॅलिनच्या हातावर ठेवण्याचेही त्याने मान्य केले होते.

मुसोलिनीच्या मनाची स्थिती त्याचा जावई व परराष्ट्रमंत्री काऊंट सियानो याने वर्णन केली आहे.

"The Duce is really out of his wits. His military instinct and his sense of honour were leading him to war. Reason has now stopped him. But this hurts him very much..."

[ ड्यूसचे चित्त ठिकाणावर नाही. त्याची लष्करी वृत्ती व स्वाभिमानी मन त्याला युद्धप्रवृत्त करीत होते, परंतु वस्तुस्थितीने त्याला रोखून धरले आहे. या गोष्टीचे त्याला अतीव दुःख होत आहे. ]

सियानो हा स्वतः मात्र मनात बर्लीन भेटीपासून हिटलरच्या वृत्तीला कंटाळला होता. यामुळे मुसोलिनीला युद्धापासून परावृत्त करण्यात या वेळी त्याचा मोठाच हात होता.

### फ्रान्सची आत्मवंचना

युद्ध सुरू झाले, तर पश्चिम आघाडीवर दोस्तांचे म्हणून जे सैन्य उभे राहणार होते, ते सर्व फ्रेंच सैन्य असणार होते, इतकेच नव्हे तर जर्मनीचे बरेच सैन्य पूर्वेकडे पोलंडच्या स्वारीत गुंतलेले असताना, फ्रेंच सैन्य संख्येने जर्मन सैन्यापेक्षा अनंतपटीने जास्त राहणार, ही उघड गोष्ट असूनही, हिटलरला फ्रेंच सैन्याची यत्किंचितही भीती वाटत नव्हती, असे स्पष्ट दिसते. २६ ऑगस्टला फ्रेंच पंतप्रधान दलाँदियाँ याने हिटलरला अखेरची विनंती केली, ती फारच हेलावणाऱ्या शब्दांत.

"If the blood of France & Germany flows again as it did twenty five years ago, in a longer and even more murderous war, each of the two peoples will fight with confidence in its own victory, but the most certain victors will be the forces of destruction and barbarism—"

[ ज्याप्रमाणे २५ वर्षांपूर्वी फ्रेंचांचे व जर्मनीचे रक्त सांडले, त्याचप्रमाणे यावेळीही त्याहून अधिक काळ चालणाऱ्या पाशवी युद्धातही ते सांडले जाणार असेल, तर दोन्ही देशांतील लोक आपल्याच जयाच्या आत्मविश्वासाने हे युद्ध खेळतील. परंतु अखेर शेवटी जय होणार आहे, तो फक्त सर्वनाशक शक्तीचा आणि क्रौर्याचा ! ]

या फ्रेंच पंतप्रधानाच्या मानवतावादी सुराला हिटलरने दिलेले उत्तर तितकेच हुशारीचे होते. हिटलरने दलाँदियाँना कळवले–

"Germany had renounced all territorial claims on France after the return of Saar. There is, therefore, no reason, why you should go to war. If you go to it, if is not my fault and it will

be very painful to me."

[" ज्या वेळी फ्रान्सने सार प्रांत जर्मनीला परत केला, त्याच वेळी जर्मनीची फ्रान्सकडे कसलीही प्रादेशिक मागणी शिल्लक राहिली नाही. म्हणूनच आता तुम्हाला युद्ध करण्याचे खरोखरच काही कारण दिसत नाही. परंतु तुम्ही युद्ध सुरूच केले, तर तो काही माझा दोष नाही. मलाही या गोष्टीचे दु:खच होईल." ]

यानंतर पुन्हा १ सप्टेंबर १९३९ पर्यंत दलाँदियाँ व हिटलर यांच्यात कसलाही पत्रव्यवहार झाला नाही. दलाँदियाँ यांचा युद्धाकडे पाहण्याचा जो दृष्टिकोन, तो त्यांच्या पत्रांतून दिसतो, तोच त्या वेळी फ्रेंच राष्ट्राचा सर्वसाधारणपणे युद्धविषयक दृष्टिकोन होता, असे मान्य केले तर फ्रान्स का कोलमडले? जर्मनीला फ्रेंचांची भीतीच का वाटत नव्हती? या प्रश्नाची उत्तरे मिळू शकतील.

युद्धात जय कुणाचाच होत नाही! जय होतो तो सर्वनाशी वृत्तीचा व क्रौर्याचा ......वगैरे तत्त्वज्ञान हे अत्यंत फसवे आहे. सुखासिनांना व भ्याडांना ते आसरा देते, म्हणून त्याचे कौतुक करण्यात काय हशील! युद्ध कुणी सुखासुखी पत्करत नाही. ज्या वेळी राष्ट्र युद्ध पत्करते, तेव्हा...असे काहीतरी पणाला लागलेले असते, की 'सर्वनाश पत्करला, परंतु यावर तडजोड नाही'—असा त्या राष्ट्राचा निर्धार असतो. ज्यांना काही पणाला लावायचे नाही, ते सतत 'रणा'ची अवहेलना करण्यात स्वत:कडे मोठी थोर बुद्धी घेतात! अशी भूमिका घ्यायला काय भांडवल लागते? जर फ्रान्सने एकदा ही भूमिका पत्करली असती, की पोलंडची सरहद्द जर्मनीने ओलांडणे हे उद्या फ्रान्सची सरहद्द जर्मनी ओलांडणार आहे, याची नांदी आहे. म्हणून फ्रान्स जर्मनीविरुद्ध लढणार आहे तर मग युद्धाची अवहेलना कशाला? उलट फ्रान्सने असेच म्हटले पाहिजे होते की आम्ही सर्वनाश पत्करू, परंतु युद्ध कर्तव्यच मानू, तर ते शोभले असते.

या एका भूमिकेवर चर्चिल व दलाँदियाँ यांना तपासले तर, ब्रिटन व फ्रान्समधला फरक लक्षात येईल. चर्चिलने सर्वनाश पत्करू, इंग्लंड बेचिराख होऊन जर्मनीने कबजात घेतले, तरी अमेरिकन भूमीवरून लढू, असा पवित्रा युद्धात उतरल्यापासूनचा घेतला. फरान्स मात्र जर्मनीच्या रेट्यापुढे गडगडले. पॅरिसमधील सुंदर वास्तूंचा नाश होईल, म्हणून पॅरिस लढवलेच नाही!! म्हणूनच युद्धाच्या सुरवातीपासूनच हिटलरला फ्रेंचांची भीती वाटत नव्हती ...... भीती वाटत होती ती फक्त इंग्लंडची!

याला जर्मन सरकारचे दिलेले लेखी उत्तर घेऊन ब्रिटिश वकील हेंडरसन हे, खास जर्मन विमानाने शनिवारी २५ ऑगस्टलाच लंडनला रवाना झाले होते. इंग्लंडमधील जर्मन वकील डर्कसेन या वेळी रजेवर होता व त्याने या शेवटच्या धावपळीत काहीच भाग घेतलेला नाही. हेंडरसनव्यतिरिक्त आणखी एक स्वीडिश गृहस्थ इंग्लंड-जर्मनीत समेट घडावा, यासाठी प्रयत्न करीत होता. याचे नाव

ब्रिगेर् डेलहेरस (Dalherus) गोअरिंगचा हा मित्र होता व २५ तारखेलाच हाही लंडनमध्ये आलेला होता.

## डाल्वेरुसची धावपळ

न्यूरेन्बर्ग खटल्यात गोअरिंग याने असे सांगितले. सरकारी यंत्रणेबाहेर आणखी एका मित्रामार्फत आपण हॅलिफॅक्स यांचेशी संबध ठेवून होतो. हा माणूस म्हणजेच डाल्वेरुस होय. स्टॉकहोमहून गोअरिंगने त्याला मुद्दाम बोलावून घेतले होते व आपले स्वतःचे विमान त्याचे दिमतीला देऊन त्याची लंडनला रवानगी केली होती.

हॅलीफेक्स यानी नुकताच अँग्लो–पोलिश करार हातावेगळा केला न केला तोच डाल्वेरुस हा त्याला भेटला. गोअरिंगचा निरोप त्याने हॅलिफेक्स यांना दिला की रूसो-जर्मन करार झाला असला, तरी जर्मनीची इंग्लंडविरुद्ध कारवाई करण्याची इच्छा नाही. ब्रिटनशी जर्मनीला समझोताच हवा आहे.

डाल्वेरुस याने पुढे असे सांगितले की––

" Goring is the one German who can prevent war. "

[ गोअरिंग हाच एक जर्मन माणूस आहे, की जो युद्ध टाळू शकेल. ]

डाल्वेरुसच्या आग्रहाला बळी पडून हॅलिफेक्स यानी एक खासगी पत्र गोअरिंग-साठी दिले व ते घेऊन २६ ऑगस्टलाच विमानाने बर्लिनला येण्यास निघाला. म्हणजे ज्या दिवशी हेंडरसन हिटलरचे पत्र घेऊन लंडनला आला, त्याच दिवशी हॅलिफेक्सचे पत्र घेऊन डाल्वेरुस बर्लिनला आला.

डाल्वेरुस पोहोचला, तेव्हा रात्रीचे बारा वाजून गेलेले होते. त्याने जाऊन गोअरिंगला उठवले व ते दोघे तडक हिटलरच्या भेटीस आले. हिटलरला जागा करून हॅलिफेक्स यांचे पत्र डॉल्वेरुसने त्याला दाखवले. या पत्रातही हिटलरला हवी होती ती म्युनिचछाप शरणागती नव्हती ! यामुळे हिटलर चवताळल्यासारखा झाला. तो डाल्वेरुसला म्हणाला ––

" Herr Dahlerus, you who know England so well, can you give me any reason for my perpetual failure to come to an agreement with her ? "

[ " हर डाल्वेरुस––तुम्ही इंग्लंडला चांगले ओळखता. तुम्ही तरी मला पुनःपुन्हा इंग्लंडशी समझोता घडवून आणण्यात अपयश का येते याचे कारण सांगू शकाल काय ? " ]

यावर डाल्वेरुसने सांगितले––

" इंग्लंडला तुमच्याविषयी व तुमच्या सरकारविषयी विश्वास वाटत नाही––"

हिटलर चिडून म्हणाला––

" Idiots ! ......" [ महामूर्ख आहेत. ]

मग गोअरिंग मधे पडला व अखेर हिटलरने आपल्या तडजोडीसाठी असलेल्या

मागण्या पुन्हा मांडाव्या असे ठरले. या अटी अशा ठरल्या :—

(१) जर्मनीची इंग्लंडशी मैत्री ठेवण्याची इच्छा आहे.

(२) ब्रिटनने जर्मनीला डँझिग व कॉरीडॉर मिळविण्यासाठीं मदत करावी. डँझिगचा उपयोग बंदर म्हणून पोलंडला करता येईल.

(३) नव्या पोलिश राष्ट्राच्या सरहद्दींना जर्मनी अभय जाहीर करील.

(४) पोलंडमधील अल्पसंख्य जर्मनांना जर्मनी अभय जाहीर करील.

(५) जर्मनी ब्रिटिश साम्राज्याचे रक्षण करण्यास ब्रिटिशांना मदत देईल.

हिटलरने सुचविलेली ही तडजोड डॉल्वेरुसने तोंडीच चेंबर्लेन व हॅलिफेक्स यांना सांगावी व त्याची प्रतिक्रिया कळवावी असे ठरले. २७ ऑगस्टला रविवार होता. त्या दिवशी सकाळी डाल्वेरुस या नवीन कामगिरीवर विमानाने निघाला.

लंडनमधे चेंबर्लेन व हॅलिफेक्स यांचेसमोर आता दोन तडजोडीच्या योजना होत्या. एक, हेंडरसन याने आणलेली. त्यांत हिटलरने पोलंडचा प्रश्न निकालात निघताच ब्रिटनशी मैत्रीकरार करण्याची इच्छा दर्शविली होती व या दुसऱ्या डॉल्वेरुसमार्फत आलेल्या योजनेत...डँझिग व कॉरीडॉर जर्मनीला दिल्यास— जर्मनी पोलंडच्या नव्या सरहद्दींना अभय देईल, असे सांगितले होते. चेंबर्लेन यांना म्युनिचला जो अनुभव आला होता, त्या पार्श्वभूमीवर ते आता हिटलरच्या आश्वासनावर विश्वास ठेवण्यास तयार नव्हते. त्यांनी डाल्वेरुसला तोंडीच सांगितले—

" The poles might concede Danzig but they would fight rather than surrender the corridor. "

[पोलिश लोक डँझिग सोडण्यास कदाचित तयार होतील. परंतु कॉरीडॉरची मान्य करण्यापेक्षा ते युद्ध पत्करतील. ]

तरीपण शांतता टिकवावयाची असेल, तर जर्मनी व पोलंड यांनी ताबडतोब वाटाघाटी कराव्या अशीच ब्रिटनची इच्छा आहे. ही गोष्ट चेंबर्लेनी स्पष्ट केली. या सर्व गोष्टी तोंडातोंडी व गुप्तपणे नकोत, म्हणून ब्रिटिश पंतप्रधानांचे हे मत उद्या ब्रिटिश वकील हेंडरसन, हे उत्तर घेऊन बर्लिनला येतील, तेव्हा हिटलरच्या कानावर घालतील. या सर्व पार्श्वभूमीवर हिटलरने काय ते ठरवावे, असा जबाब घेऊन डाल्वेरुस २८ ऑगस्टला दुपारी पुन्हा बर्लिनला निघाला.

### समझोत्याचा आणखी एक प्रयत्न

ब्रिटन वकील हेंडरसन याचेशी विचारविनिमय करून चेंबर्लेन व हॅलिफॅक्स यांनी जे लेखी उत्तर हिटलरला धाडले ते अत्यंत मार्मिक व बाणेदार आहे. या उत्तरात ब्रिटनने कळवले –

" The British Govt. entirely agreed that there must first be a settlement of difference between Germany & Poland. Everything

however depend upon the nature of the settlement & the method by whicn it is to be reached."

"The British Govt. could not for any advantage offered to Great Britain acquiesse in a settlement which put in jeopardy the independence of a state to whom they had given their guarantee."

[ "ब्रिटिश सरकार या गोष्टीशी एकदम सहमत आहे की प्रथम जर्मनी व पोलंड यांचेमधील तंटयाचा शेवट होऊन समझोता झाला पाहिजे. परंतु या समझोत्याचे स्वरूप काय व तो घडवून आणण्यासाठी कोणती पद्धत अबलंविली जाणार आहे, यावर अर्थात सर्व काही अवलंबून आहे."

"ब्रिटिश सरकार ...... त्यांना काही आमिष देऊ केले आहे — या कारणास्तव केवळ असा समझोता घडवून आणण्यास सहभागी होणार नाहीत, की ज्यामुळे...... ज्या देशाला त्यांनी अभय दिले आहे त्याचे स्वातंत्र्यच धोक्यात येईल ......" ]

ब्रिटनच्या या उत्तरात सरळ सरळ दोन टोले होते. समझोता हवा — समझोता हवा या इच्छेसाठी तुम्ही झेकोस्लोव्हाकिया, ऑस्ट्रिया यांच्यावर जो दबावाचा प्रयोग केलात, तसा करण्याचे स्वातंत्र्य पोलंडबाबत ब्रिटिश सरकार देणार नाही व रशियाला मृदंगलेप लावून तुम्ही जसे आपलेसे केलेत, तसा प्रकार ब्रिटनबाबत अपेक्षू नका. या सगळ्याचा थोडक्यात अर्थ होता — ब्रिटनला जर्मनीशी मैत्री हवी आहे, शांतता हवी आहे. परंतु जर हिटलरने पोलंडवर हल्ला केला, तर मात्र इंग्लंड युद्ध केल्याशिवाय राहात नाही.

हिटलरने ब्रिटनचे उत्तर वाचले. २८ ऑगस्टला हेंडरसनशी झालेल्या त्याच्या भेटीत हेंडरसन जास्त बोलत होता. हिटलर विचार करीत होता. त्याने हेंडरसनला सांगितले की — "तुमच्या उत्तरावर काळजीपूर्वक विचार करावा लागेल. उद्या, म्हणजे २९ ऑगस्टला आमचा लेखी जबाब देऊ —"

या भेटीनंतर हेंडरसनला बरीच आशा निर्माण झाली की बहुधा हिटलर ब्रिटनचे म्हणणे मान्य करील व पोलंडशी वाटाघाटीला तयार होईल. डाल्वेरुसने गोअरिंगचा कानोसा घेतला, तेव्हा गोअरिंगचे म्हणणेही असेच आले की बहुतेक आता युद्ध होत नाही. डाल्वेरुस आनंदाने ओसंडू लागला. तो तडक हेंडरसनला भेटावयास आला. ही त्यांची पहिलीच प्रत्यक्ष भेट होती. त्याने हेंडरसनला बातमी सांगितली— बहुधा जर्मन नेते ब्रिटिश विनंतीला मान देऊन पोलंडशी वाटाघाटीला तयार होतील.

सर नेव्हिल हेंडरसन हे मात्र आता या बाबतीत काहीच बोलावयास तयार नव्हते. जर्मनांचे दुटप्पी वागणे त्याला चांगले अनुभवास आले होते. २९ ऑगस्टला सायंकाळी सात वाजून पंधरा मिनिटांनी हेंडरसन चॅन्सेलरीत उत्तर आणण्यासाठी गेला. जर्मनीचे लेखी उत्तर त्याचे हाती आले —

या उत्तरांत जर्मनीने कळवले —

" ………पोलंडशी वाटाघाटी करून काही साध्य होईल, या ब्रिटनच्या मताशी आम्ही सहमत नाही, परंतु ब्रिटनच्या विनंतीला मान देऊन जर्मनी पोलंडशी वाटाघाटी करण्यास तयार आहे. मात्र पोलंडच्या वाटाघाटीत जे ठरेल, त्याला सोविएट रशियाची अनुमती घ्यावी लागेल. "

या पत्रात शेवटी तिढा टाकलेला होता.

" The German Govt. accordingly agree to accept the British Govt's offer of their good offices in securing the dispatch to Berlin of a Polish emisary with full powers. They count on the arrival of the emisary on Wednesday the 30 Aug. 1939. "

२९ तारखेला रात्री जर्मनी हे सांगत होता की ३० तारखेला बुधवारपर्यंत पोलंडचा सर्व अधिकार असलेला प्रतिनिधी बर्लिनमध्ये हजर राहावा. या प्रतिनिधीला ठरलेल्या वेळी हजर ठेवण्याची जबाबदारी इंग्लंडने घ्यावी. हे सर्व जर्मनी मान्य करीत आहे, ते केवळ ब्रिटनने आपल्याला जी शांतता राखण्याची विनंती केली, तिचा मान राखण्यासाठी !

शेवटचा हा परिच्छेद वाचताच हेंडरसन उद्गारला —

" That sounds like an ultimation. "

(ही धमकीवजाच भाषा दिसते.)

यावर हिटलरने नेहमीचे अस्त्र काढून म्हटले —

" ही धमकी नाही, परंतु प्रत्येक क्षण मोलाचा मात्र आहे. दोन शस्त्रसज्ज सैन्ये समोरासमोर उभी आहेत. माझे सैनिक विचारीत आहेत — ' हो ' की ' नाही ' ?
(My soldiers are asking me — ' Yes ' or ' no ' ? )

आधीच एक आठवडा फुकट गेला आहे. "

हिटलरचा कावा यावेळी उघड होता. ३० ऑगस्टला पोलंडचा प्रतिनिधी बर्लिनला आला की बेनेस व हाचा यांचेप्रमाणे त्याच्यावर दडपण आणावयाचे व जर वाटाघाटी फिसकटल्याच तर या निमित्ताने पोलंडवर हल्ला करून मोकळे व्हायचे.

[ अपूर्ण ]

संततिनियमनाचा प्रचार करण्यात महाराष्ट्राने फार उत्साह दाखवू नये, असे मत काही ठिकाणी नुकतेच मांडले गेले आहे. कारण काय, तर लोकसंख्येच्या कसोटीवर जे प्रश्न सुटतात त्याबाबत महाराष्ट्राची बाजू त्यामुळे लंगडी पडत जाईल.

ही विचारसरणी महाराष्ट्रापुरती लागू केली तरी चांगलीच पंचाईत होईल. जो वर्ग अधिक सुशिक्षित व समंजस तोच कुटुंबनियोजनाचा स्वीकार करीत असतो. अशिक्षित, असंस्कृत लोकसंख्या मात्र तशीच वाढत राहते. महाराष्ट्रातही हा अशिक्षित बहुसंख्येचा धोका वाढणार नाही का ?

मुसलमान समाज संततिनियमनाला फारसा अनुकूल नाही. मग हिंदूंनीच एकट्याने संततिनियमन चालू ठेवणे यात मुसलमान बहुसंख्येचा धोका आहेच की।

पण हा दृष्टिकोनच चुकीचा व प्रतिगामी म्हटला पाहिजे. वास्तविक जे कुटुंबनियोजनाकडे पाठ फिरवून आहेत त्यांना प्रवृत्त करण्याचे कार्यच, जे अधिक सुशिक्षित समजले जातात त्या वर्गाने निकडीने हाती घेतले पाहिजे. वासरांना शिंगे नाहीत म्हणून गायीने आपली शिंगे मोडून घेणे योग्य नाही.

आणि कुटुंबनियोजन म्हटले की साधनांचा विचार आलाच. आज शस्त्रक्रिया हे राजमान्य साधन मानले गेले आहे. पण या साधनाबाबत अद्याप बरेच गैरसमज दिसतात. ते दूर करण्याचा प्रयत्न म्हणून हा सुबोध शास्त्रीय लेख येथे दिला आहे.

# पूर्णविराम

**डॉ. शरद अभ्यंकर**

आमच्या हॉस्पिटलशेजारी एक गरीब सुतार राहातो. तो, त्याची बायको आणि सहा मुले; यांतहि कोणी ना कोणी रोज हमखास आजारी असतात आणि औषधोपचाराकरिता ते नेहमी हॉस्पिटलमध्ये येतात. मुले खेळताना पडतात, लागतं आणि त्यांना पट्टी करणं, वेळप्रसंगी इंजेक्शन करणे, ही कामे आम्हांसच करावी लागतात. मात्र याकरता घेतला जाणार मामुली



आकारही तो कधीच भरत नाही. मुद्दाम नव्हे, तर खरोखर दोन वेळेला अन्नाचीसुद्धा त्याला भ्रांतअसते.

" कायरे लक्ष्मण, तुला रोज किती पैसे मिळतात ? " मी त्याला विचारले.

" कुठले साहेब, कधी तीन रुपये, तर कधी तीन आणेसुद्धा मिळत नाहीत. "

" मग तू मुलं बंद होण्याकरता ऑपरेशन का करून घेत नाहीस ?"

" छे छे साहेब. आमचं मेहनतीचं काम असतं. ऑपरेशन करून सध्या मिळतात ते चार-आठ आणेसुद्धा मिळेनासे होतील. "

त्याला मी नाना परीनं समजावून सांगितलं की हे ऑपरेशन अगदी साधं असतं. एक दिवस विश्रांती घेतली तरी पुरते. पण छे ! मी फुकट ऑपरेशन करायची तयारी दर्शवली. ऑपरेशन करून घेतलं नाहीस तर यापुढे औषध देणार नाही असा दम दिला, पण तो पठ्ठ्या काही बधला नाही.

पुरुषांची ही तऱ्हा, तशीच बायकांची. चौथ्या किंवा पाचव्या खेपेला आलेल्या बाईला ऑपरेशनला तयार करायचीच, असा आमचा शिरस्ता असतो. या बायकाही मोठ्या मासलेवाईक अडचणी सांगतात. " आम्ही तिसऱ्या मजल्यावर राहतो, त्यामुळे ऑपरेशननंतर चढउतार कशी सोसेल ? " " घरी करायला कुणी नाही. " या असल्या लंगड्या सबबीपासून " खर्च परवडणार नाही " इथंपर्यंत. अर्थात आणखी काही बाळंतपणं होऊन त्या मुलांना लहानाचं मोठं करणं यांना परवडतं आणि आताच काही थोडा-जास्त खर्च परवडत नाही याचं आश्चर्य वाटतं !

थोडक्यात काय की या गोष्टीबद्दल पूर्ण माहिती नसल्यामुळं, अनेक गैरसमज असल्यामुळं आणि हा विषय मोकळेपणाने बोलता येण्यासारखा नसल्यामुळं बरेचजण निष्कारण घाबरून ऑपरेशनला नकार देत असतात. त्यामुळे या लेखात स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या संततिप्रतिबंधक शस्त्रक्रियांविषयी सर्व माहिती देऊन शक्य त्या सर्व शंका निरसन करण्याचा प्रयत्न करणार आहे. कोणाला आणखी

काही शंका वा अडचणी असल्यास जरूरीप्रमाणे विचाराव्या.

पहिला प्रश्न असा निघतो की **संततिनियमनाची इतकी प्रभावी साधनं उपलब्ध असताना ऑपरेशनसारख्या खर्चिक आणि त्रासदायक गोष्टीचा एवढा आग्रह का?** याचं उत्तर असं की संततिनियमनाची साधनं ही मुख्यतः पाळणा थांबवण्याकरता वापरायला जास्त योग्य असतात. पाळणा थांबवायचा म्हणजे त्यावर शस्त्रक्रिये-सारखा कायम स्वरूपाचा उपाय करणेच श्रेयस्कर. साधने कितीही प्रभावी असली तरी दीर्घकाल वापरात त्यात एखादेवेळी तरी गफलत होण्याची शक्यता असते. तसेच सतत साधनांच्या वापराने शरीराच्या श्लेष्मह त्वचेवर घातक परिणाम होण्याची शक्यता असते. शिवाय आपण साधने वापरत आहोत खरे, पण तरीही काही होणार तर नाही ना, असा विचार सतत मनात असल्यामुळे लैंगिक संबंधातले सुख अनिर्बंधपणे मिळू शकत नाही.

**२ : ऑपरेशन पुरुषाचे करावे की स्त्रीचे ?**

हा ज्याचा त्याचा वैयक्तिक प्रश्न आहे. माझा स्वतःचा अनुभव असा आहे की पुरुष स्वतःवर शस्त्रक्रिया करून घेण्याला सहसा तयार होत नाहीत. स्त्रिया मात्र या बाळंतपणानंतर ऑपरेशन करून टाका असे स्पष्ट सांगतात. दोन्हींपैकी कोणत्याही ऑपरेशनचा परिणाम एकच असला तरी विशेषतः मागासलेल्या वर्गात अशी समजूत असते की समजा काही आपत्तीमुळे आहे या संततीला इजा पोचली तरी पुरुषाला दुसरे लग्न करून आणखी मुले होण्याची शक्यता कायम राखण्याकरिता त्याने ऑपरेशन न करणे चांगले. याउलट एका इसमाने मला स्पष्टच सांगितले होते की त्याच्या पत्नीचे ऑपरेशन केले तर ती वाटेल त्या पुरुषाशी संबंध ठेवायला भिणार नाही, त्यापेक्षा त्याचेच केलेले बरे !

**३ : पुरुषांचे ऑपरेशन करतात म्हणजे नेमके काय करतात ?**

याकरता आपणास थोडी शरीररचना शिकली पाहिजे. पुरुषाच्या अंडग्रंथीमध्ये (Testicles) तयार होणाऱ्या शुक्रपेशी (Sperms) Vas defference नावाच्या एका शिरेतून वीर्याशयात (Seminal vesicles) आणल्या जातात. येथे इतर अनेक स्रावांमध्ये मिसळून त्या वीर्यस्खलनाच्या वेळी मूत्रमार्गातून बाहेर पडतात. प्रजोत्पत्ती होण्यास या शुक्रपेशींची आवश्यकता असतेच. (Absolute necessity) ऑपरेशनच्या वेळी Vas deffereence वेगळा करून त्याचा ३/४ इंचपर्यंत भाग कापून टाकून दोन्ही बाजूंची मोकळी टोके बंद करतात. म्हणून या ऑपरेशनला Vascetomy (Cutting out the Vas) म्हणतात.

**४ : ऑपरेशनला वेळ किती लागतो ?**

साधारणपणे अर्धा तास. अतिकुशल शस्त्रवैद्य १० मिनिटांत हे ऑपरेशन करू शकतो.

**५ : भूल (Anaesthasia) कोणत्या प्रकारची देतात ?**

स्थानिक संमोहन म्हणजेच Local Anaesthasia ऑपरेशनच्या जागी प्रोकेन किंवा Novocaine सारखे बधिरता आणणारे इंजेक्शन करून ऑपरेशन केले जाते.

**६ : रक्तस्राव किती होतो ?**

अगदी थोडा. पेन्सिल तासताना बोट कापले तर कित्येकदा यापेक्षा जास्त रक्त जाते.

**७ : जखम किती मोठी करावी लागते ?**

काही शस्त्रवैद्य गफलत होऊ नये म्हणून ३" पर्यंत लांब छेद (Incision) घेतात. बहुधा १" पर्यंत छेदाने काम भागते. मी स्वतः ½" छेद घेऊन यशस्वी शस्त्रक्रिया केल्या आहेत.

**८ : ऑपरेशनच्या वेळी फार त्रास होतो का ?**

नाही; पण बधिरता आणणाऱ्या इंजेक्शनमुळे वेदना कळत नाहीत, पण स्पर्श कळतो. थोडी ओढ बसल्याच्या संवेदना होतात.

**९ : ऑपरेशननंतर अंथरुणात पडून राहावे लागते का ?**

नाही. मी ऑपरेशन केलेले काही लोक लगेच १ मैलपर्यंत चालत घरी गेले आहेत.

**१० : टाके कितव्या दिवशी काढतात ?**

साधारणपणे एक आठवड्यात.

**११ : टाके काढतेवेळी त्रास होतो का ?**

अगदी थोडा (Negligible).

**१२: टाके काढेपर्यंत पूर्ण विश्रांती घ्यावी लागते का ?**

नाही. नेहमीची बैठी कामे करण्यास काहीच हरकत नाही.

**१३: नंतर इंजेक्शने घ्यावी लागतात का ?**

Sepsis होऊ नये म्हणून बहुतेक शस्त्रवैद्य २–३ दिवस पेनिसिलीन किंवा Saltha देतात.

**१४: ऑपरेशननंतर लैंगिक अनुभवात काय फरक पडतो ?**

काहीही नाही. लैंगिक आकर्षण, उत्थापन, प्रत्यक्ष संबंध व वीर्यस्खलन या सर्व गोष्टी पूर्ववत चालू राहतात. (माझा एक डॉक्टर मित्र या ऑपरेशनला गमतीने 'काम चालू–रस्ता बंद' असे म्हणत असे)

**१५ : ऑपरेशननंतरही काही काळ साधने वापरावी लागतात हे खरे आहे काय ?**

होय. कारण शुक्रपेशीवाहक शिरेचा जो भाग कापला असेल त्याच्या पुढील भागात काही शुक्रपेशी तरीही शिल्लक असतात. त्या सर्व वीर्यस्खलनाबरोबर बाहेर पडेपर्यंत गर्भधारणा होण्याची शक्यता असते. याला साधारण २ महिने लागतात. तोपर्यंत साधने वापरावीत अगर हस्तमैथुन करावे. संभोग पूर्णपणे वर्ज्य

करून चालणार नाही.

दोन महिन्यानंतर वीर्यतपासणी करून त्यात शुक्रपेशी नाहीत असा अहवाल मिळाल्यावर ऑपरेशन यशस्वी आहे असे समजावे.

**१६: ऑपरेशन अयशस्वी होण्याची शक्यता असते का ?**

अगदी क्वचित. १००० त १ यापेक्षाही कमी. माझ्या माहितीच्या एका इसमाने ऑपरेशन करून घेतल्यावर १ वर्षाने त्याच्या पत्नीस दिवस गेले. त्यावरोवर चिडून तो इसम जेथे ऑपरेशन केले, त्या डॉक्टरांचेकडे गेला. हा डॉक्टरांच्या इभ्रतीचा प्रश्न असल्याने त्यांनी दुसऱ्या लॅबोरेटरीत वीर्यतपासणी करवून ऑपरेशनमध्ये काही चूक नसल्याचे सिद्ध केले. अर्थात आपली पत्नी बदफैली आहे, हे त्या इसमाला कळून त्याला खरोखर वेड लागले.

याउलट दुसऱ्या एका डॉक्टरांनी त्यांच्याकडे असाच एक इसम येताच खरा प्रकार ओळखला आणि 'ऑपरेशन चुकण्याची शक्यता असते, आपण पुन्हा फुकट करू,' असे समजावून पुन्हा लुटूपुटीचे ऑपरेशन केले आणि त्या इसमाच्या पत्नीस बोलावून तिला आपले उद्योग बंद करण्यास बजावले. स्वत:कडे कमीपणा घेऊनही त्यांनी एक संसार वाचवला.

**१७: समजा ऑपरेशननंतर काही कालावधीने पुन्हा संततिप्राप्तीची जरूरी भासली तर पुन्हा ऑपरेशन करून पूर्ववत करता येते का ?**

नाही. 'तोडणे सोपे असते पण जोडणे नाही,' हा नियम येथेही लागू पडतो. Vaso epidydimal anastomosis (व्हासो एपिडिडिमल ॲनॅस्टोमॉसीस) असले जबरदस्त नाव असलेले एक ऑपरेशन् करता येते, पण ते यशस्वी होण्याची शक्यता फार कमी. त्यामुळे एकदा ऑपरेशन झाले की ते वज्रलेप असेच समजणे बरे.

**१८: स्त्रियांचे ऑपरेशन करतात म्हणजे नक्की काय करतात ?**

स्त्रियांच्या गर्भाशयाच्या दोन बाजूंना फॅलोपिअन एगुला नावाच्या दोन नलिका असतात. फलकोशामध्ये (Orary) तयार होणारे बीज (Ovum) या नलिकावाटे गर्भाशयात येते. नलिकेमध्येच किंवा गर्भाशयात एका शुक्रपेशीशी (Sperm) याचा संबंध जुळून गर्भधारणा होते. ऑपरेशनच्यावेळी पोट उघडून नलिका या ना त्या उपायाने बंद केल्या जातात. बाळंतपणानंतर गर्भाशय पोटात बरेच वरपर्यंत असते. त्यामुळे यावेळी ऑपरेशन करणे सोपे जाते. शिवाय पुन्हा पुन्हा विश्रांति आणि हॉस्पिटलमध्ये राहणे टाळता येते. कित्येकदा वैद्यकीय कारणाकरता गर्भारपण कायमचे बंद करावे लागते. उदा.– फार पुढे गेलेला हृद्रोग किंवा मूत्रपिंड विकार, क्षय, कॅन्सर, मानसिक विकृती इ. अशावेळी बाळंतपणाची वाट न पाहता ऑपरेशन करता येते.

**१९: ऑपरेशनला वेळ किती लागतो ?**

सर्वसाधारण अर्धा तास. नेहमी हे ऑपरेशन करण्याची सवय असणाऱ्यांना

कमीच. पुण्यातहि एका हॉस्पिटलमधील लेडी डॉक्टर व मी मिळून हे ऑपरेशन आठ मिनिटांत संपवले होते.

**२०: भूल (anaesthasia) कोणत्या प्रकारची देतात?**

बहुधा spinal. म्हणजे पाठीच्या कण्यात इंजेक्शन करून पोटाचा खालचा भाग व पाय बधीर केले जातात. सार्वदेहिक संमोहन (general anaesthasia) किंवा स्थानिक संमोहन देऊनही हे ऑपरेशन करता येते.

**२१: रक्तस्राव किती होतो ?**

विशेष नाही. बाळंतपणात होतो त्याच्या कितीतरी पटीने कमी.

**२२: जखम किती मोठी करावी लागते ?**

$1\frac{1}{2}$ ते २". आमच्या हॉस्पिटलमधील काही लेडी डॉक्टर्स कमीत कमी लांब incision घेऊन ऑपरेशन करण्यात धन्यता मानीत. त्यांनी घेतलेल्या incision मधून माझी दोन बोटेही आत जात नसत. अर्थात जखम केवढी असली तरी ती भरायला वेळ सारखाच लागतो.

**२३: ऑपरेशनच्या वेळी फार त्रास होतो का ?**

नाही. काही बायका तर सर्जनशी किंवा अनॅस्थेटिस्टशी गप्पा मारत ऑपरेशन करून घेतात. मात्र काही हळव्या किंवा भित्र्या असतात, त्यांना झोपेचे इंजेक्शन द्यावे लागते.

**२४: ऑपरेशननंतर अंथरुणात पडून राहावे लागते का ?**

फक्त एक दोन दिवस. नंतर हिंडले फिरले तरी चालते. नेहमीच्या बाळंतपणाइतकी विश्रांती आणि पथ्येसुद्धा केली नाहीत तरी चालतात. आता अनुषंगानेच आले म्हणून सांगतो की बाळंतपणाचं आपण विनाकारण स्तोम माजवून ठेवले आहे. प्यूरपेरियल सेप्सिस (प्रसूतीनंतर होणारी जंतुबाधा) टाळता येईल, ही खबरदारी घेऊन बाळंतपण झाले आहे. तर ३–३ महिने विश्रांती आणि शेकशेगड्या, लांब बाह्यांची पोलकी, डोक्यावरून पदर, पायात सारख्या चपला, अंगाला लावणी, तूपभाताचा खुराक, डिंकाचे लाडू, हळिवाचे लाडू, काजळ, अंधारीकोंदट वास येणारी खोली या कशाचीही गरज नसते. आम्हांला सर्जरी शिकवणाऱ्या बाई त्यांच्या पहिल्या बाळंतपणानंतर ९ व्या दिवशीच स्वत: गाडी चालवत तास घ्यायला आल्या होत्या आणि त्या दिवशी दुपारच्या ऑपरेशन करीत होत्या.

**२५: टाके कितव्या दिवशी काढतात ?**

सातव्या किंवा आठव्या दिवशी.

**२६: टाके काढताना त्रास होतो का ?**

नाही.

**२७: टाके काढल्यावर जखमेचा व्रण विद्रूप दिसतो का ?**

अगदी पुसट व्रण दिसतो. sub cuticular stiches नावाचा एक प्रकार आहे.

तसे टाके घेतले तर व्रण अजीबात दिसत नाही.

**२८: ऑपरेशननंतर पाळी थांबते का ?**

नाही.

**२९: पाळीच्या वेळी त्रास होतो का ?**

क्वचित काही स्त्रियांना, विशेषतः ऑपरेशन करून मुले बंद करण्यात आपण काही अपराध केला आहे, अशी समजूत ज्याच्या मनाला डाचत असते, त्यांना असा भास होतो. यात अर्थात मानसिक भाग जास्त असतो. काही दिवसांनी हा त्रास नाहीसा होतो.

**३०: ऑपरेशननंतर लैंगिक अनुभवात काय फरक पडतो ?**

वर वर्णन केल्याप्रमाणे मानसिक टोचणी नसेल, तर उलट गर्भधारणेची भीती नसल्यामुळे लैंगिक संबंध जास्त सुखाचे होतात.

**३१: ऑपरेशननंतर साधने वापरावी लागतात का ?**

नाही.

**३३: ऑपरेशन अयशस्वी होण्याची शक्यता असते का ?**

जवळजवळ नाहीच.

**३३: नंतर आवश्यक वाटल्यास पुन्हा संतती होईल असे ऑपरेशन करता येते का ?**

पुरुषांचे प्रमाणेच हेही जवळजवळ अशक्य असते.

**३४: ऑपरेशन न करता संततिनियोजन करण्याचे पोटात घेण्याचे औषध किंवा इंजेक्शन असते काय ?**

या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत, पण अद्याप असा उपाय सापडलेला नाही.

**३५: ईश्वराने दिलेले प्रजोत्पादनाचे मार्ग नष्ट करण्याचा मानवाला काय अधिकार आहे ?**

ईश्वराने दिलेल्या सर्वच गोष्टी मानवाने कुठे कायम राखल्या आहेत ? मोटार, सिनेमा किंवा कोकाकोला या ईश्वराने न निर्माण केलेल्या गोष्टींचा आपण फायदा घेतोच ना ? शिवाय रोगी, अर्धपोटी आणि अशिक्षित दहा मुले होण्यापेक्षा माता-पित्यांना ललामभूत होणारी दोनच मुले होऊ देणे ईश्वराला जास्त आवडेल.

• • •

Statement about ownership and other particulars about
**MANOOS Fortnightly** as required under
Rule 8 of the Registration & Newspapers (central) Rules, 1956

**FORM IV**

(See Rule 8)

1. Place of publication..................POONA

2. Periodicity of its publication.......Fortnightly

3. Printer's Name.........................S. G. Mazgaokar
   Nationality.......................Indian
   Address..........................419 Narayan Peth, Poona 2

4. Publisher's Name..................
   Nationality........................ } as above
   Address..............................

5. Editor's Name......................
   Nationaity-........................ } as above
   Address..............................

6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. } Rajhans Prakashan, 419 Narayan Peth, Poona 2
   (1) S. G. Mazgaokar
   (2) B. M. Purandare

I, **S. G. Mazgaokar**, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date **1-3-1965**

Signature of Publisher
**S. G. Mazgaokar**

# कांगारूंचा काळ लॅन्स गिब्स

—दि. श्री. कराडकर

'वेस्ट-इंडीज 'च्या दौऱ्यावर निघालेल्या ऑस्ट्रेलियन संघाला इशारा द्यावासा वाटतो—'जागे राहा, गिब्स अजून फॉर्मात आहे !' कारण ज्या ज्या वेळी ऑस्ट्रेलिया संघाचा गेल्या पाच–सहा वर्षांत पराभव झाला, त्या त्या प्रत्येक वेळी त्यांच्या पराभवाचा प्रमुख शिल्पकार एखादा ' ऑफ् स्पिन ' गोलंदाज ठरलेला आहे. मागे इंग्लंडच्या जिम् लेकरने ऑस्ट्रेलिया संघाचे बलाढ्य १९ गडी अवघ्या एका सामन्यात बाद केले, ते केवळ त्याच्या ' ऑफ्-स्पिन ' गोलंदाजीच्या करामतीवर ! कानपूरच्या ' विकेट 'वर जसू पटेल ऑस्ट्रेलियाचे एका पाठोपाठ एक असे ९ नाणावलेले फलंदाज तंबूत पाठवितो, हे केवळ त्याच्या ' ऑफ्–स्पिन ' गोलंदाजीमुळे घडून आलेल्या जादूमुळे ! ' ऑफ्–स्पिन 'च्या ' जंतर–मंतर 'ला ऑस्ट्रेलियाचे फलंदाज हे असे घाबरतात. एखाद्या पत्त्याच्या बंगल्यासारखा सगळा संघ कोसळून पडतो. म्हणूनच ' वेस्ट–इंडीज 'च्या दौऱ्यावर त्यांचा कोणी कर्दनकाळ ठरलाच तर तो 'ऑफ् स्पिनर' लॅन्से गिब्सच ठरेल; कारण तीस वर्षांच्या ह्या गिब्सने आतापर्यंत भल्या भल्यांची भंबेरी उडविली आहे. ' सामना जिंकून देणारा ' वेस्ट–इंडीज 'चा हुकमी गोलंदाज ' असा त्याचा लौकिक आहे, असा त्याचा रुबाब आहे.

२९ सप्टेंबर १९३४ रोजी गिब्स् जन्मला. म्हणजे आता त्याने वयाची तिशी ओलांडली आहे. असं म्हणतात की तिशीनंतर ' ऑफ्-स्पिन ' गोलंदाजाची विकेट पडते ! आणि हे ' वेस्ट–इंडीज 'च्या काही गोलंदाजांना लागूही पडतं, पण गिब्स् ह्याला अपवाद वाटतो, कारण दिवसेंदिवस गिब्सची गोलंदाजी सुधारत चालली आहे. म्हणूनच ह्या उंच, शेलाटचा अंगकाठीच्या ' चिवट ' गोलंदाजाकडे ' वेस्ट-इंडीज ' संघ आणखी खूप वर्षे आशेने पाहू शकेल. चांगल्या टप्प्यांची गोलंदाजी सतत टाकण्याचा त्याला सराव आहे व आजपर्यंत नाणावलेल्या प्रत्येक गोलंदाजाने यश मिळविण्यासाठी ' उन्हातान्हात घाम गाळून रक्त आटविण्याची ' जी तपश्चर्या केलेली आहे तिचीही ' जान–पहचान ' ह्या ' उस्ताद ' गोलंदाजाला झाली आहे !

१९५४ साली लेन हटनच्या ' एम्. सी. सी. ' संघाविरुद्ध स्वतःच्या ब्रिटिश–गियाना संघातर्फे खेळताना लॅन्सेने एका डावात ४१ षट्के टाकली. ह्याच डावात विली वॅटसन व टॉन ग्रॉव्हेनी यांनी ४०२ धावांची विक्रमशील भागीदारी केली होती. इंग्लिश फलंदाजांची रग जिरविण्याची त्याची इच्छा त्याला त्या वेळी पुरी करता आली नाही, पण थोड्याच दिवसांत वेस्ट-इंडीजच्या दौऱ्यावर आलेल्या पाकिस्तानी संघाविरुद्ध कसोटी सामन्यांत त्याला प्रथमच खेळायला मिळाले. त्या वेळी



गिब्स् ओनील : डोके वापरून टाकलेले चेंडू

कसोटी सामन्यातील गोलंदाजीत सरासरीत तो सर्वप्रथम आला. ही १९५७-५८ ची गोष्ट. पुढल्या हिवाळ्यात भारत व पाकिस्तानच्या दौऱ्यातली त्याने उत्कृष्ट चेंडू फेक केली. तो उल्हसित वृत्तीने वावरत होता.

पण त्याच्या ह्या उत्साहाला १९५९-६० च्या हंगामात लगाम घातला गेला. ह्या हंगामात एम्. सी. सी. चा संघ ' वेस्ट–इंडीज 'च्या दौऱ्यावर आला असताना वेस्ट इंडीज निवडसमितीने लॅन्सेकडे ' दुर्लक्ष ' केले. सुरवातीच्या कुठल्याच कसोटी सामन्यात त्याला घेण्यात आले नाही. निवड–समितीची विक्षिप्त वृत्ती हेच एक कारण ह्यासंबंधी असू शकेल. परंतु ' जॉर्जटाऊन ' येथे खेळल्या जाणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यात गिब्सला घेण्याचे निवड–समितीने निश्चित केले आणि नेमके त्याच्यावर दुर्दैव ओढले ! त्या कसोटी सामन्यापूर्वी ' ब्रिटिश–गियाना ' तर्फे गिब्स खेळत होता. त्याची गोलंदाजी अचूक पडत होती, पण एकही ' विकेट ' त्याला

मिळत नव्हती. तरीही तो नेटाने गोलंदाजी करीत होता. येणाऱ्या चौथ्या कसोटी सामन्यात आपल्याला गोलंदाजी करायची आहे, त्याचं भानही न राहून तो इतक्या त्वेषाने गोलंदाजी करू लागला की त्या धडपडीत त्याचे ' स्पिनिंग ' बोट नेमके दुखावले ! आणि ह्याचा परिणाम असा झाला की त्याला चौथ्या कसोटी सामन्यातून नाव मागे घ्यावे लागले. एवंच, त्या हंगामात तो एम्. सी. सी. संघाविरुद्ध एकही कसोटी सामन्यात खेळू शकला नाही. पुढील वर्षी ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यासाठी त्याची निवड करण्यात आली.

त्या सुप्रसिद्ध **बरोबरीत सुटलेल्या** ' टाय् ' सामन्यात गिब्स् खेळू शकला नाही. दुसऱ्या कसोटी सामन्यातही—जो ऑस्ट्रेलियाने सात विकेट्सने जिंकला—तो खेळला नाही. दोन्ही कसोटी सामन्यांत न खेळण्याचे कारण एकच—रामाधीन अजून ' फॉर्म ' मध्ये होता. परंतु इतर सामन्यांत खेळून गिब्सने ते सामने गाजवले. त्याचा हा पराक्रम वॉरेल बघत होता. त्याच्या क्षेत्ररक्षणावरही तो खूष होता. आपल्या संघाच्या कसोटी सामन्यांतील क्षेत्ररक्षणावर वॉरेल नाराज होता. रामाधीनने तर दोन्ही कसोटी सामन्यांत गचाळ क्षेत्ररक्षण केले होते. रामाधीनच्या प्रकृतिअस्वास्थ्याची संधी साधून तिसऱ्या कसोटी सामन्यात वॉरेलने गिब्सला संधी दिली. वॉरेलचा हा निर्णय इतका योग्य व अचूक ठरला की रामाधीन तेव्हापासून कसोटी सामन्याबाहेरच फेकला गेला.

सिडने येथे तिसरा कसोटी सामना सुरू झाला. वेस्ट-इंडीज संघाने पहिल्या डावात ३३९ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाने दमदार सुरवात करून ६ गडी बाद झाले, तेव्हा संघाच्या २०० धावा झाल्या. नवीन चेंडू घेण्याचा वॉरेल विचार करू लागला, पण जुन्या चेंडूने गोलंदाजी करीत असलेल्या गिब्सने इकडे चमत्कार करून दाखविला ! त्याने अवघ्या चार चेंडूत मकाय, मार्टिन आणि ग्राऊटला तंबूत परत पाठविले ! ! पाहता, पाहता ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव २०२ धावांत गुंडाळला गेला. दुसऱ्या डावातही गिब्सने पराक्रम करून वेस्ट-इंडीज संघाला कसोटी सामन्यात विजयश्री मिळवून दिली. पाचव्या दिवशी सकाळी अवघ्या दोन धावा देऊन त्याने ऑस्ट्रेलियाचे ओनील, मकायसहित चार बळी घेतले. केवळ २७ चेंडू टाकून.

## ६२ वर्षांतील पहिली त्रिबळीमाला

गिब्सच्या ह्या पराक्रमाची तुलना ऑस्ट्रेलियातील वृत्तपत्रे लेकरशी करू लागले. गिब्स मोहरून गेला, पण वृत्तपत्रीय प्रशंसेने तो शेफारून गेला नाही. उलट प्रशंसेत बिलकुल अतिशयोक्ती नाही, हे ॲडीलेड येथे झालेल्या चौथ्या कसोटी सामन्यात ' हाय्ट्रिक ' घेऊन त्याने सिद्ध करून दाखविले. ह्या ' हाय्ट्रिक 'चे बळी होते मकाय, ग्राऊट आणि मिशन ! मकाय पायचीत होताच पुढल्या चेंडूवर ग्राऊटने सोबर्सच्या हाती झेल दिला. हजारो प्रेक्षक पाहात होते आता काय होणार ? मिशनने पुढचा चेंडू खेळण्याकरता बॅट उचलली. मागे वळून पाहतो तो त्रिफळा उडालेला. ६२

वर्षांत ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी सामन्यातील ही पहिली त्रिबळीमाला !

'संघाचा मातब्बर स्पिन–गोलंदाज' असा लौकिक संपादन करून तो घरी परतला. घरी आलेल्या भारतीय संघाचे त्याने चांगले 'स्वागत' केले ! लेकरच्या परंपरेची तो जाणकारांना आठवण करून देऊ लागला. 'ब्रिजटाऊन' येथील भारता-विरुद्धच्या तिसऱ्या कसोटी सामन्यात त्याची गोलंदाजी केवळ 'विस्मयकारक' होती– १४ षटके, १२ निर्धाव, ६ धावा, ७ बळी !! पाच कसोटी सामने मिळून त्याने २४ बळी घेतले.

पूर्वी ज्या मँचेस्टरच्या मैदानावर जिम लेकरने ऑस्ट्रेलियाचा धुव्वा उडविला, त्याच मँचेस्टरच्या मैदानावर ह्या 'लेकर छाप' इंग्लंडच्या संघाला पाणी पाजले. जून १९६३ ला इंग्लंडविरुद्ध झालेल्या पहिल्याच कसोटी सामन्यात त्याने पहिल्या डावात ५९ धावांत ५ गडी व दुसऱ्या डावात ९८ धावांत ६ गडी बाद केले. म्हणजे एकूण ११ गडी बाद केले. त्यानंतर झालेल्या चार कसोटी सामन्यांतही त्याने उत्कृष्ट गोलंदाजी करून चारही सामन्यांत मिळून एकूण १५ गडी बाद केले.

आतापर्यंत गिब्स २१ कसोटी सामन्यांत खेळला असून त्याने ९४ 'विकेटस्' घेतल्या आहेत. त्याचा हा लौकिक 'वडचांच्या' लौकिकाला साजेसा आहे.

गिब्स आता पूर्णतया धंदेवाईक खेळाडू बनला आहे. गेली दोन वर्षे तो 'नॉर्दर्न लीग' कडून खेळतो. 'वॉरेल' वर त्याची फार भक्ती आहे. एके ठिकाणी तो सहकाऱ्यांबद्दल लिहितो, "माझ्या गोलंदाजीच्या वेळी 'शॉर्टलेग' कडे जे क्षेत्ररक्षण करीत असतात, त्यांची मला फार मदत होते. कॉनरड (हन्ट), गॅरी (सोबर्स्) आणि जो (सोलोमन) त्यांनी काही वेळा माझ्यासाठी 'विस्मयकारक' झेल पकडले आहेत. गॅरी तर भलताच धीट आहे. तो फलंदाजाच्या खूप जवळ उभा राहतो व त्याची हालचाल फार जलद असते. फार कमी बोलणार, पण स्वतःच्या व्यक्तिमत्त्वा-मुळे तो सगळयांना हवाहवा वाटतो." हाच गॅरी आता वॉरेलची जागा घेत आहे.

गिब्सबद्दल कॉनरड हंट लिहितो, "लॅन्से नेहमी क्रिकेटबद्दल बोलत असतो आणि विचार करीत असतो. त्याला सगळया ढंगाचे 'म्युझिक' आवडते. नृत्यातही तो रमतो- बहुसंख्य 'वेस्ट-इंडियन' लोकांप्रमाणे. तो अंधश्रद्धा बाळगून असावा, असं मला वाटत नाही. १०० टक्के संघ-भावनेने तो खेळत असतो !"

क्रिकेटजगतात वेस्ट-इंडीजचा जॉर्ज हेडले 'काळा ब्रॅडमन' म्हणून ओळखला जाई. त्याने इंग्लंड व ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळताना फलंदजीत केलेले विक्रम पाहून कोणालाही त्याला 'काळा ब्रॅडमन' का म्हणत हे समजून येईल. आज गिब्सनेही गोलंदाजीत अनेक विक्रम केले आहेत. त्याबद्दल त्याला 'काळा लेकर' अशी किताबत द्यायला काहीच हरकत नाही.

ऑस्ट्रेलियाचा संघ आता वेस्ट-इंडीजच्या दौऱ्यावर निघाला आहे, त्यांना इशारा एवढाच, 'जागे राहा, अजून गिब्स फॉर्मात आहे !'

१ मार्च १९६५

# नांदेडकरांचा वसा आणि अध्यक्षांचा ठसा !

प्रतिवर्षी मराठी नाट्य-परिषदेची वार्षिक संमेलने भरत आली आहेत. आपापल्या परीने, वैशिष्ट्यांनी ती गाजतही आली आहेत. पण गेल्या महिन्यात नांदेड येथे भरलेले ४७ वे नाट्यसंमेलन मात्र खऱ्याखुऱ्या अर्थाने गाजले, स्मरणीय ठरले. आजवर गाजलेली संमेलने, त्या ३।४ दिवसांपुरती गाजत असत, फार तर ज्या गावी ते होत असे तिथल्या परिसरातच त्याचे नाव होत असे, पण यंदाच्या संमेलनाला सार्वत्रिक प्रसिद्धी मिळाली. नाट्यपरिषद नावाची जबाबदार संस्था कार्य करीत आहे याची प्रकर्षाने जाणीव झाली, म्हणूनच संमेलन खऱ्याखुऱ्या अर्थाने गाजले आणि याचे एकमेव कारण म्हणजे यंदाच्या संमेलनाचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे होते हेच. त्यांच्यासारख्या अष्टपैलू, चतुरस्र अध्यक्षाची निवड झाल्या दिवसापासूनच नाट्यरसिकांचे लक्ष संमेलनाने वेधून घेतले होते. वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होणाऱ्या तत्संबंधी लहानसहान बातम्याही लोक अत्यंत उत्सुकतेने वाचीत होते. एकंदरीत संमेलनापूर्वीच सारे वातावरण विलक्षण उत्साहाने भारून उठले होते. साहजिकच संमेलनाच्या तीन दिवसांत उत्साहाचे खेळकर वातावरण असल्यास नवल ते काय ? मुख्य म्हणजे मराठी नाट्यपरिषदेचे नाव सर्वांच्या डोळ्यांत भरले. नाट्य व्यावसायिकांना, रसिकांना, आणि अन्य संबधितांना संस्थेबद्दल अधिक आपुलकी, जवळीक निर्माण झाली आणि म्हणून आता पुढे काही कार्य होईल अशी खात्री निर्माण होऊ लागली आहे. परिषदेच्या दृष्टीने ही गोष्ट महत्त्वाची नाही का ? आजवरील संमेलनातून नाट्यव्यावसायिकांची उपस्थिती फारच अल्पप्रमाणात असे, पण यंदा नाट्यव्यावसायिक बहुसंख्येने उपस्थित राहिले, प्रत्येक कार्यक्रमाला अत्यंत उत्साहाने आत्मीयतेने हजर राहिले. प्रसंगी आमच्यासाठी एखादी गोष्ट ठरावरूपाने पुढे येऊ द्या, म्हणून त्यांनी आग्रह धरला. साऱ्याच गोष्टींतून नाट्यव्यावसायिकांनी उत्साहाने भाग घेतला, म्हणून कार्यक्रमाला एक प्रकारचा वेगळाच रंग आला.

आजवरील कार्यकारिणीत एखादाच व्यावसायिकांचा प्रतिनिधी असे, पण यंदा ३।४ व्यावसायिक कार्यकारिणीत निवडले गेले आहेत. ही गोष्ट महत्त्वाची नाही का ? याचाच अर्थ यापुढे नटमंडळी आग्रहाने संमेलनातून येणार, त्यांचे प्रश्न मांडणार, परिषदेला त्यांच्यासाठी खास म्हणून काही करायला लावणार !

ही महत्त्वाची गोष्ट यंदाचेच वर्षीच का साधून आली याचा विचार केला तर या श्रेयाचे वाटेकरी म्हणून पु. ल. देशपांडे यांचेच नाव घ्यावे लागेल. केवळ नाट्यप्रेमी रसिक प्रेक्षकांनाच त्यांचे आकर्षण नाही तर व्यावसायिक नटमंडळींनाही पु. ल. जवळचे वाटतात, आपले वाटतात आणि म्हणूनच या आपलेपणानेच ही नट-मंडळी मुद्दाम संमेलनाला हजर राहिली. हा आपलेपणा वाढविण्याचे कामही पु. लं. नी फारच चांगल्या तऱ्हने केले. उद्‌घाटन-समारंभातील भाषणातच त्यांनी सांगन टाकले की ' मी एक व्यवसायी नट आहे. ' साहजिकच अन्य व्यावसायिकांना अध्यक्ष हे आपल्यातील एक आहेत ही जाणीव प्रकर्षाने झाली. अर्थात केवळ व्याव-सायिक नटांनाच पु. ल. बद्दल आपलेपणा वाटला नाही तर जमलेला प्रत्येकजण पु. लं. च्या व्यक्तिमत्त्वाने असा काही भारावून गेला की त्यापैकी कोणालाही त्यांचा विसर पडणे अगदी अशक्य ! पु. लं. चे व्यक्तिमत्त्व बहुगुणी तर आहेच, पण त्या सर्वांपेक्षा त्यांच्याजवळ असलेल्या एका मोठ्या गुणाची जाणीव आधिक्याने झाली आणि तो म्हणजे सर्वांना आपलेसे करणारा त्यांचा स्वभाव ! या तीन-चार दिव-सांत भोजन विभागातील आचाऱ्यापासून ते थेट उद्‌घाटकापर्यंत सर्वांनाच पु. ल. नी मोहिनी घातली. प्रत्येकाच्या स्वभावातील, वृत्तीतील चांगली गोष्ट तेवढीच हेरून नेमके त्याच आधारे त्या व्यक्तीला त्यांनी जवळ केले आणि म्हणूनच पु. ल. सर्वांनाच हवेहवेसे वाटले. आजकाल चांगले बोलणाऱ्यांची फार उणीव आहे. कोणीही दुसऱ्यावर टीकाच करण्यात धन्यता मानतो, पण पु. लं. नी या सर्वसाधारण वृत्तीला फाटा दिला.

नांदेडच्या नाट्यसंमेलनाचा समारोप झाला. सूप वाजले आणि श्री. पु. ल. देशपांडे संमेलन प्रतिनिधींच्या भोजनगृहातील थेट पाकशाळेत गेले. संमेलनाचे अध्यक्ष अगदी अचानक स्वयंपाकगृहात आलेले पाहून तेथील मंडळींना मोठे नवल आणि कुतूहल वाटले. पु. ल. देशपांड्यांनी तेथील आचाऱ्यापाशी येऊन त्याची पाठ थोपटीत म्हटले,

" खरोखर तुम्ही गेले तीन दिवस आम्हा सर्व पाहुण्यांचा अतिशय उत्तम पाहुण-चार केलात ! अगदी व्याही-भोजनासारखी तुम्ही प्रत्येक पंगत सजवलीत. आम्ही सर्वजण तुमच्या पाककौशल्यावर आणि व्यवस्थेवर मनापासून खूष झालो ! "

त्या आचाऱ्याच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या. त्याने अक्षरशः जमिनीवर डोकं टेकवून पु. लं. ना नमस्कार केला अन् नंतर एका प्रतिनिधीजवळ तो म्हणाला,

" आजवर अनेक लग्नंमुंजी मी शिजवल्या. किती तरी परिषदा अन् गॅदरिंगं जेवू घातली, पण मला असं आवर्जून भेटून, ' चांगलं केलेत हं ! आम्हांला सारं आवडलं ', म्हणून मुद्दाम भेटून सांगणारे मला कोणीच भेटले नाहीत. देशपांडेसाहेब पहिलेच ! एवढा मोठा माणूस मला स्वयंपाघरात येऊन भेटला..."

पु. लं. नी हे जे केले ते आजवर कुणालाही करावेसे वाटले नाही. मुख्य म्हणजे



पु. ल. देशपांडे

सुचलेही नाही !!

समारोपाचे भाषण करताना त्यांनी नांदेडच्या संगीत विद्यालयाबद्दल काढलेले उद्‌गार, भोजन विभागात काम करणाऱ्या कष्टाळू काटक मुलीं-बद्दल काढलेले गौरवोद्‌गार असेच स्मरणीय ठरले. ते ऐकून डोळे ओलवल्याखेरीज राहिलेला मनुष्य विरळा ! भावनेनी ओले झालेले, भाव-नांना एकदम हात घालणारे शब्द अध्यक्षांनी व्यावसायिकांना जवळ केले, हौशी लोकांची पाठ थोपटली, जुन्या नटांना मानवंदना दिली, नव्यांना कौतुकाचें शब्द ऐकविले, रसिक प्रेक्षकांचा तर ते दहा-दहा वेळा उल्लेख करीत होते. प्रेक्षकांना उद्देशून ते म्हणत होते, "तुम्ही इतक्या संख्येनें इथे आलात. मला धन्य झाले. तुमच्यासारख्या प्रक्षकांना पाहून मला आनंदाचे भरते येते. मी उभा आहे तो तुमच्यासाठीच !" झालं. या चार-सहा वाक्यांतच आलेला प्रत्येक प्रेक्षक कृतकृत्य होत्साता परत फिरला. तो आल्याची दखल अध्य-क्षांनी घेतली होती, यातच त्याला समाधान होते. आणि असे समाधान द्यायला तर पु. ल. मोठ्या उत्साहाने उभे होते.

याबरोबर आमंत्रक नांदेडकरांचे श्रम, त्यांचा उत्साह या गोष्टीही संमेलन यशस्वी करण्यास कारण ठरल्या आहेत, हे विसरता कसे यंईल ? हजारो रुपये खर्च करून त्यांनी संमेलन यशस्वी करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांचा प्रत्येक कार्यकर्ता अविश्रान्त राबत होता. कार्यक्रमात बिघाड होऊच द्यायचा नाही असा मुळी त्यांनी पणच केला असावा. कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीत वातावरण तंग होऊ लागले होते, पण ते सांभाळले गेले केवळ पु. लं. च्या उपस्थितीमुळे ! अन्य कोणालाही मिटविता न आला असता असा वाद पु. लं. नी चुटकीसरशी मिटविला. कार्यकारी मंडळात निवडावयाच्या नावांत बरीच नावे आली होती. काही नावे वगळणे क्रमप्राप्तच होते. पु. लं. नी प्रारंभी एक नाव सुचविले होते, पण नावे जास्त दिसताच, त्यांनी आपणहून त्या व्यक्तीचे नाव मागे घेतले ! वाद मिट-विण्याचा धडा स्वतःच घालून दिला. वास्तविक त्या गृहस्थांना पु. लं. नी पूर्वी 'तुला कार्यकारीत घेतो,' असे आश्वासन दिले होते. विविध गोष्टींची योजनाही उत्तम होती. भाषणे, परिसंवाद यांसाठी विषय सुंदर निवडले होते आणि वक्ते तर एकसे एक सवाई होते. साहजिकच कार्यक्रमाची रंगत अधिक वाढली. या गोष्टींचे विस्मरण होणे सर्वथैव अशक्य !

एकदोन गोष्टी खटकल्याही; हे नाकारून चालणार नाही. अशा गोष्टीत प्रथमत: कार्यकर्त्यांमध्ये असलेल्या शिस्त आणि एकसूत्रीपणाचा अभाव याचा उल्लेख केला पाहिजे. त्यामुळे मेहनत करूनही, पैसे खर्च करूनही व्यवस्थेचे चीज झाले असे वाटले नाही. केवळ भोजन व्यवस्था सोडली तर अन्यत्र ही गोष्ट फार जाणवली. निवासस्थान व्यवस्था, स्नानगृहे, शौचकूप गृहे यांची व्यवस्था फारच असमाधानकारक होती. याला कारण त्या प्रत्येकावर एक जबाबदार माणूस कायमचा हजर नव्हता. व्यवस्थेची वाटणी झालेली नव्हती. जे काही ४।६ कार्यकर्ते होते तेच निवासस्थानापासून स्टेशनवरील कार्यक्रमांकरता आणि स्टेशनवरून प्रतिनिधी आणण्याकरता धावत होते. साहजिकच गैरसोय झाली. पण ही गैरसोयही या ४।६ कार्यकर्त्यांचे श्रम पाहून विसरली जात होती.

कार्याध्यक्ष ग. ना. आंबेकर, प्रा. राम शेवाळकर, आर. डी. देशपांडे या लोकांनी विलक्षण श्रम घेतले.

विनयी कार्यकर्त्यांच्या श्रमावर प्रा. नरहर कुरुंदकर यांनी थोडेसे विरजण घातले. प्रा. कुरुंदकर तिकडील भागात अतिशय विद्वान प्राध्यापक म्हणून ओळखले जातात, पण त्यांच्या फटकळ; तुटक स्वभावाचा फटका बऱ्याच जणांना बसला, अनेक मने नाराज झाली. पण हे चालायचेच. विद्वान रागावला की फटकळ होतोच.

परंतु एकंदरीत संमेलनात. उणीवा अगदी थोड्या. अगत्य, प्रेम आपुलकी आणि सद्‌भावना याचा 'पुल' अधिक होता. काही कमी पडलेच तर पु. लं. चे शब्द होतेच!

## संमेलनातील फु (पु!) लबाज्या

### धूळ आणि पायधूळ

आचार्य प्र. के. अत्रे नांदेडला स्वत:ची गाडी स्वत: चालवीत आले. प्रवास मोठा. रस्ते अत्यंत खराब. धूळ अपरंपार. आचार्य थेट संमेलनाच्या मंडपातच परस्पर दाखल झाले. धुळीने ते नखशिखांत माखले होते. प्रवेश करता करताच ते गरजले,

"काय भयंकर खराब रस्ते हे! धूळ खात खात आलो..."

त्यावर पु. ल. देशपांडे आचार्य अत्र्यांचे स्वागत करीत करीत चटकन् म्हणाले,

"जन्मभर दुसऱ्याला धूळ चारणाऱ्याने स्वत: थोडीशी खाल्ली तर काय हरकत आहे?" आचार्य हसले. घबघब्यासारखे!

नंतर एका भाषणात पु. लं नी मराठवाड्यातील धुळीचा सहज उल्लेख केला. ते म्हणाले,

"इथल्या धुळीत श्री एकनाथांची पायधूळ आहे!"

## आयत्या वेळी होते ती—फजिती

संमेलनातील एका परिसंवादात श्रीमती विजया खोटे म्हणाल्या,

" ...नाटकात शब्दांना दुय्यम स्थान असतं !..."

आपल्या भाषणात पु. ल. म्हणाले,

" नाटकात काहीही दुय्यम नसतं. प्रत्येक हालचाल, प्रत्येक शब्द आणि रंगभूमी-वरचा प्रत्येक क्षण अत्यंत महत्त्वाचाच असतो,——असायलाच हवाच. त्याच्यामागे योजनाबद्धता असते. तालमी असतात. 'आयत्या वेळी' काहीही घडत नसतं."

अन् नंतर पु. ल. म्हणाले,

" नाटकात आयत्या वेळी फक्त एकच गोष्ट होऊ शकते. ती म्हणजे 'फजिती'!"

## सूत्रधाराला सुताचा हार

नाट्यसंमेलनाच्या समारोपापूर्वी मराठवाड्यातील एक आदरणीय प्रकाण्ड पण्डित महामहोध्याय कस्तुरे शास्त्री यांनी अध्यक्ष पु. ल. देशपांडे यांना सुताचा हार घातला. त्याचा उल्लेख करताना पु. ल. म्हणाले,

" हा सुताचा हार देऊन महामहोपाध्यायांनी हेच आम्हा सर्वांना सांगितलं आहे की, हे संमेलन आता 'सूत्रबद्ध' झाले !"

## मामाच्या वाड्याला दार नकोच !

नाट्यसंमेलनात प्रख्यात अभिनेते श्री. मामा पेंडसे म्हणाले,

"या संमेलनाने आम्हा व्यावसायिक नटांना नाट्यपरिषदेचे दार मोकळे झाले !"

त्यावर पु. ल. म्हणाले,

" नाट्यपरिषदेला दारच नाही ! फक्त भव्य कमान आहे. इथं सर्वांना प्रवेश आहे. मी इथं दार होऊ देणार नाही. कारण दार आलं की ते बंद करण्याची भावना येते. कमान एवढ्यासाठीच आहे की, आत येणाऱ्याने मान वाकवून आत यावे !"

## देवाची पालखी

नाट्यसंमेलनात प्रारंभी झालेला नटराजपूजनाचा कार्यक्रम अविस्मरणीय होता. दोन हजार प्रेक्षक एकाग्रचित्ताने आणि नजरेने हा सोहाळा पाहात होते. श्री. पु. ल. देशपांडे आणि सौ. सुनीता देशपांडे यांनी पूजा केली. पूजा संपल्यावर पु. ल. देशपांडे यांनी नटराजाला साष्टांग दंडवत घातले. समारोपाच्या भाषणात पु. ल. म्हणाले,

" जोडप्याने आम्ही केलेली आयुष्यातील ही पहिलीच पूजा आहे. माझ्या घरी देव्हारा नाही. मुंबईत देवालासुद्धा जागा नाही ! म्हणून मी देवाला माझ्या अंत:करणात ठेवले आहे. मी जेथे जाईन तेथे मला त्याला नेता येते !"

## नगरपालिकांना नवा दिलासा.

नांदेड नगरपालिकेने केलेल्या हार्दिक सत्काराला उत्तर देताना श्री. पु. ल. म्हणाले, "नगरपालिकेने जनतेसाठी स्वच्छ आणि सुंदर रस्ते करायचे असतात. रस्ता कसा आहे यापेक्षा रस्ता नागरिकांना कुठे नेतो याला महत्त्व आहे. गंगातीराकडे—गुरुद्वाराकडे–मंदिराकडे ! रस्ता म्हणजे केवळ दोन गटारांमधील मुलूख नव्हे ! !"

## पाणचटपणा आणि रसिकता

नांदेड नगरपालिकेने पूर्वी गोदावरी नदीचे पाणी शास्त्रीय तपासणीसाठी वेगवेगळ्या बाटल्यांत भरून मुंबईस पाठविले होते. त्यात गोदाप्रवाहातील वाहते पाणी होते, फिल्टर्ड पाणी होते आणि केवळ गाळलेले पाणीही होते. शास्त्रज्ञांनी निर्णय कळविला की सर्वच प्रकारचे पाणी शुद्ध आहे, दोषरहित आहे ! या गोष्टीला अनुलक्षून पु. ल. म्हणाले,

"गोदावरीचे पाणीच मुळात शुद्ध आहे. फिल्टर्ड आणि अन्‌फिल्टर्ड दोन्हीही शुद्धच ! नांदेडकरांच्यात उच्च दर्जाची रसिकता आली, त्याचे कारण ते पाणी पीत नाहीत ! ते तीर्थ पितात ! "

## टीकाकारांचे उसासे

हास्यविनोदाने रंगलेली एखादी नाट्यकृती पाहूनही कित्येक टीकाकार उसासे टाकत असतात, कण्हत असतात. ते स्वत: असा आनंद स्वनिर्मितीने दुसऱ्याला देऊ शकत नाहीतच, पण दुसऱ्याने दिलेला आनंदही खुल्या मनाने लुटू शकत नाहीत. अशा टीकाकारांना उद्देशून पु. लं. नी एक अर्धा शेर म्हटला,

'एक काबा न बन सका हमसे
तोड डाले हजार बुतखनी ! '

---

● किर्तनकार ही परंपरा जात चालली आहे. हे महान नट होते. बहुरूपी प्रयोग त्यांनीच खरे चालवत आणले होते. पु. ल. देशपांड्यांनी नव्हे !

● माझ्या मते जो पैठण विसरला तो मराठी पुरुषच नव्हे आणि जी पैठणी विसरली ती मराठी स्त्री नव्हे.

अध्यक्षीय भाषणातून

---

# राजकुमार यादे

## एक असूर आणि एक सूर

हिंदी चित्रपटांबाबत आमचा दृष्टिकोन अनुदार आहे. अशी टीका सतत आमचे काही वाचकमित्र पत्राने वा प्रत्यक्ष भेटीत करीत असतात. "संगम" सारख्या चित्रपटाला तुम्ही झोडता आणि कुठल्या तरी गल्लीतील थिएटरात आठवडाभरही न राहिलेल्या "चारुलता" सारख्या चित्रपटाची स्तुती करता. हा कुठला न्याय ? अशी वृत्तपत्रीय टीकाही झाली आहे. या चित्रपटांतील संगीत, नेपथ्य, छायाचित्रण हे आम्हाला कसं दिसत नाही अशी शंका या टीकाकार मित्रांना येते. तेव्हा एकदा हे स्पष्ट सांगून टाकलेले बरे की चित्रपट तयार कसा करतात ? त्याला भांडवल किती लागते ? नट, नटचा मिळवायला किती अडचणी येतात ? पब्लिकला का सांभाळून घ्यावे लागते, या सर्व गोष्टींचे ज्ञान आमच्यापाशी नाही.

चित्रपटांवर लिहिण्याची आमची योग्यता एवढीच माफक आहे की लहानपणापासून बरे-वाईट चित्रपट पाहण्याची सवय आहे...अगदी 'राजा हरिश्चंद्र' पासून...'राजकुमार' पर्यंत ! हे चित्रपट पाहून आल्यावर जसे मित्र तावातावाने एकमेकांत चर्चा करतात तशीच आम्हीही पूर्वी केलेली आहे. लायकी व दर्जा दोन्ही तितपतच. आमच्या समानधर्मी मित्रांशी या लेखनातून अशीच चर्चा या टीकेद्वारे आता जरा मोठ्याने आम्ही करतो. यामुळे मित्रांनी राग न धरता अगत्य असो द्यावे एवढीच विनंती.

### एक वरात

गेल्या महिन्यात बरेच चित्रपट पाहिले. सरवणा फिल्मस्चा 'राजकुमार' पाहिला. समजा रात्रीची वेळ आहे, तुम्ही 'स्वामी' किंवा 'अपूर्वाई' सारखे पुस्तक वाचण्यात रंगून गेलेले आहात. इतक्यात रस्त्यावरून एकदम बँडवर गाणे ऐकू येते— "मेरे मनकी गंगा..." ढोलाच्या प्रचंड आवाजात 'राधा' बोलू लागते. घरातले 'बाबा' लोक आणि 'बाया' लोक समस्त चाळकऱ्यांसह गॅलरीत धावतात. गॅसच्या बत्त्या, बँडवाले, सजलेली मोटार आणि मागून नटूनथटून चाललेल्या बायका आणि सर्वात शेवटी निरिच्छ वृत्तीने पावले टाकणारे पोक्त...हे दृश्य नेहमीचेच आहे,



**यामुळेच चित्रपट पाहवला तर पाहवतो.**

" होगा, होगा, होगा " हे होईपर्यंत चार भुईनळे पेटतात. वरात पुढे सरकली की रस्त्याच्या आसपासची दारेखिडक्या हळूहळू बंद होतात. मग " वरात परवाच्या वरातीपेक्षा बरी होती की नव्हती ", यावर माफक चर्चा घरात सुरू होते. तुम्ही हातातले पुस्तक एकतर मिटून गॅलरीत धावता किंवा ' वरातीत काय पाहायचंय् ! ' असा गंभीर विचार करून ती कटकट सहन करता.

राजकुमार ही अशीच एक वरात किंवा हिंदी सिनेशौकिनांसाठी निघालेली ' भिक्षावळ ' आहे. अगदी अक्षरशः ! चित्रपट सुरू होतो, बँडवाल्यांची पथकेच्या पथके, चित्रविचित्र पोशाख केलेली माणसे, उंट, हत्ती, घोडे, गणवेष घातलेले शिपाई, स्काऊटची पोरे आणि डिसिप्लिन स्कीमच्या मुळीबाळी, नंतर लोकनृत्ये करणाऱ्या काही ' उघडया ' बायका ' अशी सुमारे २–३ मैल लांब मिरवणूक पडद्यावर दिसते. यातच एका हत्तीच्या पाठीवर हत्तीचे पोर खिदळावे तसा शम्मी कपूर–" जानेवाले, ...हम है राजकुमार " हे गाणे अंगविक्षेप करून म्हणतो. गाणे चालू, मिरवणूक चालू. चांगली अर्धा तास मिरवणूक चालू असते. ज्यांना हृ अभूतपूर्व दृश्य पाहायला आवडेल त्यांना चित्रपट आवडेलच. मग ही मिरवणूक ' नागा ' लोकांच्या प्रदेशात पोचते. तिथे असते एक भिल्लांची राजकन्या. साधना ! अर्थात राजकुमाराचे व राजकन्येचे येथेच जमते.

## भयंकर शंकर

गोष्ट नेहमीचीच. सेनापतीचा राजकन्येवर डोळा, राजा कैदेत, राजकुमारचा पराक्रम आणि शेवटी लग्न ! राजाचे काम पृथ्वीराज कपूर आणि सेनापतीचे काम 'प्राण' करतो. शिवाय ओमप्रकाश आणि टुणटुण हसवण्यासाठी आहेत. अशक्य असेल त्यांनी हसू नये. या कथानकाच्या काठाकाठाने काय वाटेल ते घडत असते. साधना इतकी चांगली दिसते, गाणी इतकी गोड आहेत ( पहिले सोडून ! ) की साधनेचा चेहराच फक्त दिसेल, अशा बेताने पाय लांब करून मान मागे खुर्चीवर टाकून बसलात तर कंटाळा येणार नाही. समजा तीन तास वेळ नसला तर मध्येच केव्हाही थिएटरमध्ये शिरलात तरी चित्रपट समजायला वांधा येणार नाही. के. शंकर नावाच्या महान दिग्दर्शकाने हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे. आम्हांला तरी हा शंकर भयंकर हो ! तुमचे तुम्ही पाहा आणि ठरवा.


## आणि यादे ! –

दुसरा चित्रपट पाहिला तो सुनील दत्त यांचा 'यादे' ! हिंदी चित्रपटसृष्टीतील एक नवा प्रयोग अशी याची जाहिरात असल्यामुळे उत्सुकता वाढलेली होती. एखादे तंत्र श्रेष्ठ मानले की त्या अनुषंगाने जे दोष चित्रपटात शिरतात, ते सर्व या चित्रपटात आहेतच. परंतु असे असूनही चित्रपट कौतुकास्पद आहे.

'यत्र नार्यस्तु पूजन्ते' या मनुवचनाच्या हिंदी आणि इंग्रजी भाषांतरापासून चित्रपट सुरू होतो. कथा सौ. सुनील दत्तांची आहे. संवाद अख्तर उल् इमाम यांचे आहेत. गाणी आनंद बक्षी, संगीत वसंत देसाई, छायाचित्रण सुरतवाला एवढी माहिती शोधून काढण्यासाठी सुमारे शेसव्वाशे नावांच्या टायटल्स वाचाव्या लागतात. पडद्यावर सर्व नावे आणण्याचा हा अट्टाहास आता प्रेक्षकांना फारच त्रासदायक होऊ लागला आहे. बरं, या श्रेयनामावलीचे विष्णुसहस्रनाम झाल्यावर लगेच चित्रपट सुरू व्हावा, तर तसेही होईना. अनिलच्या घरातल्या सगळ्या खोल्यातून कॅमेरा फिरू लागतो. त्यात काय पाहायचे आहे याची काहीच मनाची तयारी करण्यास वेळ नसल्यामुळे, मोकळ्या खोल्या पाहताना कंटाळा आला. मग एकदा टेलिफोनची घंटा वाजू लागली. कुणी येईना तेव्हा कळलं की घर रिकामं आहे. कथा सुरू झाली होती ती कंटाळा रसाने !

अनिलची पत्नी प्रिया ही आपल्या दोन मुलांना, पवन आणि गीता यांना घेऊन घर सोडून गेलेली असते. कारण अनिल आपला वेळ कुणा शामा नावाच्या तरुणीच्या सहवासात काढू लागला होता म्हणून. अनिल घरी येतो. त्याला बायकोची चिठ्ठी मिळते. तो चिडतो, रागावतो, उद्विग्न होतो आणि बायकोच्या आणि मुलांच्या आठवणी त्याला अस्वस्थ करू लागतात.

या आठवणी म्हणजे हा चित्रपट. अर्थात या आठवणीच असल्यामुळे प्रत्यक्ष



**कौतुकास्पद कामगिरी**

पड्यावर सुनील दत्तखेरीज अन्य चेहरा दिसत नाही. आवाज ऐकू येतात, दृश्येच्या दृश्ये दिसतात, ती कधी कधी प्रतीकांतून, तर कधी चित्रांतून व शिल्पांतून. आठवणीचे हे स्वरूप उलगडण्याचा सुनीलदत्त यांचा हा प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहे, यांत शंका नाही. परंतु नाटयछटा ही ज्याप्रमाणे पान-दोन पानांच्या वर वाचकाला बांधून ठेवू शकत नाही, त्याप्रमाणे सतत--दोन अडीच तास याच तंत्राने ' कथा ' सांगणे या गोष्टीचा प्रेक्षकांना कंटाळा येतो. शिवाय नवीन तंत्र अशासाठी राबवायला हवे की त्यामुळे अभिव्यक्तीची एखादी नवीन दिशा वा कक्षा उपलब्ध झाली आहे! मग मनातील आंदोलने दाखविण्यासाठी जर हे तंत्र वापरावयाचे होते तर ' प्रिया प्रिया ' असा मोठ्याने विलाप करण्याचे चित्रण कशासाठी ? तंत्र पेलण्यासाठी. मग अनावश्यक आर्त स्वगतांचा पाऊस आणि आदळआपट ! म्हणजे दुःखाची किंवा मानसिक आंदोलनाची खोली चित्रित करण्यासाठी जे तंत्र सुलभ, त्याचा उपयोग केला आहे तो एक रूढ कथा सांगण्यासाठी, असा काहीसा प्रकार या चित्रपटात झाला आहे.

## सुनील दत्तचे यश

परंतु एकदा हे तंत्रामुळे निर्माण झालेले दोष मान्य केले तर सुनील दत्तांनी एकटयांनी अभिनयात बरेच काही दाखवले आहे. अनिलची प्रियाशी झालेली विवा-

हापूर्वीची पहिली ओळख, आंघोळीसाठी गेल्यावर कपड्यांसाठी नेहमी होणारा आरडाओरडा, झोपी न जाता जागत राहणाऱ्या मुलामुळे प्रियाला त्याच्या खोलीत येण्यास होणारा उशीर न झाल्याने त्याची झालेली उलघाल, दोघांचे पहिले भांडण हे सर्व प्रसंग सुनील दत्तनी अत्यंत समर्थपणाने दाखवले आहेत. विवाहामध्ये स्त्री-पुरुष शरीरसंबंधाला जे महत्त्व आहे, त्याची धीट उकल सुनील दत्तनी केल्याबद्दल तर त्यांचे अभिनंदनच केले पाहिजे. एकांतातील सर्व प्रसंग त्यांनी योग्य त्या मर्यादा ठेवून परंतु धीटपणे मांडले आहेत. हा धीटपणा अर्थात सेन्सॉरला पसंत पडला नसावा. वस्तुतः स्त्री-पुरुषसंबंधाचे हे शिक्षण देण्याची शाळेत व्यवस्था नाही— घरी सगळे...पापच ! अशा परिस्थितीत हा चित्रपट सर्वांना खुला ठेवला असता तर तेच आवश्यक होते ! परंतु असंख्य हिंदी चित्रपटांतील आचरट उत्तानता आपल्याकडील कुमार-कुमारांनी पाहिली तरी चालते. परंतु स्त्री-पुरुष संबंधाचे सूचित ज्ञान कुणी देऊ करील तर त्याला मात्र बंदी करावी ही सेन्सॉर बोर्डाची समजूत मोठी विलक्षण आहे. हा चित्रपट फक्त प्रौढांसाठी असण्याचीच आवश्यकता नव्हती. किंबहुना तो सर्वांसाठी असण्याचीच आवश्यकता होती. परंतु परदेशांत भारतातील दारिद्र्य दिसू नये म्हणून सत्यजित रे यांच्या चित्रपटांना बाहेर पाठवण्यास बंदी करावी म्हणणाऱ्या रसिक शासनाकडून अन्य अपेक्षा काय ठेवावी ?

चित्रपटात गाण्यांचा धुमाकूळ नाही. शेवटचे एकच गाणे संपूर्ण आहे व ते मधुर आहे. फक्त आता प्रिया घरात आली आहे, संसार सुरळीत चालू झाला आहे, हे गद्यात ओरडून सांगण्याची गरज नव्हती. सुखी आठवणींची पूर्वदृश्ये पडद्यावर सरकत असताना व चांगल्या गाण्याचे सूर हाताशी असताना असा खास हिंदी बालिशपणा अधूनमधून केल्यामुळे सुनील दत्तांचा हा प्रयत्न फारशी उंची गाठू शकलेला नाही. ते काहीही असले तरी हा चित्रपट सर्वांनी पाहावा व या प्रयत्नांचे चीज करावे असेच आम्हाला वाटते. चित्रपटात सुरवातीलाच या चित्रपटाचे वर्णन सुनील दत्तांनी, movie Monument ' असे केले आहे. चित्रपटसृष्टीत हे चित्र हा ' मैलाचा दगड नसला तरी हे ' बऱ्यापैकी शिल्प ' आहे यात शंका नाही.

याशिवाय आणखी दोन चित्रपट पाहावयास मिळाले. दोन्ही फ्रेंच चित्रपट. एक लोला आणि... परंतु यासंबंधी पुढील अंकातच बोलू.

—महेश

" तुम्ही या नाटकात माझ्याबरोबर नायिकेचे काम करावयास तयार व्हाल असं मला वाटलं नव्हतं. "

" प्रयोग " धर्मार्थ " होता म्हणून मी तयार झाले. "




"उद्या आपलं लग्न झाल्यावर तुम्ही मला या ऑफिसातच नोकरी करून द्याल ना ?"

"कमल, तू हे काय विचारतेस ? लग्नानंतर तुझी नोकरी मी गृहीतच धरून चाललो आहे."





## अेक आहे थोरल्या भाऊजींचा, दुसरा आहे माझा...

एक काळ असा होता कीं, कुटुंबातली माणसं एकत्र राहायची. चारचार, पांचपांच भाऊ अेकत्र नांदतांना ठिकठिकाणीं दिसायचे. त्यामुळें अडीअडचणीला अेकमेकांची खूप मदत व्हायची. एखादा भाऊ दुर्दैवानें दगावला तर त्याच्या बायकोचा भार कोणाला वाटत नसे. तितक्याच आपुलकीनें तिला सांभाळीत. मुलाबाळांचं शिक्षण, मुलींची लग्नं, सारं काहीं बिनबोभाट होत असे. त्यामुळें त्याकाळीं विम्याचं संरक्षण नसलं तरी चालण्यासारखं होतं. पण आतां सगळ्या गोष्टींची काळजी आपली आपल्यालाच घ्यावी लागणार. त्यासाठीं निश्चित आणि सोपा मार्ग म्हणजे आयुर्विमा. आजच तुमच्या विमा एजंटाला भेटा.

**आयुर्विम्याला** पर्याय नाहीं

Pratibha-659




मी आता महिन्यातून दोन वेळा आपल्या घरीच मुक्काम करणार आहे.

यापूर्वी आपली केवळ गाठभेटच होत असे. एखाद्या जवळपासच्या फिरत्या वाचनालयातून आपण मला घरी नेत होता, १।८ दिवस ठेवून परत करीत होतात.

मला हे जागेयेणे मुळीच आवडत नव्हते. पण काय करणार ? माझी किंमतच आपल्याला परवडत नव्हती. दोघांचाही नाइलाज होता.

आता मात्र तोहि प्रश्न सुटला आहे. पंचवीस पैसे काय ? जातायेता, हसत, आपण कुठेहि, कशासाठीहि खर्च करीत असता.

'मुक्काम' म्हटल्यावर घाबरू नका. हल्लीची जागेची अडचण माझ्या ध्यानात आहे. म्हणून मी आकारहि सुटसुटीत घेतला आहे. शेल्फवर, टेबलावर, ऑफिस बॅगमध्ये किंवा खिशातदेखील माझी सहज सोय होऊन जाईल.

माझे येण्याचे तीन मार्ग आहेत. फिरत्या वाचनालयातून तुम्ही मला चार आणे देऊन घरी नेऊ शकता किंवा कोपऱ्यावरच्या एखाद्या वृत्तपत्रविक्रेत्याकडून चार आण्यात खरेदी करू शकता. नाहीतर सर्वांत सोपा उपाय आपल्या घरी वर्तमानपत्र टाकणाऱ्या मुलाला मला आणायला सांगा.

लक्षात ठेवा ! यापुढे माझे मूल्य केवळ पंचवीस पैसे ! !

**माणूस**

MANOOS (Fortnightly) : 1 Mar. 1965 : 25 Paise : Regd NO. B 9304


# स्वस्तिकचा माल आता निर्यातही होऊ लागला

'स्वस्तिक'ची काही 'विशेष' उत्पादने

गम बूटस्

卐

प्रेशर होजेस

卐

वॉटर होज पाईप्स्

卐

ग्लोव्हज

卐

इरेझर्स

卐

ऑईल सील्स

देशाच्या संरक्षणाच्या कामी उपयोगी
पडणाऱ्या वस्तूंचे प्रमुख उत्पादक

## स्वस्तिक रबर प्रॉडक्टस् लि.

स्वस्तिक गृह, खडकी, पुणे ३.

फोन : ५५२०१-२-३


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर